## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २४०२/०७ व २४०३/०७

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४०२ व २४०३
निर्णय दिनांक ११-०२-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ : अपिलार्थी
रा.नांदेड

.

**विरुध्द**

**अपील क्र.२४०२/२००७**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>विद्यानिकेतन मुलींचे हायस्कूल, बिलोली<br>ता.बिलोली जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी<br>तथा<br>सचिव, चेतना शिक्षण प्रसारक<br>मंडळ, कोल्हेबोरगाव ता.<br>बिलोली, जि. नांदेड | : प्रतिवादी |

**अपील क्र.२४०३/२००७**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>फारुख पाशा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड<br>जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी<br>तथा<br>सचिव,कै.नरसिंग कव्वाल<br>शिक्षण संस्था,नांदेड | |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपील क्र. २४०२/०७ या प्रकरणातील जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी, अपील क्र. २४०२/०७ मधील तत्कालीन जन अपिलीय अधिकारी व अपील क्र. २४०३/०७ मधील जन माहिती व तत्कालीन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०७.२००७ रोजी दाखल केलेल्या

दोन स्वतंत्र द्वितीय अपिलांसंदर्भातील मूळ अर्जाद्वारे मूलतः एकाच प्रकारची माहिती मागितली असल्याने, सदर दोनही प्रकरणे एकत्रित सुनावणीसाठी आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

यातील अपील क्र. २४०२/०७ च्या संदर्भात अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदींप्रमाणे माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता मुदत संपूनही त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिलेला नाही.

अपील क्र. २४०३/०७ च्या संदर्भात अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे रितशीर पध्दतीने माहितीसाठीचा अर्ज पोस्टाद्वारे पाठविला असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे दि. ११.६.२००७ रोजी अपील केले असता, त्यांनी पाठविलेले रजिस्टर्ड पत्र त्यांना, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही कार्यवाही न करता परत प्राप्त झाले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या स्थितीप्रमाणे प्रत्यक्षात तशाप्रकारची वस्तुस्थिती आयोगास आढळली आहे.

आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी अपील क्र.२४०३/०७ शी संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फारुख पाशा ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड व सचिव, कै. नरसिंग कव्वाल शिक्षण संस्था, नांदेड हे दोघेही अनुपस्थित आहेत. अपील क्र. २४०२/०७ च्या संदर्भातील जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विद्यानिकेतन हायस्कूल (मुलींचे),बिलोली ता.बिलोली जि.नांदेड हे आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित आहेत, तर सचिव, चेतना शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हेबोरगाव, ता.बिलोली,जि.नांदेड अनुपस्थित आहेत.

उपरोक्त दोनही प्रकरणामध्ये अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी झाल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता तसेच शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक:संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७,

दि. २६.११.२००७ अन्वये आता सर्व शिक्षण संस्थांच्या संदर्भात प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची माहिती अधिकार अधिनियमाशी संबंधित प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्याने, या टप्प्यावर आयोगास उपरोक्त दोनही प्रकरणातील प्रत्येक प्रथम अपील अर्जावर संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) /शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्या स्तरावर सुनावणी होणे गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना अपिलार्थीच्या उपरोक्त अपील क्र.२४०२/०७ या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीच्या दि. ७.५.२००७ रोजीच्या व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना अपिलार्थीच्या अपील क्र. २४०३/०७ या प्रकरणाशी संबंधित दि. ७.६.२००७ रोजीच्या, प्रथम अपील अर्जाची प्रत आयोगामार्फत पाठविण्यात येऊन, आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या त्यांच्याशी संबंधित दि. ७.५.२००७ व ७.६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे स्वतंत्रपणे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक /प्राथमिक) यांनी अपिलार्थी यांच्या दि.७.०५.२००७ व ७.६.२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर, निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत

३. सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर,बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फारुख पाशा ऊर्दू प्राथमिक शाळा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विद्यानिकेतन मुलींचे हायस्कूल, बिलोली जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना अपिलार्थीच्या दि. ७.५.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना अपिलार्थीच्या दि. ७.६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९४

निर्णय दिनांक ११-०२-२००९

१ श्री. सुनिल देवबा ढगे, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: व्यवस्थापक/मुख्याध्यापक,
उदयगिरी युवक मित्रमंडळ नावंदी संचलित
व्यंकोबा चामवाड निवासी अपंग कार्यशाळा,
लोहा, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी: समाजकल्याण अधिकारी गट-अ,
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.११.२००७ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांचे, राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ९.२.२००९ रोजीचे पत्र जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे सादर करण्यात आले. या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या विचाराधीन अपील

अर्जासंदर्भात, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मिळाली असून याबाबत त्यांचे समाधान झाले आहे. त्यामुळे आजचे विचाराधीन अपील चालविण्यामध्ये त्यांना स्वारस्य नाही. त्यामुळे आता ते अपील मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील, ते मागे घेत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील क्र.२३९४/२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२३९४/२००७, दि. २६.११.२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : ११-०२-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल देवबा ढगे, डॉ.बोजलवार हॉस्पीटलसमोर, कैलासनगर, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक/मुख्याध्यापक, उदयगिरी युवक मित्रमंडळ नावंदी संचलित व्यंकोबा चामवाड निवासी अपंग कार्यशाळा,लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,गट-अ जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९६
निर्णय दिनांक ११-०२-२००९

१ श्री. दत्तात्रय भीमराव देशमुख, रा. माजलगाव जि.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी,बीड : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः १. प्रमुख लिपीक,जिल्हाधिकारी कार्यालय,बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.१७.९.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे दि. ५.६.२००७ रोजीचे प्रथम अपील, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उशिरा व अर्धवट माहिती दिल्याबद्दल काही शास्ती न लावून, फेटाळल्याने त्यांनी विचाराधीन अपील केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने व अर्धवट माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २०(२) प्रमाणे शास्ती लावण्याची त्यांनी अर्जामध्ये अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २१.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी त्वरित होण्यासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "**लोकशाही दिनामध्ये दि. ५.१२.२००५ रोजी न्यायालयाच्या आदेशाची त्वरित अंमलबजावणी करणेबाबत अपिलार्थीने केलेल्या अर्जावर झालेली कार्यवाही आणि कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्याची माहिती, अपिलार्थीच्या अर्जावर नियुक्त अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णय/आदेशाच्या प्रती, ज्या अधिकाऱ्यांनी अंमलबजावणी केली नाही, त्या अधिकाऱ्यांनी सेवाशर्ती/वर्तणूकीचा भंग केल्यास, कर्तव्यात कसूर केल्यास,त्यांच्यावर केलेली कारवाई, अंमलबजावणी करण्यास कोणत्याही प्रकारची कायदेशीर अडचण नसताना आतापर्यंत अपिलार्थीस जागेचा ताबा का दिला नाही, यास जबाबदार असलेले अधिकारी कोण आहेत, कोर्टाच्या निकालाप्रमाणे जागेचा ताबा देणार आहेत का, किती दिवसांत देणार आहेत, ताबा देणार नसाल तर का देणार नाहीत." -** या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर अर्ज जिल्हाधिकारी, बीड यांना उद्देशून केला होता. जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दि. २०.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस या पत्राद्वारे दिली. मुद्दा क्र. २ ते ५ शी संबंधित माहिती ही तहसीलदार, माजलगाव यांच्याशी संबंधित असल्याने अपिलार्थीस तसे कळविले व त्याची एक प्रत व अपिलार्थीच्या अर्जाची एक प्रत, अशी दोन स्वतंत्र पत्राद्वारे तहसीलदार, माजलगाव यांना अग्रेषित केली. तथापि तहसीलदार, माजलगाव यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ५.६.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.६.२००७ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार माजलगाव हे अनुपस्थित आहेत. तहसीलदार, माजलगाव यांना दूरध्वनीद्वारे

जिल्हाधिकारी कार्यालयातून निवासी उपजिल्हाधिकारी यांचेमार्फत संदेश देण्याची कार्यवाही अपर जिल्हाधिकारी यांनी केली होती, असे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. तथापि आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २१.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही एकाच प्राधिकरणाच्या दोन वेगळया भागाशी संबंधित होती. अशावेळी कशापध्दतीने कारवाई करावयाची याचे विवेचन अधिनियमातील कलम ६(३)(एक) मध्ये पुरेशा प्रमाणात केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना, ज्यावेळी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या काही मुद्यांची माहिती त्यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात नव्हती अथवा त्यांच्या कायालर्लयाशी संबंधित नव्हती, असे आढळून आल्यानंतर त्यांनी ५ दिवसांच्या आत अपिलार्थीचा दि. २१.४.२००७ रोजीचा अर्ज ही माहिती ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात आहे, त्या प्राधिकरणाकडे म्हणजेच तहसीलदार, माजलगाव यांच्याकडे दि. २६.४.२००७ रोजी अगर तत्पूर्वी पाठवून देणे त्यांना भाग होते, तथापि अशाप्रकारची कृती त्यांनी केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज ५ दिवसांच्या ऐवजी अंदाजे दोन महिन्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला आहे. संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार माजलगाव यांनी यावरही कडी करुन अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही अथवा त्यांच्या अर्जासंदर्भात आपला कोणताही निर्णय कळविण्याचे कष्ट घेतले नाहीत.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. यापैकी मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती, जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने दिली आहे. मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने ही माहिती अपिलार्थीस देय ठरते, तथापि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दि. २०.६.२००७ रोजीच्या पत्राप्रमाणे प्राप्त झालेल्या अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव यांनी कोणतीही कार्यवाही आजपर्यंत केली नाही.

तहसीलदार, माजलगाव यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींना छेद देणारी आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे वैयक्तिक अभिप्राय व त्यांच्या कृतीबद्दल कारणे अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेली 'माहिती' या शब्दाची व्याख्या पाहता, अपिलार्थीस अशाप्रकारची कारणे अथवा खुलासे अपेक्षित करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारता येणार नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अधिनियमातील तरतुदींनुसार अर्जदारास देण्यासंदर्भात कार्यवाही करणे, एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती मात्र या व्याख्येशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस देय ठरत आहे. सबब तहसीलदार, माजलगाव यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पाठवावी.

उपरोक्त प्रकरणी प्रथमतः जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये आवश्यक ती कार्यवाही न करुन कलम ६(३)(एक) चा भंग केला आहे, तर तहसीलदार, माजलगाव यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला असल्याने, त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब महसूल आयुक्त,औरंगाबाद यांना संबंधित दोनही जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. तहसीलदार माजलगाव यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त,औरंगाबाद यांना उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी, प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड तसेच तहसीलदार, माजलगाव यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय भीमराव देशमुख, समता कॉलनी, माजलगाव जि. बीड-४३१ १३१

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९७
निर्णय दिनांक ११-०२-२००९

१ श्री. गौतम कचरु देहाडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
उपविभाग, क्रांतीचौक, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,शहर विभाग क्र.२
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
गजानन महाराज मंदीरासमोर,औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः १. श्री. पंकज वाडेकर
२. श्री. शरद कराळे

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेली माहिती पूर्ण दिशाहीन, असत्य व बनवाबनवीची असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

शरद कराळे, शुभम् संकुल यांनी दि. १४.१२.२००६ रोजी दाखल केलेल्या अर्जानंतर पंकज वाडेकर यांच्या पी.डी.मिटर संबंधी केलेल्या कारवाईसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्याद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "**कार्यालयातर्फे दिलेल्या माहितीमध्ये, दुकान बंद होते,असे म्हटले आहे. हे खोटे आहे. खोटी माहिती देण्याचे कारण काय? याला कार्यालयातील जबाबदार कोण? तसेच कॉलम २ मध्ये पी.डी.मिटरची तपासणी केली, असे म्हटले आहे, तर पी.डी मीटरच्या तपासणी केलेल्या कार्यालयीन अहवालाची साक्षांकित प्रत, "** - अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. १८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.११.२००७ रोजी सुनावणी घेतली होती. या सुनावणीमध्ये अपिलार्थीचा गैरसमज पूर्णपणे दूर झाला असल्याचे त्यांनी कबूल केले, असे जन अपिलीय अधिकारी यांनी म्हटले आहे व त्या पृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीच्या स्वाक्षरीची कागदपत्रे आयोगाकडे सादर केली आहेत. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.९.२००७ रोजी संपूर्ण माहिती दिल्याचे व तसेच अपिलार्थीच्या शंकांचे निरसन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.११.२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये करण्यात आले असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास दि. २१.९.२००७ रोजी, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीतील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती ही, अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसतानाही, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयीन अहवालाची साक्षांकित प्रतीची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीमध्ये अहवालाची साक्षांकित प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, ही माहिती दिशाहीन, असत्य व बनवाबनवीची आहे तथापि ही माहिती असत्य अथवा दिशाहीन कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सर्व शंकांचे समाधान त्यांच्याकडे झालेल्या दि. २०.११.२००७ रोजीच्या सुनावणीत केले आहे व अपिलार्थीचा, ही माहिती असत्य असल्याचा दावा सिध्द करण्यसाठी ते आज आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गौतम कचरु देहाडे, फुलेनगर,दर्गारोड, उस्मानपूरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित उपविभाग, क्रांतीचौक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,शहर विभाग क्र.२महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, गजानन महाराज मंदीरासमोर,औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९८
निर्णय दिनांक ११-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोईज खान मो. अस्गर खान,<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तहसील कार्यालय, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, नांदेड | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, नांदेड जि.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.१३.८.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे दि. २२.५.२००७ रोजी मान्य करुनही त्यांनी माहिती दिली नाही, म्हणून त्यांनी सदर अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.०३.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे- **हॉकर्स केरोसिन परवानाधारक यांना केरोसिन पुरवठा करण्याबाबत दिलेले शासकीय नियम/अध्यादेश, यांच्यावर देखरेख करण्याची व हजेरीची पध्दत, दैनिक अहवाल घेण्याच्या**

**पध्दतीबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आदेशाच्या प्रती.-** या माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथमतः प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पोस्टाने पाठविली. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.४.२००७ रोजी प्रथम अपील केले. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.५.२००७ रोजी आदेश देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ४ दिवसांत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.५.२००७ रोजी व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि या माहितीमध्ये त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या केरोसिन हॉकर्सबाबत कोणताही उल्लेख नसल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीच्या दि. २२.३.२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. ७.४.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती पोस्टाद्वारे पाठविली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.४.२००७ रोजी प्रथम अपील केले होते, या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.५.२००७ रोजी आदेशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.५.२००७ रोजी माहिती प्रत्यक्षतः उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही स्पष्ट केले की, त्यांच्याकडे केरोसिन हॉकर्सकरिता कोणत्याही प्राधिकरणाने दिलेले विशेष आदेश उपलब्ध नाहीत. केरोसिन हॉकर्सकरिता विशेष अशा स्वरुपाचे आदेश शासनाकडून अथवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकरणाकडून मूलतः पारितच केले गेले नसल्याने ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होण्याचा प्रश्नच उद्‍भवत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दि. ७.४.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी हॉकर्सबाबत कोणताही उल्लेख केला नाही.

आज रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाद्वारे अपिलार्थीस ही माहिती तोंडी मिळाल्याचे अपिलार्थीने मान्य केले आहे, त्यामुळे त्यांना आता असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत केरोसिन हॉकर्स संबंधातील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित (केरोसिन हॉकर्सबाबतची) माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोईज खान मो. अस्गर खान,, '४२७', प्र.नि.हा.शाळेजवळ, कैलासनगर, नांदेड-५.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९९
निर्णय दिनांक ११-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मो. अन्वरउल्ला खान पि.बरकतउल्ला खान,<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.३१.५.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०६.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०/- इतके घेऊन, एका पृष्ठाची माहिती दिली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. जन अपिलीय अधिकारी यांचा त्यांच्या अपिलावरील निर्णय दि. १७.४.२००७ रोजी पारित झाला, या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केल्यानंतर एक महिन्याचा कालावधी व्यपगत होऊनही त्यांना आवश्यक असलेली माहिती

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.१.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ मधील ५६५ ते ५६७ आणि ५९५ ते ५९८ मधील डांबर नुतनीकरणाच्या कामाविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने दि. २५.११.२००४ ते २३.१.२००७ या कालावधीशी संबंधित ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **तांत्रिक मान्यतेचे अंदाजपत्रक, कार्यारंभ आदेश, मोजमाप पुस्तिकांच्या प्रती, बीलाच्या प्रमाणित प्रती, कंत्राटदारांना दिल्या गेलेल्या डांबराच्या गेटपासच्या प्रती, कामाचे फोटो -** या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थी यांनी ही माहिती साक्षांकित स्वरुपात व व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. १३.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस रु. १०/- इतके शुल्क माहितीपोटी भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.२.२००७ रोजी माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. या कथित माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.३.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.४.२००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश दिल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.२.२००७ रोजी दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एका पृष्ठावर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, 'निरंक' असल्याचे

नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांना यासंदर्भात स्पष्टीकरण विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ ची माहिती मागितली होती. सदर रस्ता पूर्वी प्र.रा.महामार्ग क्र.२ अशा दर्जाचा होता. सदरचा रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून २००५ साली दर्जोन्नत झाला. तद्नंतर अपिलार्थीने ज्या किलोमिटरमधील कामाची माहिती मागितली आहे, त्या किलोमीटरमध्ये कोणतेही काम झाले नसल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती, 'निरंक' असल्याचे कळविले. तसेच सदरचा रस्ता आता नांदेड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नांदेड सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध असल्याची शक्यता त्यांनी आयोगासमोर वर्तविली. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही, कारण जर,अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत पाठवून, त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे गरजेचे होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करुन अधिनियमातील कलम ६(३)(एक) चा भंग केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. याउपर माहिती अधिकार अधिनियमानुसार अपिलार्थीस एका पृष्ठाच्या प्रतीची किंमत रु.२/- इतकी होत असताना, त्यांनी अपिलार्थीस एका पृष्ठाकरिता रु.१०/- इतके शुल्क आकारले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर त्यांनी अपिलार्थीस कोणती माहिती दिली, असे विचारले असता, यासंदर्भात ते आयोगास कोणतीही माहिती दाखवू शकले नाहीत. थोडक्यात, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून अपिलार्थीस वंचित ठेवण्याचे काम संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे आता जरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांच्याकडे उपलब्ध असली तरी त्यांनी मूळात अपिलार्थीस चुकीचे मार्गदर्शन केल्याने अपिलार्थीस आता आवश्यक असलेली माहिती देण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर टाकण्यात येत असून त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी तसेच

अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१०/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच चोवीस तासांच्या आत परत करावे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या वरील वर्तनाद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. अन्वरउल्लाखान पि.बरकतउल्ला खान, ९-४-४५५,कय्युम प्लॉटस्, नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, बांधकाम भवन, अदालत रोड औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४००
निर्णय दिनांक ११-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सदाशिव सटवा रायबोळे,<br>रा. किनवट, जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>किनवट,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी ,<br>किनवट,जि.नांदेड | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,जि.नांदेड

तत्कालीन जन माहिती अधिकारी: कृषि अधिकारी (तांत्रिक), तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,जि.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.३०.०४.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०५.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाचा निर्णय ८४ दिवसांत दिला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सर्व मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी जलसंधारण, रोहयो, कामासाठी धान्य योजना, मृदसंधारण या योजनांतर्गत केलेल्या कामाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये - **सर्व कामांचे नाव,गावाच्या नावासह प्रशासकीय मान्यता दिनांक, अंदाजपत्रकीय किंमत, कामाचा प्रकार व पॉकेट क्रमांक -** अशी माहिती मागितली होती. अपिलार्थी यांनी मागितलेली ही माहिती सन २००० ते २००६ या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठया स्वरुपाची आहे व अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याने सदरची माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे अनुदान उपलब्ध नसल्याचे कळवून अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दि. २.२.२००७ रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करण्यासाठी उपस्थित राहण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दि. २.२.२००७ रोजी ही माहिती तपासली, असे उपस्थित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दि. २२.३.२००७ रोजी, अपिलार्थीस माहिती देण्यापोटीचे अनुदान त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर दिली. दि. २.२.२००७ रोजी माहिती तपासल्यानंतरही अपिलार्थीने मध्यंतरीच्या काळामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ६.२.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर सुनावणी झाल्याचे अथवा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीशी यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दि. २२.३.२००७ रोजी माहिती दिल्याचे अवगत केले व ही माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने त्यांच्या दि.२२.३.२००७ रोजीच्या पत्रावर केलेल्या सहीसह या पत्राची स्थळप्रत आयोगास सादर केली आहे. या पत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून

येईल की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या दि. २२.३.२००७ रोजीच्या पत्रावर त्यांनी मूळ अर्जाप्रमाणे माहिती मिळाली, असे त्यांचे अभिप्राय नोंदविले आहेत.

आज रोजी द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी हे, त्यांना निश्चितपणे राज्य माहिती आयोगाकडे कोणता मुद्दा मांडावयाचा आहे, हे सांगण्यासाठी उपस्थित नाहीत तसेच आयोगाकडे द्वितीय अपील करण्याचे कारण देखील त्यांनी त्यांच्या आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले नाही.

अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे होते, या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.१.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण त्यांच्याकडे असलेल्या निधीची कमतरता असल्याचे आयोगास दिले आहे व त्यांच्याकडे निधी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. २२.३.२००७ रोजी माहिती पुरविली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहिती नाकारल्याचे अथवा माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली असल्याने व प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबाबत भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सदाशिव सटवा रायबोळे, द्वारा ॲड. जी.एस.रायबोळे, सरस्वती कॉलनी,किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४०१

निर्णय दिनांक ११-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मनोहर माधवराव थोरात<br>रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, लोहा,जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, लोहा जि. नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १६.४.२००७ रोजीचे,राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०४.२००४ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी तहसीलदार, लोहा यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ११.२.२००९ रोजीचे पत्र सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दि. ७.५.२००७ रोजी दिली असल्याचे नमूद केले आहे व या पत्रासोबत अपिलार्थीस त्यांनी दि. ७.५.२००७ रोजी माहिती पुरविल्याचा पुरावा सादर केला आहे. तहसीलदार लोहा यांच्या दि. ११.२.२००९ रोजीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या पत्रासोबत जोडलेल्या सहपत्रावरुन अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.

२१.४.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील मागे घेतले असल्याचे आपले अभिप्राय स्वाक्षरीसह लिहिले आहेत.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दि. ७.५.२००७ रोजी देण्यात आल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडील पत्रावर दिलेल्या अभिप्रायावरुन व आज रोजीच्या आयोगाकडील सुनावणीस त्यांच्या अनुपस्थितीवरुन, त्यांना विचाराधीन अपील चालविण्यामध्ये स्वारस्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन आढळत नाही. सबब.अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : ११-०२-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर माधवराव थोरात,घर नं.२-२-१२४,देगावचाळ, पोस्ट वजिराबाद, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, लोहा,जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२३४

निर्णय दिनांक १२-०२-२००९

१ श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, अपिलार्थी
"गुरुप्रसाद" लासूर रोड, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
कार्यालय उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपसंचालक आरोग्य सेवा,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १७-०१-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मिळाली असल्याने व प्राप्त झालेल्या माहितीबद्दल त्यांची काहीही तक्रार नसल्याने त्यांना आता विचाराधीन प्रकरणामध्ये स्वारस्य नाही असे म्हटले आहे, व आयोगास विचाराधीन प्रकरण निकाली काढण्याची विनंती केली आहे.

खुद्द, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झ ााल्याने आयोगाकडील अपील चालविण्यामध्ये त्यांना स्वारस्य नसल्याचे म्हटल्यावरुन अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २२३४/२००७, दिनांक ०३-१२-२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२३४/२००७, दिनांक ०३-१२-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, "गुरुप्रसाद" लासूर रोड, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२३५

निर्णय दिनांक १२-०२-२००९

१ श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, अपिलार्थी
२१, चैतन्य, गुरुनगर, सिडको, एन-८, एफ-४,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख,
औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रमुख लिपीक, अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १८-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली असून, प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झालेले आहे व त्यांची आता कोठलीही तक्रार नाही. सबब अपील निकाली काढावे अशी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे लेखी विनंती केली आहे.

अपिलार्थीस आता माहिती मिळाल्याने अपिलार्थीचा माहितीचा हेतु साध्य झालेला आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२३५/२००७, दिनांक १४-१२-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, २१, चैतन्य, गुरुनगर, सिडको, एन-८, एफ-४, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२३६

निर्णय दिनांक १२-०२-२००९

१ श्रीमती रुखसाना हमीद खॉन, अपिलार्थी
घ. नं. ११०, म्हाडा कॉलनी, रोशनगेट,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका, तलत उर्दू माध्यमिक शाळा,
बारुदगरनाला, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, तलत शिक्षण मंडळ, कबाडीपुरा,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००७ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०१-०९-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही.

आज रोजी उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला नसल्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने ज्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केला त्यावेळी संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले होते. तथापि शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/ २००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, व संबंधीत संस्थेस त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी देण्याकरिता, आयोगास या टप्प्यावर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे गरजेचे वाटते. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणातील आपला प्रथम अपील अर्ज प्रथमतः शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे सादर करावा. या अपील अर्जाची प्रत या निर्णयाबरोबर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना पाठविण्यात येत आहे.

अपिलार्थीकडून प्रथम अपील अर्जाची प्रत प्राप्त झाल्यानंतर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस सदर आदेश मान्य न झाल्यास ते अधिनियामातील कलम १९

(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त झाल्या-पासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती रुखसाना हमीद खॉन, घ. नं. ११०, म्हाडा कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, तलत उर्दू माध्यमिक शाळा, बारुदगरनाला, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत)

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२३७ व २२३८

निर्णय दिनांक १२-०२-२००९

१ श्री. संजय विठ्ठलराव तायडे पाटील, अपिलार्थी
एफ-१, एच-१, प्लॉट नं. ३०, एन-४, सिडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

अपील क्रमांक २२३७/०७

१. जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, आईस्टर इंग्लीश स्कूल
(प्रायमरी), सिंधी कॉलनी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा संस्था सचिव, आईस्टर इंग्लीश स्कूल
(प्रायमरी), सिंधी कॉलनी, औरंगाबाद

अपील क्रमांक २२३८/०७

१ जन माहिती अधिकारी,
मुख्याध्यापक, महाराष्ट्र पब्लिक स्कूल (प्रायमरी),
महेशनगर / दौलताबाद टी पॉईंट, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी,
संस्था सचिव, महाराष्ट्र पब्लिक स्कूल (प्रायमरी),
महेशनगर / दौलताबाद टी पॉईंट, औरंगाबाद

**निर्णय**

वरील दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १२-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी व अपील क्रमांक २२३८/०७ शी संबंधीत जन

माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे वकील हे हजर आहेत तर अपील क्रमांक २२३७/०७ शी संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१२-२००७ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती संबंधीत शिक्षण संस्थेने दिली नाही व त्याकरिता संस्थेच्या सचिवांकडे केलेल्या अपील अर्जावर संस्थेच्या सचिवांकडून त्यांना अद्याप कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सदरची दोन स्वतंत्र व्दितीय अपिले दाखल केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये, मुख्याध्यापक, आईस्टर इंग्लीश स्कूल (प्रायमरी) व मुख्याध्यापक, महाराष्ट्र पब्लिक स्कूल (प्रायमरी) या दोन शिक्षण संस्थांकडे त्यांच्या शिक्षण संस्थेशी संबंधीत सन २००७-२००८ या शैक्षणिक वर्षाच्या कालावधीतील एकच माहिती मागविली होती. तथापि अपिलार्थीच्या या दोनही अर्जांना संबंधीत संस्थांच्या जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताच प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार त्यांच्या या दोन अर्जासंदर्भात संस्थेचे सचिव, आईस्टर इंग्लीश स्कूल (प्रायमरी) व संस्थेचे सचिव, महाराष्ट्र पब्लिक स्कूल (प्रायमरी) यांच्याकडे दिनांक ३०-०८-२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. तथापि संबंधीत संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे दिसून येते आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

अपील क्रमांक २२३८/०७ मधील जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे त्यांच्या वकिलांनी सादर केलेला युक्तिवाद दाखल करुन घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दोनही प्रकरणातील माहितीसाठीच्या मूळ अर्जांना संबंधित दोनही जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे व त्यांच्या संबंधीत दोनही प्रथम अपील अर्जांवर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीने माहितीचा अर्ज करतेवेळी संबंधीत संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले होते. तथापि आता त्यामध्ये बदल करण्यात आला असून शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता व या संबंधीत संस्थांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याकरिता, आयोगास या टप्प्यावर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे गरजेचे वाटते. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणातील आपले दोनही प्रथम अपील अर्ज प्रथमतः शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे सादर करावेत.

अपिलार्थीकडून प्रथम अपील अर्जाच्या प्रती प्राप्त झाल्यानंतर संबंधीत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत. अपिलार्थीस सदर आदेश मान्य न झाल्यास ते अधिनियामातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, प्रथम अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले क्रमांक २२३७/०७ व २२३८/०७ ही निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२३७/०७ व २२३८/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपिल अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय विठ्ठलराव तायडे पाटील, एफ-१, एच-१, प्लॉट नं. ३०, एन-४, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आईस्टर इंग्लीश स्कूल (प्रायमरी), सिंधी कॉलनी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महाराष्ट्र पब्लिक स्कूल (प्रायमरी), महेशनगर / दौलताबाद टी पॉईंट, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा संस्था सचिव, आईस्टर इंग्लीश स्कूल (प्रायमरी), सिंधी कॉलनी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा संस्था सचिव, महाराष्ट्र पब्लिक स्कूल (प्रायमरी), महेशनगर / दौलताबाद टी पॉईट, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या दोन प्रथम अपिलांच्या प्रती)

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २२३९/२००७ व २२४०/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२३९ व २२४०

निर्णय दिनांक १२-०२-२००९

१ श्री. नंदु जनार्दन दहिहंडे, अपिलार्थी
व्दारा : श्री. संजय तायडे पाटील,
एफ-१, एच-१, प्लॉट नं. ३०, सिडको, एन-४,
औरंगाबाद

**विरुध्द**

अपील क्रमांक २२३९/२००७

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, सेंट लॉरेन्स इंगलीश स्कूल
(प्रायमरी), नाईक कॉलेजजवळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, सेंट लॉरेन्स इंग्लीश स्कूल (प्रायमरी),
नाईक कॉलेजजवळ, औरंगाबाद

अपील क्रमांक २२४०/२००७

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, सेंट लॉरेन्स प्राथमिक शाळा,
एन-१, सिडको, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सचिव, सेंट लॉरेन्स प्राथमिक शाळा, एन-१,
सिडको, औरंगाबाद

**निर्णय**

वरील दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १२-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१२-२००७ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती संबंधीत शिक्षण संस्थेने दिली नाही व त्यामुळे संस्थेच्या सचिवाकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर संस्थेच्या सचिवाकडून त्यांना अद्याप कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सदरची दोन स्वतंत्र व्दितीय अपिले दाखल केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये, मुख्याध्यापक, सेंट लॉरेन्स इंग्लीश स्कूल (प्रायमरी) व मुख्याध्यापक, सेंट लॉरेन्स प्राथमिक शाळा मराठी, या दोन शिक्षण संस्थांकडे त्यांच्या शिक्षण संस्थेशी संबंधीत सन २००७-२००८ या शैक्षणिक वर्षाच्या कालावधीतील एकच माहिती मागविली होती. तथापि अपिलार्थीच्या या दोनही अर्जांना संबंधीत संस्थेने कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताच प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार त्यांच्या या दोन अर्जासंदर्भात संस्थेचे सचिव सेंट लॉरेन्स इंग्लीश स्कूल (प्रायमरी) व संस्था सचिव सेंट लॉरेन्स प्राथमिक शाळा यांच्याकडे दिनांक ३०-०९-२००७ व दिनांक ३०-०८-२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. तथापि संबंधीत संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने माहितीचा अर्ज करतेवेळी संबंधीत संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले होते. तथापि आता त्यामध्ये बदल करण्यात आला असून शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या संबंधीत संस्थांना त्यांचे म्हणणे मांडण्याची प्रथम संधी देण्याकरिता, आयोगास या टप्प्यावर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे गरजेचे वाटते. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणातील आपले दोनही प्रथम अपील अर्ज प्रथमतः शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे सादर करावेत.

अपिलार्थीकडून प्रथम अपील अर्जाच्या प्रती प्राप्त झाल्यानंतर संबंधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत, दिनांक ३०-०८-२००७ व दिनांक ३०-०९-२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपिल अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस सदर आदेश मान्य न झाल्यास ते, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले क्रमांक २२३९/०७ व २२४०/०७ ही निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२३९/०७ व २२४०/०७ निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ३०-०८-२००७ व दिनांक ३०-०९-२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपिल अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नंदु जनार्दन दहिहंडे, व्दारा : श्री. संजय तायडे पाटील, एफ-१, एच-१, प्लॉट नं. ३०, सिडको, एन-४, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक सेंट लॉरेन्स इंग्लीश स्कूल (प्रायमरी), नाईक कॉलेज जवळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव सेंट लॉरेन्स इंग्लीश स्कूल (प्रायमरी), नाईक कॉलेज जवळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सेंट लॉरेन्स प्राथमिक शाळा, एन-१, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव सेंट लॉरेन्स प्राथमिक शाळा, एन-१, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक ३०-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत)

७ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत)

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३११

निर्णय दिनांक १२-०२-२००९

१ श्री. शिवप्रसाद नागनाथ स्वामी, अपिलार्थी
२-६३, "पार्वती-मॅन्शन", कोळ्ळे गल्ली,
निलंगा - ४१३ ५२१, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक १,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
(जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्रमांक १, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस सहाय्यक जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विसंगत व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली असल्याने व त्यांचा मूळ

प्रस्ताव गहाळ केला गेला असल्याने, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्यावर जास्तीत जास्त दंडात्मक कारवाई व्हावी व त्यांचे वैधता प्रमाणपत्र त्वरीत देण्याबाबत जात प्रमाणपत्र समितीस आदेशीत करण्यात यावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमत: अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून जंगम (इतर मागासवर्गीय) जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करुन देण्याबाबतची ऑगस्ट २००६ ते जुलै २००७ पर्यंतच्या कालावधीतील माहिती एकूण चार मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **प्रमाणपत्र पडताळणी होऊन अपिलार्थीस का मिळाले नाही, पडताळणीसाठी किती दिवस लागतात, पडताळणी न होण्याची कारणे आतापर्यंत का कळविण्यात आले नाही व आपल्या अपिलीय अधिका-याचे नांव, संपूर्ण पत्ता, फोन क्रमांक इत्यादी तपशील** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या आदेशाव्दारे अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांचा जिल्हाधिकारी, लातूर यांच्यामार्फत दिनांक १५-०९-२००७ रोजी पाठविलेला प्रस्ताव जात पडताळणी समितीस मूळात प्राप्त झाला नसल्याने, समितीमार्फत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, असे सांगितल्यावरुन अपिलार्थी हे व्यथित झाले आहेत असे दिसून येते. यावर अपिलार्थीने जिल्हाधिकारी, लातूर यांनी पाठविलेल्या एकूण चार प्रस्तावापैकी तीन प्रस्ताव मंजूर झाल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन

जिल्हाधिकारी, लातूर यांचे दिनांक १५-०९-२००७ रोजीचे पत्र व त्यासोबत अपिलार्थीचा जात पडताळणीचा प्रस्ताव जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला असावा असे अपिलार्थीने अनुमान काढले आहे व ते योग्यही आहे. यावर खुलासा करतांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, जिल्हाधिकारी, लातूर यांच्या दिनांक १५-०९-२००६ रोजीच्या पत्रासोबत विवेकानंद नागनाथ स्वामी व शिवप्रसाद नागनाथ स्वामी असे दोन प्रस्ताव असावेत तथापि या दोनही पूर्ण नावातील साधर्म्यामुळे अपिलार्थीचा प्रस्ताव विवेकानंद नागनाथ स्वामी यांच्या प्रस्तावाबरोबर गेला असावा अशी शक्यता त्यांनी आयोगासमोर व्यक्त केली आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्य झेरॉक्स प्रती सादर केल्यास अपिलार्थीस आवश्यक असलेले जात प्रमाणपत्र १५ दिवसाच्या आत देण्याची त्यांनी आयोगासमोर तयारी दर्शविली आहे व त्यास अपिलार्थीने मान्यता दिली आहे हे पाहता, आता अपिलार्थीचा जात पडताळणी प्रमाणपत्रातील मूळ प्रश्न अशा प्रकारे निकालात निघत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील चार मुद्दयांपैकी अपिलार्थीस फक्त क्रमांक ४ च्या मुद्दयाशी संबंधीत माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते, उर्वरित तीन मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत नाही, कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची व त्यांच्या कृतीबद्दल कारणे विचारणारी आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या कारणास्तव अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबंधीत माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस दिनांक २३-०३-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आश्वासित केल्याप्रमाणे, त्यांच्याकडून आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त

झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांना आवश्यक प्रमाणपत्र देण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवप्रसाद नागनाथ स्वामी, २-६३, "पार्वती-मॅन्शन", कोळ्ळे गल्ली, निलंगा - ४१३ ५२१, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक (१), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४

निर्णय दिनांक १२-०२-२००९

१ श्री. गोल्हार अशोक सयाजीराव, अपिलार्थी
(सहशिक्षक) मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा,
तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय,
कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,
कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. नवनाथ धोंडीबा नाथ

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे विचारलेली माहिती, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १३-०३-२००७ रोजी प्राप्त झाली. सदर माहिती त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील

केल्यानंतर त्यांना प्राप्त झाली. त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची आहे. त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी विलंब लावला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

**"जा. क्र. ३१०/२००६-०७ दि. १६-११-२००६ रोजी आपण दिलेल्या माहितीनुसार सोबत दि. ०७-११-२००६ रोजीचा नवनाथ धोंडीबा नाथ यांच्या तक्रारी अर्जाची सत्यप्रत दिलेली आहे. त्यामधून अशी माहिती पुढे आली आहे की, दि. ०७-११-२००६ पूर्वि सुध्दा नवनाथ धोंडीबा नाथ याने तुमच्याकडे माझ्यासंदर्भात तक्रार अर्ज दिलेले आहेत. त्या तक्रार अर्जाच्या सत्यप्रती मला देण्यात याव्यात. "**

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची माहिती न पुरविल्यामुळे, अपिलार्थीने तद्नंतर अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस असे कळविले की, अपिलार्थीने विचारलेली माहिती त्यांना तात्काळ देण्याबाबत मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा यांना आदेश देण्यात आलेले आहेत. तद्नंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचे वाटल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्रयस्थ पक्ष श्री. नवनाथ धोंडीबा नाथ यांनी त्यांच्याविरुध्द संबंधीत मुख्याध्यापकाकडे दिनांक १२-०८-२००६ रोजी एक तक्रार केली होती. तथापि या तक्रारीची प्रत जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही, तसेच त्यांनी दिनांक १५-१२-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज

करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००७ रोजी विलंबाने माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करावी. त्यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, ते माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागवित असल्याने त्यांना सध्या निलंबनाची नोटीस प्राप्त झाली आहे. सदर संस्था त्यांना, ते माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करत असल्याने वारंवार निलंबनाची नोटीस देत असतात.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी दिनांक ०७-०३-२००७ रोजी अपिलार्थीस पुरविली असून, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या अर्जामध्ये श्री. नवनाथ धोंडीबा नाथ यांनी दिनांक ०७-०११-२००६ पूर्वी केलेल्या तक्रारीच्या अर्जाची मागणी केली होती. त्यांच्याकडे श्री. नवनाथ धोंडीबा नाथ यांनी दिनांक ०७-११-२००६ पूर्वी कोणताही तक्रार अर्ज दिला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्याविषयी, त्रयस्थ पक्षाने दिनांक ०७-११-२००६ पूर्वी केलेल्या तक्रारीची प्रत मागितली होती. तथापि मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा यांचे असे म्हणणे आहे की, त्रयस्थ पक्षाने त्यांच्याकडे अशा प्रकारचा कोणताही, अर्ज दिनांक ०७-११-२००६ पूर्वी केलेला नाही. अपिलार्थी यांची अशी खात्री आहे की, त्रयस्थ पक्षाने त्यांच्याविरुध्द जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०८-२००६ रोजी तक्रार केली होती. या तक्रारीची प्रत त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध आहे. त्रयस्थ पक्षाने राज्य माहिती आयोगाकडे अपिलार्थीच्या विरुध्द केलेल्या तक्रार अर्जाची झेरॉक्स प्रत सादर केली. सदर झेरॉक्स प्रत वाचता येत नाही व त्याच्यावर मुद्रीत झालेला शिक्का हाही नीटपणे वाचता येत नाही तसेच ही प्रत कोणीही सत्यप्रत म्हणून साक्षांकीत केलेली नाही. जन माहिती अधिकारी हे त्यांच्याकडे दिनांक ०७-११-२००६ रोजी कोणतीही तक्रार दाखल झाली नसल्याचे लेखी शपथपत्र आयोगास सादर करीत आहेत. अपिलार्थीच्या विरुध्द त्रयस्थ पक्षाने केलेल्या तक्रारीची प्रत अपिलार्थीस प्राप्त झाल्याने त्यांचा वैयक्तीक फायदा होईल किंवा व्यापक जनहीत साध्य होईल अथवा न झाल्याने अपिलार्थीचे कोणतेही नुकसान होईल अशी

कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. त्यामुळे अशा त-हेच्या या मुद्दयावर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही. मात्र या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जो प्रतिसाद अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे दिनांक १४-०१-२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे भाग होते, तो त्यांनी विलंबाने दिल्याचे येथे नि:संशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग करुन, स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र असल्याचे सिध्द केले आहे. सबब, प्रधानमंत्री, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा, यांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करुन त्यांच्या संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेत असतात, या एकाच मुद्दयावरुन त्यांना अपिलार्थीस निलंबीत करता येणार नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस संस्थेची माहिती मागणे हा त्यांचा हक्क आहे, त्यामुळे अपिलार्थीवर या एकाच मुद्दयासंदर्भात कोणत्याही प्रकारे शिस्तभंगविषयक कारवाई करणे संस्थेस अनुज्ञेय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. प्रधानमंत्री, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई

करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोल्हार अशोक सयाजीराव, (सहशिक्षक) मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ प्रधानमंत्री, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१९५
निर्णय दिनांक १३-०२-२००९

१ श्री. पांडुरंग विश्वनाथ तोडकर, : अपिलार्थी
रा.चौसाळा, जि.बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
विभाग नियंत्रक,
राज्य मार्ग परिवहन महामंडळ कार्यालय,
बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन विभागीय कार्यालय,बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : लेखाधिकारी,
राज्य परिवहन महामंडळ,
विभागीय कार्यालय,बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती दिली. माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई व्हावी व तसेच त्यांना उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कुटुंब निवृत्ती वेतनाचे पैसे मिळण्यासंदर्भात दि. १९.१.२००६ पासून ते दि.२५.३.२००७ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १९.१.२००६ रोजीच्या केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत, त्यांच्या वेतनातून १९७१ पासून कपात केलेले पैसे कोठे जमा आहेत, याबाबतची संपूर्ण माहिती व कुटुंब निवृत्ती वेतन निधी बाबतच्या कपातीबद्दल व अदाईबद्दल असलेल्या तरतुदीबाबत शासन आदेश व नियमांच्या प्रती** - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ४.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आपला निर्णय कळवून या पत्रामध्ये अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये केलेल्या माहितीच्या मागणीसंदर्भात अपिलार्थीस खुलासा केला व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आपला लेखी युक्तिवाद त्यांच्या दि. १.१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास सादर केला असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, त्यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीपोटी एस.टी.महामंडळाने केलेली कपात त्यांना अद्यापही दिली नाही. त्यांना पूर्ण माहिती न दिल्याने अद्यापही कायदेशीर लाभापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे आदेश व्हावेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ३० वर्षांशी संबंधित असल्याने त्यांना ही माहिती देण्यास विलंब लागला. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती ही मोठी होती. अपिलार्थीच्या पगारातून कपात

केलेली रक्कम अपिलार्थीस पूर्णतः देण्यात आली आहे. यापैकी रु.४०७२/- हे दि. ९.३.२००६ रोजी, रु. १६,२३६/- हे दि. १४.६.२००७ रोजी व रु. ८९०/- हे दि. ७.१.२००९ रोजी अपिलार्थीस धनादेशाद्वारे दिलेले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.६.२००७ रोजी दिली आहे, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि अपिलार्थीस दिल्या गेलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.६.२००७ रोजी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती दिल्याचे व तद्नंतर दि. ७.१.२००९ रोजी अपिलार्थीच्या मुद्दा क्र. २ च्या संदर्भात माहिती दिल्याचे दिसून येते. मात्र अपिलार्थीच्या मुद्दा क्र. १ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांना त्यांनी दि. १९.१.२००६ रोजी त्यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दि. १९.१.२००६ रोजीचा तक्रार अर्ज दाखल झाल्यानंतर त्यासंदर्भात केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती म्हणून देणे भाग होते. तथापि अशाप्रकारची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केल्याचे दिसून येत नाही. या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व विलंबाने माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या थकबाकीसंदर्भात एकूण २११९८/- इतक्या थकबाकी पोटी राहिलेली रक्कम रु. ८९०/- इतकी अपिलार्थीस दि. ७.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अदा केली आहे. अपिलार्थीस ही रक्कम आता अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली आहे. अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगाकडे दि. १.१.२००९ रोजी सादर केला आहे. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या लेखी युक्तिवादातील त्यांचे म्हणणे, ते कायदेशीर लाभापासून वंचित आहेत, हे सिध्द होत आहे. तथापि अपिलार्थीच्या या मुद्याचा आता जन माहिती अधिकारी यांनी निपटारा केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती पुरवून जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती जरी मोठी असली तरी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देणे, हे जन माहिती अधिकारी यांच्या दृष्टीने फारसे अवघड होते, असे आयोगास वाटत नाही.

अपिलार्थीस १९७१ सालापासूनची थकबाकी देण्यासाठी त्यांना बरीच कागदपत्रे शोधावी लागली हा जन माहिती अधिकारी यांचा मुद्दा, केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी ग्राहय धरला तरी, हा मुद्दा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उशिरा माहिती देण्यासाठी समर्थन होऊ शकत नाही. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती वेगळी होती व त्यांनी ज्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज केला होता व त्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना करावी लागलेली कार्यवाही हे पूर्णत: वेगळी होती. यामध्ये आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या मूळ गाऱ्हाण्याचा जरी निपटारा झाला असला तरी, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण व विलंबाने माहिती दिल्याचे वर स्पष्ट केल्याप्रमाणे नि:संशयपणे सिध्द होत असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, याची आयोगास खात्री पटली असून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती त्यांना, वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती, निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांडुरंग विश्वनाथ तोडकर, निवृत्त वाहतुक नियंत्रक, मु.पो.चौसाळा, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,राज्य मार्ग परिवहन महामंडळ,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,'महाराष्ट्र वाहतुक भवन',डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई -८ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१९६
निर्णय दिनांक    १३-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सदाशिव रामभाऊ तिडके,<br>रा.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक,आरोग्य सेवा,<br>कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, आरोग्य सेवा,मुंबई | | |

विद्यमान जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक,आरोग्य सेवा, पुणे मंडळ,पुणे

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक,आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, पुणे

त्रयस्थ पक्ष : श्री. व्ही.आर.तिडके

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी याचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.१८.०६.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती अपूर्ण आणि दिशाभूल करणारी आहे. तसेच त्यांनी उपसंचालक,आरोग्य सेवा, औरंगाबाद यांच्याकडे दि. १६.०४.२००७ रोजी प्रथम अर्ज दाखल केला असता, अद्याप त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापही कुठलेही उत्तर प्राप्त झाले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. व्ही. आर.तिडके, सेवानिवृत्त जिल्हा क्षयरोग अधिकारी, वर्ग-१ कोल्हापूर यांच्या सेवानिवृत्तीवेतनासंदर्भात एकूण २ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- **"त्रयस्थ पक्षाची पेन्शन मंजूर झाली आहे काय, असल्यास कधी व नसल्यास का मंजूर झाली नाही ? त्रयस्थ पक्ष यांना दि. १.१.१९८२ पासून वेतनवाढी व थकित बिले देण्यात आली आहेत काय ? असल्यास कधी व नसल्यास का देण्यात आली नाहीत, याची आदेशाच्या प्रतींसह लेखी माहिती"** - या मुद्यांचा समावेश आहे.

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरवून अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या सेवानिवृत्तीवेतनासंदर्भात तत्कालीन स्थिती अवगत केली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ५.३.२००७ रोजी प्रथम अपील केले. हे अपील त्यांनी संचालक, आरोग्य सेवा,मुंबई-१ यांना उद्देशून केले होते. तथापि संचालक,आरोग्य सेवा,मुंबई यांनी या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांच्याकडील दि. ४.५.२००७ च्या पत्राद्वारे अपिलार्थीस, सदर अपील अर्ज उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ,कोल्हापूर हे अपिलीय अधिकारी असल्यामुळे, त्यांच्याकडे पाठवावा, असे कळविले. यामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद कल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्रयस्थ पक्ष श्री. व्ही.आर.तिडके हे त्यांचे बंधू असून दि.३१.१०.२००६ रोजी राज्य शासनाच्या आरोग्य विभागातून जिल्हा क्षयरोग अधिकारी,वर्ग-१, कोल्हापूर या पदावरुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून त्यांना अद्यापही आरोग्य विभागाकडून त्यांचे सेवानिवृत्ती वेतन व उपदान व

तद्नुषंगीक इतर भत्ते प्राप्त झालेले नाहीत. आरोग्य विभागाच्या अशाप्रकारच्या कारभारामुळे त्यांना वैयक्तिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये श्री. तिडके यांचे सेवानिवृत्ती वेतन लवकरात लवकर मंजूर करण्यासंदर्भात आदेश निर्गमित करण्याची आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. त्यावेळी त्यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, श्री. तिडके यांची सेवापुस्तिका पूर्ण न झाल्याने तिडके यांना सेवानिवृत्ती वेतन व तद्अनुषंगीक भत्ते मंजूर करता आले नाहीत. श्री. तिडके हे कोल्हापूर येथील कार्यालयातून जिल्हा क्षयरोग अधिकारी,वर्ग-१ या पदावरुन सेवानिवृत्त झाले, तत्पूर्वी त्यांनी जालना जिल्हयातील परतूर व गडचिरोली जिल्हयातील अहीरी येथे कार्यरत होते. जालना व गडचिरोली येथील त्यांच्या कार्यालयाकडून श्री. तिडके यांच्या सेवापुस्तिका पूर्ण न झाल्यामुळे अपिलार्थी हे सेवानिवृत्ती वेतन व इतर भत्ते त्यांना प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. श्री. तिडके यांच्या सेवानिवृत्ती वेतन त्यांनी सहा महिन्याकरिता मंजूर केले होते. तथापि, तद्नंतर हे वेतन बंद झाले. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांनी आयोगासमोर सुनावणीच्या वेळी एक निवेदन सादर केले असून या निवेदनामध्ये श्री. तिडके यांची सेवापुस्तिका अपूर्ण राहण्यास श्री. तिडके हेच जबाबदार असल्याबाबतचा निष्कर्ष काढल्याचे दिसून येते. श्री. व्ही.आर.तिडके यांनी स्वतःच्या सेवापुस्तिकेकडे लक्ष न दिल्याने व सेवापुस्तिका पूर्ण करण्यासाठी सहकार्य न दिल्याने ते सेवानिवृत्ती वेतन प्राप्तीपासून वंचित राहिले, असा निष्कर्ष त्यांनी या निवेदनामध्ये काढला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा मूळ अर्ज यांचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांद्वारे माहिती विचारली आहे. त्यापैकी पहिला मुद्दा - 'सेवानिवृत्ती वेतन मंजूर झाले आहे काय व कधी, व मंजूर झाले नसल्यास त्याचे कारण' व दुसऱ्या मुद्यांद्वारे - 'वेतनवाढी व थकित बीले देण्यात आली आहेत काय व कधी व नसल्यास ती का देण्यात आली नाहीत, याचे कारण' या मुद्यावर माहिती विचारली आहे, या मुद्याबाबतची वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.

१७.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये विशद केली आहे. या मुद्यातील "कारणे" या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाच्या स्पष्ट केलेल्या व्याख्येमधील तरतुदी लक्षात घेता अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दल कोणतीही "कारणे" माहिती या मुद्याखाली देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात प्रथमतः निर्णय घेणे व माहिती देण्याचा निर्णय झाल्यास विहित केलेल्या कालावधीमध्ये ती माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जाचा केवळ माहिती अधिकार अधिनियमातील प्रकरणातून विचार केला असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती दि. १७.२.२००७ रोजी पुरविल्याचे दिसून येते.तथापि ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीपेक्षा तीन दिवसांच्या विलंबाने दिली आहे. तथापि आज सुनावणीच्या वेळी आयोगास, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी श्री. चव्हाण हे आता नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत, असे अवगत करण्यात आले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात, या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, श्री. तिडके सेवानिवृत्त जिल्हा क्षयरोग अधिकारी यांचे, सेवानिवृत्ती प्रकरण राज्याच्या आरोग्य संचालनालयाच्या कार्यालयाकडून तसेच कोल्हापूर येथील उपसंचालक यांच्या कार्यालयाकडून योग्य त्या पध्दतीने हाताळले गेलेले नाही. स्वतःच्या सहकाऱ्यांविषयीचा सहानुभूतीचा दृष्टीकोन तर सोडाच परंतु ते सेवानिवृत्त होऊन तीन वर्ष इतक्या प्रदीर्घ कालावधीच्या विलंबाने देखील उपसंचालक कार्यालयाने श्री. तिडके यांची सेवापुस्तिका अपूर्ण असल्याचे आयोगास सांगणे हे राज्याच्या आरोग्य विभागाच्या प्रशासनास निश्चितपणे भूषणावह नाही, वास्तविकतः शासनाच्या वित्त विभागाच्या/सामान्य प्रशासन विभागाच्या सेवानिवृत्ती वेतनासंदर्भात व कोणाही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास लवकरात

लवकर सेवानिवृत्ती वेतन मंजूर करण्यासंदर्भात अनेक आदेश/परिपत्रके प्रसिध्द झाली आहेत. तथापि या आदेशांकडे आरोग्य विभागाने अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.उपसंचालक, आरोग्य,पुणे यांनी आयोगाकडे केलेल्या निवेदनामध्ये श्री. तिडके यांची सेवापुस्तिका अपूर्ण राहण्यास तेच जबाबदार असल्याचे म्हटले आहे. विशेषतः क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तिका योग्य प्रकारे जतन व संकलन करुन ठेवण्यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयामध्ये कनिष्ठ लिपीक,वरिष्ठ लिपीक, मुख्य लिपीक,अधीक्षक अशा संवर्गातील अनेक कर्मचारी नेमले गेले आहेत. त्यामुळे श्री. तिडके यांची सेवापुस्तिका अपूर्ण असल्याबद्दल श्री. तिडके यांना जबाबदार असल्याचे निश्चितपणे म्हणता येणार नाही. या उलट श्री. तिडके यांच्या सेवापुस्तिकेतील नोंदी ज्या कर्मचाऱ्यांनी अद्यापपर्यंत घेतल्या नाहीत, त्यांची सेवापुस्तिका गहाळ केली होती, त्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणारे संबंधित कार्यालय प्रमुख हेच या प्रकरणी जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. सबब संचालक, आरोग्य विभाग,मुंबई यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी श्री. तिडके यांची सेवापुस्तिका गहाळ झाल्यासंदर्भात ज्या कर्मचाऱ्याकडून/अधिकाऱ्याकडून ही सेवापुस्तिका गहाळ झाली असेल, त्यांच्यावर आवश्यकतेनुसार फौजदारी कारवाई करण्याचा त्यांनी विचार करावा व तसेच किमान श्री. तिडके यांना तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करण्यासंदर्भात महालेखापाल, नागपूर यांच्याशी संपर्क साधून अथवा यासंदर्भात आवश्यक वाटल्यास शासनाकडून योग्य ते आदेश घेऊन श्री. तिडके यांचे सेवानिवृत्तीवेतनासंदर्भात आवश्यक ती कारवाई करावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आरोग्य संचालनालय मुंबई येथील कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर आयोगाच्या कार्यालयातून आजच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत दि.३१.१२.२००८ रोजीच्या लेखी सूचने (नोटीस) द्वारे कळवून व दूरध्वनीद्वारे संचालनालयातील श्री.साळवी, कनिष्ठ लिपीक यांचेमार्फत दि. ६.२.२००९ रोजी सकाळी ११.३० वाजता निरोप देऊनही उपस्थित नाही, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे. यासंदर्भात आयोगाकडील सुनावणीसाठी आरोग्य संचालनालयाकडील एखादा कर्मचारी अपवादानेच उपस्थित झाल्याचे या संदर्भात आयोगाच्या निदर्शनास आले आहे. यासंदर्भात मुख्य सचिव यांनी

आरोग्य संचालनालयातील अधिकाऱ्यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार व बेपर्वा कार्यशैलीची नोंद घेऊन त्यांना इतःपर आयोगाकडील सुनावणीसाठीचे सूचनापत्र आल्यास विनापरवानगी गैरहजर न राहण्याच्या सूचना द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर यांनी अपिलार्थीच्या दि. ५.३.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन अथवा या संदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीची सचिव, आरोग्य यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी,असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सदाशिव रामभाऊ तिडके, महात्मा फुले मार्ग, हनुमान मंदिर रोड, शाहूनगर,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,उपसंचालक,आरोग्य सेवा, पुणे मंडळ,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,आरोग्य सेवा,पुणे मंडळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, आरोग्य सेवा, ५ वा मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	सचिव (सार्वजनिक आरोग्य), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६.	मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३०४
निर्णय दिनांक  १३-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुकुंद पुरुषोत्तम कुलकर्णी,<br>रा.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी,<br>जायकवाडी प्रकल्प, बीड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, बीड | | |

त्रयस्थ पक्षः
१) श्री.सय्यद युसूफोद्दीन पि.सय्यद बाहोद्दीन
२) श्री.सय्यद मासुमोद्दीन पि.सय्यद बाहोद्दीन
३) श्री. प्रताप प्रभूजी क्षीरसागर
४) श्री. रमेश प्रभूजी क्षीरसागर
५) श्री. वामन प्रभूजी क्षीरसागर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्षांपैकी श्री. सय्यद युसूफोद्दीन पि.सय्यद बाहोद्दीन हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) च्या

तरतुदीनुसार प्रत्येक दिवसासाठी रु. २५०/- इतकी शास्ती लावण्यात यावी व जाणीवपूर्वक कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. १५.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांना दि. १६.३.२००७ रोजी प्राप्त झाला, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी "**दि. ४.५.२००६ रोजी भूसंपादन कायद्याच्या कलम १८ प्रमाणे कोर्ट फिस सह दाखल केलेले दावे जिल्हा न्यायालयाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविले आहेत काय? व पाठविले असल्यास केव्हा पाठविले "-** याबाबतची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.८.२००७ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती पुरविली गेली नसल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आजही आवश्यक असल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीचा दि. ४.५.२००६ रोजीचा मूळ अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे हे गहाळ झाले असल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकत नाहीत.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. ४.५.२००६ रोजी भूसंपादन कायद्याच्या कलम १८ प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दाखल केलेल्या दाव्यासंदर्भात आवश्यक ती कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून गहाळ झाली आहेत. विशेषत: एकदा अपिलार्थीने दाखल केलेली कागदपत्रे गहाळ झाल्याचे लक्षात आल्यास, तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी संपर्क साधून, त्यांच्याकडून मूळ कागदपत्रांच्या सत्यप्रती प्राप्त करुन घेऊन त्यावर कार्यवाही करणे व तद्नंतर अपिलार्थीस आपला निर्णय कळविणे हे या घटनाक्रमामध्ये अधिक उचित व सकारात्मक ठरले असते. तथापि या प्रकरणी असे आढळून आले की, केवळ अपिलार्थीसच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.८.२००७ रोजी आदेशित करुनही अद्यापपावेतो म्हणजे दि. १२.२.२००९ पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १२.२.२००९ रोजी दिलेल्या पत्राचे अवलोकन करता या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलार्थींच्या प्रकरणासंबंधीची कागदपत्रे गहाळ करणारे संबंधित कर्मचारी हे दोघे जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले प्रकरण, -दि. ४.५.२००६ रोजीचा दावा - दाखल केल्यासंदर्भात आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगास सादर केला आहे.सदर पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी अपिलार्थीचा दावा दाखल झाल्याप्रित्यर्थ विशेष भूसंपादन अधिकारी, जा.प्र.बीड यांनी दिलेली पोचही दाखविली आहे.या पोचसहीवर दावा दाखल करुन घेणाऱ्या कर्मचाऱ्याने त्यांच्या सहीसह लिहिलेल्या शेऱ्यामध्ये,'C.F.24115' असे देखील नमूद केले आहे. सदर पुरावा आयोग ग्राहय धरत आहे. यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, सदरची पोच अपिलार्थीस अव्वल कारकुन श्री. एस.बी.कांबळे

(सध्या तहसील कार्यालय,बीड) यांनी दिलेली आहे, यावरुन त्यांच्याकडून ही कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. त्यामुळे अपिलार्थीने दाखल केलेल्या दाव्यासंदर्भातील कागदपत्रे गहाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यावर जिल्हाधिकारी, बीड यांनी आवश्यक वाटल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा जरुर विचार करावा, अशी आयोगाची शिफारस आहे. अपिलार्थीने दाखल केलेल्या दाव्याच्या सत्यप्रती उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर ते या संदर्भात अपिलार्थीस किती दिवसांत माहिती देऊ शकतील, अशी आयोगाने विचारणा केली असता, उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ते या संदर्भात १५ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देतील, असे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीकडे उपलब्ध असलेल्या त्यांच्या दि. ४.५.२००६ रोजी दाखल केलेल्या दाव्याच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी स्वखर्चाने काढून घ्याव्यात व तद्नंतर या संदर्भातील माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. ही संपूर्ण कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्याकडून जास्तीत जास्त पंधरा दिवसांत होणे आयोगास अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) नुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी असे समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अव्वल कारकुन या दोघांनीही या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी स्वखर्चाने अपिलार्थी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दि. ४.५.२००६ रोजीच्या दाव्यातील कागदपत्रांच्या सत्यछायाप्रती प्राप्त करुन घेऊन यासंदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक अव्वल कारकुन या दोघांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुकुंद पुरुषोत्तम कुलकर्णी, ओंकार, दत्तनगर, मु.पो.ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	सचिव (महसूल),महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३०५
निर्णय दिनांक १३-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शाहुराव तुकाराम औसरमल,<br>रा. बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>ता.बीड, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>ता. बीड जि.बीड | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः | सहकार अधिकारी, श्रे-२,<br>संलग्न उपनिबंधक सहकारी<br>संस्था,ता.बीड,जि.बीड |
| तत्कालीन जन अपिलीय अधिकारीः | उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>ता.बीड,जि.बीड |
| सध्याचे जन अपिलीय अधिकारीः | जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बीड |

त्रयस्थ पक्षः श्रीमती एस.एस.गोगटे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी त्यांच्या वकिलांसह, जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतुपूर्वक चुकीची माहिती देऊन व अर्जदाराची दिशाभूल करुन शासनाची फसगत करुन शासन निधीचा गैरवापर केला आहे. शासनाच्या लेखी आदेशाचे कागदोपत्री पालन केल्याचे दाखवून तोंडी सूचनेचे आदेश देऊन खाजगी काम करुन घेणे व मर्जीनुसार काम करुन घेण्याकरिता अधिकाराचा गैरवापर जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांनी बेजबाबदारपणे केले असल्याने, त्यांनी हे अपील आयोगाकडे केले आहे.या अपील अर्जामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, त्यांनी दि. २३.७.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहितीची मागणी केल्यानंतर उपनिबंधक सहकारी संस्था, ता.बीड यांनी दि. ९.८.२००७ रोजी जाणूनबुजून खोटी,चुकीची माहिती असद्भावनेने देऊन त्यांची दिशाभूल केली. श्रीमती गोगटे सहायक सहकार अधिकारी यांनी रोजनिशी मंजूर करुन खोटे दौरे करुन बोगस प्रवासभत्ता शासन कोषागारातून घेतला, त्यास श्रीमती गोगटे आणि तत्कालीन जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था संयुक्तरित्या जबाबदार आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांच्या जबाबाची दखल न घेता, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.९.२००७ रोजी त्यांचे अपील नामंजूर केले आहे. त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २३.७.२००७ रोजीच्या प्रथम मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. १.५.९८ ते १७.२.२००० या कालावधीशी संबंधित त्रयस्थ पक्ष श्रीमती गोगटे यांच्याबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - **श्रीमती एस.एस.गोगटे या प्रत्यक्ष कोठे काम करतात, श्रीमती गोगटे यांच्या जागेवर सहायक सहकार अधिकारी म्हणून कोणता कर्मचारी काम करत आहे,त्या कर्मचाऱ्याचे नाव,आणि कोणत्या आदेशाप्रमाणे कार्यरत आहे व सहायक सहकार अधिकारी**

**संलग्न उपनिबंधक सहकारी संस्था,ता.बीड म्हणून नियुक्ती केलेल्या आदेशाची छायांकित सत्यप्रत**-या मुद्यांचा समावेश होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून लेखी आदेशाची छायांकित सत्यप्रत मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ९.८.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस अशी माहिती दिली की, श्रीमती गोगटे दि. १.५.९८ ते १७.२.२००० या कालावधीत त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवर होत्या, परंतु तत्कालीन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांच्या तोंडी आदेशानुसार त्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,बीड यांच्या कार्यालयात कार्यरत होत्या. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.९.२००७ रोजी निर्णय दिला. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, उपनिबंधक सहकारी संस्था,ता. बीड यांनी दि. ९.८.२००७ रोजीच्या पत्रामध्ये श्रीमती गोगटे यांना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,बीड यांच्या तोंडी सूचनेप्रमाणे, उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड यांनी त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्रीमती गोगटे यांना जिल्हा उपनिबंधकांच्या कार्यालयात पाठविले असल्यामुळे श्रीमती गोगटे यांना त्यांच्याकडील कोणत्याही विभागाचे कामकाज सोपविण्यात आलेले नाही,असे नमूद केले आहे. त्यामुळे श्रीमती गोगटे सहायक सहकार अधिकारी यांना उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाच्या संबंधाने दौरे करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे असताना श्रीमती गोगटे यांनी बोगस दौरे करुन प्रवासभत्ता लाटला आहे. एका वेगळया व स्वतंत्र स्तरावरील कर्मचाऱ्यास,त्याचे विहित कामकाज सोडून, दुसऱ्या आस्थापनेवर कामकाज करण्याचे तोंडी आदेश देण्याचे अधिकार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना प्रदान

केले आहेत काय? तत्कालीन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड श्री. बी.एस.नगरनाईक यांच्या मनमानी कारभारामुळे, श्रीमती गोगटे यांनी कोणतेही शासकीय काम न करता वेतन व प्रवासभत्ते लाटले आहेत. या गैरकारभारास श्री. बी.एस.नगरनाईक व श्रीमती गोगटे हे जबाबदार असून शासनाने त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे.

जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील दि. ९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे. त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांचे व जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बीड यांचे कार्यालय एकाच इमारतीमध्ये असून श्रीमती गोगटे यांची बदली उपनिबंधक सहकारी संस्था,ता.बीड यांच्या कार्यालयात झाली होती, त्यामुळे त्यांचे वेतन व इतर भत्ते त्यांच्या आस्थापनेवर काढले. मात्र श्रीमती गोगटे या जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बीड यांच्या तोंडी आदेशावरुन त्यांच्या कार्यालयात म्हणजे जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बीड यांच्या कार्यालयात कार्यरत होत्या व ही माहिती अपिलार्थीस त्यांनी दि. ९.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बीड यांच्या सूचनेनुसार त्यांनी त्यांच्या कार्यालयात म्हणजे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,बीड यांच्या कार्यालयात काम केले आहे.

वरील युक्तिवादावरुन आयोगाचे असे मत झाले आहे की, केवळ प्रशासकीय सोयीकरिता जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बीड यांनी उपनिबंधक,बीड यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्रीमती गोगटे यांना आपल्या कार्यालयात काम करण्याच्या तोंडी सूचना दिल्या. श्रीमती गोगटे यांनी या कालावधीमध्ये शासकीय कामानिमित्त केलेल्या प्रवासासाठी त्यांना देय होणाऱ्या प्रवास भत्त्याच्या अथवा इतर बिलाच्या संदर्भात कार्यवाही करणे ही पूर्णतः संबंधित प्रशासकीय यंत्रणेच्या अखत्यारितील बाब आहे. श्रीमती गोगटे यांनी उचलेल्या प्रवासभत्ता व बील यावर नियंत्रण ठेवणे हे संबंधित प्रशासकीय विभागाचे काम आहे. त्यामुळे अपिलार्थीने उपस्थित केलेल्या या मुद्यांबाबत

आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत. मात्र संबंधित दि. २३.७.२००७ रोजी मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे दि.९.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली आहे. त्यातून प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीस काही आक्षेप असतील तर त्यांनी सदर आक्षेप विभागीय सह निबंधक यांच्याकडे अथवा सहकार विभागातील इतर प्राधिकरणाकडे लेखी नोंदवून आपल्या तक्रारीचा निपटारा करुन घ्यावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कक्षेमध्ये जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य पार पाडले आहे, त्यामुळे अपिलार्थीच्या अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आता उरले नसल्याने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शाहुराव तुकाराम औसरमल, अजिंक्य निवास,अशोकनगर,बार्शी नाका,बीड,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३०६
निर्णय दिनांक १३-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिपक ज्ञानोबा कांबळे<br>रा.अंबाजोगाई,जि. बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, अंबाजोगाई,<br>जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी,<br>अंबाजोगाई,जि.बीड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत कोणतीही माहिती न दिल्याने प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची, त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये नोंद करण्याची व शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची व तसेच वैयक्तिक नुकसान भरपाई रु. १०,०००/- द्यावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.१.२००२ ते दि. १.६.२००७ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्रातील

रोहयो, गावतलाव व इतर योजनांसाठी प्राप्त अनुदानासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. तसेच या अर्जामध्ये अपिलार्थीने ते स्वतः दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.८.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयास, अपिलार्थीस माहिती देण्यापोटीचे आवश्यक ते अनुदान प्राप्त होताच, अपिलार्थीस प्राधान्याने माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या तोंडी युक्तिवादामध्ये मूळ माहितीसाठीच्या मागणीबरोबरच त्यांनी अर्ज केल्यापासून २० महिन्याचा कालावधी लोटूनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने, त्यांच्यावर रु.२५,०००/-दंड व वरिष्ठ पातळीची कारवाई करण्याची शिफारस करण्याची आयोगास विनंती केली आहे आणि या संपूर्ण घटनाक्रमामध्ये त्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागला व वेळ वाया गेला असल्याने, स्टेशनरी, फी,प्रिन्ट,येणे-जाणे यासाठी रु.५०००/- नुकसान भरपाई अदा करण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ५ वर्षाची असून त्यांच्याकडील बहुतेक सर्व योजनांसंदर्भात अपिलार्थीने माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या दि. १.६.२००७ रोजीच्या पत्रास त्यांनी दि. २५.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अनुदान उपलब्ध नसल्याचे प्रथम कळविले होते व तद्नंतर

दि. ६.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पाहून जाण्याचे सूचित केले होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व आवश्यक त्या अनुदानाची अनुपलब्धता यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. आता त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार व ती देण्यासाठी अनुदान उपलब्ध असून अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे निश्चितपणे विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागविली आहे. वास्तविक अशाप्रकारच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींप्रमाणे कार्यवाही करणे त्यांना सहज शक्य होते. तथापि त्यांनी अशी कार्यवाही न करता अपिलार्थीस प्रथमत: त्यांच्या दि. २५.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच, अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक अनुदानाच्या अनुपलब्धतेची कल्पना त्यांना दिली. तद्नंतर अपिलार्थीस त्यांनी दि. ६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या कार्यालयात, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पाहून जाण्याचे सूचित केले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून माहिती कोणत्याही असद्हेतूने दडविली असल्याचे अथवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे नि:संशयपणे जरी सिध्द होत नसले, तरी त्यांनी अपिलार्थीच्या दि. १.६.२००७ रोजीच्या अर्जास अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन, अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला आहे. एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १६.८.२००७ रोजीच्या निर्णयानंतर देखील त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्यासंदर्भात आजपर्यंत कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक कार्यवाही न केल्याचे मात्र आयोगास नि:संशयपणे सिध्द होत असल्याचे आढळून आले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास खचितच पात्र ठरले

आहेत. सबब आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या नुकसान भरपाईच्या मागणी संदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये एकूण रु.१०,०००/- इतक्या नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे. तर लेखी युक्तिवादामध्ये रु.५,०००/- इतक्या नुकसान भरपाईची मागणी केली आणि आज सुनावणीच्या वेळी युक्तिवादामध्ये त्यांनी रु.२५,०००/- नुकसान भरपाईची मागणी केली आहे. अपिलार्थीने अशाप्रकारची विसंगत स्वरुपाची व कोणत्याही तार्कीक निकषामध्ये कशाही प्रकारे न बसणारी मागणी आयोगाकडे मांडली आहे.राज्य माहिती आयोगाने अपिलार्थीकडे, त्यांनी या प्रकरणी केलेल्या खर्चाच्या तपशीलाची माहिती मागितली असता, सदर तपशील त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही कागदपत्रांशिवाय अथवा योग्य तो पुराव्याचा अभाव व विसंगत आणि अतार्कीक स्वरुपाच्या मागणीमुळे अपिलार्थीच्या नुकसानभरपाईची मागणी आयोग फेटाळून लावित आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस,त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

३. आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १३-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिपक ज्ञानोबा कांबळे,हनुमाननगर, पंचायत समितीसमोर, मेन रोड, अंबाजोगाई, जि.बीड-४३१ ५१७.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबाजोगाई,जि.बीड यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे -०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४६
निर्णय दिनांक १३-०२-२००९

१ श्री. रघुनाथ यशवंतराव खोतकर, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय वन अधिकारी (नियोजन),
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः श्री. जी.वाय. सरकटे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.१२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, लिपीक/लेखापाल या पदावरील कर्मचाऱ्यांची घेण्यात आलेली विभागीय

परीक्षा व देण्यात येणाऱ्या पदोन्नती, जेष्ठता सूचिसंदर्भात काही कागदपत्रांची मागणी एकूण ६ मुद्यांद्वारे केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "**१९८४ मधील विभागीय परीक्षेच्या तारखा, परीक्षा निकालाची प्रत, दि. २५.९.२००६ रोजी प्रसिध्दीस दिलेली लेखापालाची अंतिम जेष्ठयतासूची तयार करताना अपिलार्थीचे व त्रयस्थ पक्षाचे विचारात घेतलेले गोपनीय अहवाल, विभागीय निवड समितीच्या सदस्यांची यादी, त्यासाठी बनविण्यात आलेली टिपणी व निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत, मानीव दिनांक अथवा पदोन्नती जे निश्चित करताना लावलेले निकष व नियमाची प्रत, मुख्य लेखापाल पदावर पदोन्नती दिलेल्या संबंधिताच्या आदेशाच्या प्रती, पदोन्नती देण्याऱ्या विभागीय निवड समितीच्या सदस्यांची यादी त्यासाठी बनविण्यात आलेली टिपणी व बैठकीचे इतिवृत्त**" - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १२/- इतके शासकीय कोषागारात भरणा करुन चलन त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने दि. १.११.२००७ रोजी आवश्यक ते चलन जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केले. तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३.११.२००७ रोजी माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.११.२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ४ वगळता उर्वरित माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील निर्णयाची प्रत अपिलार्थीस दिली नाही. तद्नंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.१२.२००७ रोजी काही माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून  अप्राप्त आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास या घटनाक्रमाची माहिती दिली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की,अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी स्वतःच्या आणि त्रयस्थ पक्ष श्री. जी.वाय.सरकटे यांच्या गोपनीय अहवालाच्या प्रतींची मागणी केली आहे. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. कारण ही माहिती अपिलार्थीस दिल्याने अधिनियमातील कलम ८(१) मधील (ङ) व (ञ)चा भंग होईल, असे आयोगास वाटते, सार्वजनिक प्राधिकरणामध्ये पर्यवेक्षण अधिकाऱ्याने त्यांच्या हाताखालील कोणाही कर्मचाऱ्याचे लिहिलेले गोपनीय अहवाल आवश्यक त्या दर्जापर्यंत पोहचत नसतील तर अशाप्रकारामध्ये संबंधित कर्मचाऱ्यांच्या कार्यपध्दतीतील उणिवा त्यांना लेखी स्वरुपात कळविण्याची तरतुद आज रोजी प्रशासनामध्ये प्रचलित आहे. याचबरोबर एखाद्या कर्मचाऱ्यास उत्कृष्ट अथवा अतिउत्कृष्ट काम केले असल्यास ते देखील कर्मचाऱ्यास तोंडी व लेखी स्वरुपात कळविले जाण्याची नियमित पध्दत सार्वजनिक प्राधिकरणामध्ये रुढ आहे, हे पाहता व तसेच कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल एका विशिष्ट विश्वासाने कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केले जात असतात. अशा प्रकारच्या नियमित व रुढ पध्दतीमुळे कनिष्ठ अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांच्यामध्ये विश्वासाश्रित संबंध आपोआप प्रस्थापित होत असतात, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने या संबंधांना तडा जाणार असल्याने अपिलार्थीस स्वतःचे गोपनीय अहवाल ही जन माहिती

अधिकारी यांच्याकडून देय होणार नाहीत, परिणामी स्वतःचे गोपनीय अहवाल देखील देय होत नसल्याने अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाचे देखील गोपनीय अहवाल जन माहिती अधिकारी यांचेकडून आपोआपच देय होऊ शकत नाहीत. अशाप्रकारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती उघड केल्यास, विश्वासाश्रित संबंधांचा भंग होणार असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून  देय असणार नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने निवड समितीच्या सदस्यांकरिता बनविलेली टिपणी व निवडसमितीच्या सदस्यांच्या बैठकीचे इतिवृत्त यांची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. तथापि ही माहिती गोपनीय कारणास्तव जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उघड करण्याचे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे.  अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती निश्चितपणे सार्वजनिक स्वरुपाची आहे. लेखापालाची ज्येष्ठतासूची करताना या संदर्भातील  कोणतीही बाब ही मूळात गोपनीय असूच शकत नाही. निवड समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. या इतिवृत्तामध्ये निवड समितीच्या सदस्यांचे अभिप्राय नोंदविण्यात आलेले असतात, त्यांचे अभिप्राय विभागाच्या वेगवेगळया नस्त्यांमध्ये सहज उपलब्ध असू शकतात, योग्य ती सेवाज्येष्ठता व पद प्राप्त होणे, हा संबंधित कर्मचाऱ्यांचा मूलभूत हक्क असून अशाप्रकारची माहिती अपिलार्थीस नाकारणे म्हणजे संबंधिताचा मूलभूत हक्क डावलल्यासारखे होईल, या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, अपिलार्थीस ही माहिती नाकारण्याचे कोणतेही प्रयोजन जन माहिती अधिकारी यांना उरत नाही, असे आयोगाचे मत आहे. हे पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय ठरत आहे.

वर विवेचन केल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र. ३ ची माहिती देय असणार नाही व मुद्दा क्र. ४ ची माहिती देय असणार आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

कृमा.पृ.५..

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अ[illegible] ४ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच त्यांना [illegible] आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रघुनाथ यशवंतराव खोतकर,लेखापाल, उपवनसंरक्षक (वन्य जीव) औरंगाबाद यांचे कार्यालय,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांचे कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५०
निर्णय दिनांक १३-०२-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
अर्धापूर जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, अर्धापूर,
जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. देसाई.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,अर्धापूर यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने प्रथम अपील दाखल करुन सुध्दा त्यांना माहिती देण्याचे संबंधितांकडून विलंब व टाळाटाळ होत असल्याने विचाराधीन अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे केला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.४.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दि. १.४.९९ ते ३१.३.२००७ या कालावधीमधील संबंधित स्वस्तधान्य दुकानांमार्फत शासनाकडून वितरण करण्यात येणाऱ्या धान्य-केरोसिनबाबत काही माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे मागितली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांच्याकडे दि. १२.६.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविला असून त्याबाबतची पोच जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाने दि. १३.६.२००७ रोजी दिलेली आहे. यावरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून येते. मात्र यावर सुनावणी झाल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी झाली किंवा कसे, हे आयोगास अवगत करुन देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीस, या संदर्भात कोणतीही माहिती नाही,याबाबत ते पूर्णतः अनभिज्ञ आहेत, अशा परिस्थितीत अपिलार्थीच्या दि. १२.६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दि. १२.६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत.सदर सुनावणीसाठी अपिलार्थीस किमान एक आठवडा अगोदर पूर्वसूचना (नोटीस) पाठविण्यात यावी. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न

झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१२.६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपूराच्या पाठीमागे, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५१
निर्णय दिनांक   १३-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सौदागर महंमद वसीम<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>धर्माबाद, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, धर्माबाद,<br>जि.नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत तर, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने दि. १२.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल करुन सुध्दा त्यांना माहिती देण्याचे संबंधितांकडून विलंब व टाळाटाळ होत असल्याने, विचाराधीन अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे केला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.४.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दि. १.४.२००४ ते मार्च,२००७ या कालावधीशी संबंधित स्वस्त धान्य दुकानांमार्फत शासनाच्या विविध योजनांद्वारे होणाऱ्या वितरणाबाबत काही माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे मागितली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद यांच्याकडे दि. १२.६.२००७ रोजी प्रथम अपील केले सदर अपील अर्ज त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविला असून त्याबाबतची पोच जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाने दि. १४.६.२००७ रोजी दिलेली आहे. यावरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून येते. मात्र यावर सुनावणी झाल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी झाली किंवा कसे, हे आयोगास अवगत करुन देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांना या संदर्भात कोणतीही माहिती नसल्याचे त्यांनी आयोगास आज सुनावणीच्या वेळी सांगितले. तेव्हा अशा परिस्थितीत अपिलार्थीच्या दि. १२.६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. अपिलार्थीच्या दि. १२.६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत.सदर सुनावणीसाठी अपिलार्थीस किमान एक आठवडा अगोदर पूर्वसूचना (नोटीस) पाठविण्यात यावी. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१२.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निणृय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल,रा. समिराबाग, खडकपूराच्या पाठीमागे,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३०
निर्णय दिनांक १६-०२-२००९

१. श्री. संजय विष्णू जगताप, : अपिलार्थी
रा.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
आस्थापना विभाग (परिक्षा नियंत्रण कक्ष),
जिल्हा न्यायालय,अहमदनगर
जि. अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा न्यायाधीश १,
जिल्हा न्यायालय,अहमदनगर,
जि.अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी: जिल्हा न्यायाधीश-१व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
जिल्हा व सत्र न्यायालय,अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १२.५.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी कोणतीही विशेष अशी विनंती केल्याचे आयोगास आढळून येत नाही, मात्र त्यांनी सदर अपील दि. ३.४.२००८ रोजीच्या त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयाच्या विरुध्द केल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः दि. २८.२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा न्यायालयातील लिपीक व शिपाई पदासाठी केलेल्या भरतीबाबत दि. १.१.२००८ ते २९.२.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १.३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारताना दर्शविण्यात आलेल्या कारणांमध्ये जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीचा अपूर्ण अर्ज, मागणी केलेली माहिती ही जन सामान्यासाठी प्रसिध्द केलेल्या साहित्यातून मागितली असल्याने, कमी किंमतीचे तिकीट लावल्याने, अर्जामध्ये कालावधी नमूद केलेला नसल्याने व टपालाचा खर्च असे मुद्दे दशविले आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ६.३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आपला निर्णय कळविला असून अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाची प्रमाणित प्रत जोडली नसल्याने, आवश्यक त्या कोर्ट फीसचा भरणा न केल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील न चालविण्यायोग्य आहे, असा निष्कर्ष काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाचे विरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २८(१) च्या तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या

सक्षम प्राधिकरणाने जिल्हा न्यायालयाकरिता माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी करण्याकरिता अधिनियमातील तरतुदींसंदर्भात त्यांच्या विभागाचे स्वतःचे वेगळे नियम तयार केले आहेत. या नियमांप्रमाणे अपिलार्थीस माहितीसाठीचा मूळ अर्ज करताना रु.१२/- इतक्या किमतीचे कोर्ट-फी-स्टॅम्प व प्रथम अपील अर्जावर रु.४०/- इतक्या किंमतीचे कोर्ट-फी-स्टॅम्प डकविणे अनिवार्य होते. तथापि प्रत्यक्षात अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपीलावर आवश्यक त्या रकमेचे कोर्ट फी स्टॅम्प लावलेले नाहीत. त्याचबरोबर मा. जिल्हा न्यायालयाने घेतलेल्या अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भातील निर्णयाची प्रत प्रथम अपील अर्जासोबत जोडणे अनिवार्य असताना, अपिलार्थी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जासोबत त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत जोडली नव्हती. या दोनही कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज नामंजूर केला आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे मूळ अर्जावर व प्रथम अपील अर्जावर घेतलेले निर्णय हे जिल्हा न्यायालयाने तयार केलेल्या त्यांच्या स्वतंत्र अधिनियमानुसार घेतलेले आहेत. ही कार्यवाही राज्य शासन, राजपत्र, असा.,९ डिसेंबर, २००६ रोजी प्रसिध्द झालेली अधिसूचना क्र.No.P.07002/2006 – THE MAHARASHTRA DISTRICT COURTS RIGHT TO INFORMATION RULES, 2006 नुसार केलेली आहे. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात वेगळयाने बदल करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत.अपिलार्थी यांना जिल्हा न्यायालयाकडे माहिती मागवितांना विहित केलेली कार्यपध्दती, आवश्यक कोर्ट-फी-स्टॅम्प व इतर तपशील उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस समजावून सांगण्याचे मान्य केले. अपिलार्थीने त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून कोणत्याही प्रकारची उणीव त्यांच्या अर्जामध्ये यापुढे राहणार नाही, याची दक्षता घेऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत नव्याने अर्ज करावा, असे त्यांना सूचित करण्यात येते.

प्रसंगावशात, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जिल्हा न्यायालयाच्या अपील ठरविण्याच्या पध्दतीमध्ये, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोन्ही बाजूंना आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन नंतर अपिलावर निर्णय घेण्यात यावा, असे नमूद केलेले आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर निर्णय घेताना उपस्थित राहण्याविषयीची कोणतीही सूचना दिली गेली नव्हती, असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये आयोगास सांगितले आहे व त्यामध्ये आयोगास तथ्यांश आढळला आहे. सबब हा मुद्दा जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या पुढील अपील प्रकरणी निर्णय देताना लक्षात घ्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय विष्णू जगताप, एन.सी.सी.ऑफीसजवळ, सावेडी गाव, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३१
निर्णय दिनांक  १६-०२-२००९

१. श्री. प्रकाश धर्मराज गुळवे, : अपिलार्थी
रा.नान्नज,अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी उस्मानाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: समन्वय भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी: अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष: श्री. धर्मा गणपती गुळवे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २३.५.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांच्या दिनांक २८.१.२००८ रोजीच्या अर्जानुसार त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी

यांनी चुकीच्या पध्दतीने त्यांचा अर्ज निकाली काढून योग्य तो निर्णय दिला नसल्याने त्यांनी सदरचे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, - **त्यांनी दि. ३.२.२००७ रोजी दिलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी आजवर काय कार्यवाही केली आहे, नुकसान भरपाई मिळणार किंवा नाही, -** ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्याकडे केला होता. तथापि या प्रकरणी समन्वय भूसंपादन अधिकारी, उस्मानाबाद हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे अपिलार्थीचा सदरचा अर्ज दि. २.२.२००८ रोजीच्या पत्रासोबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी समन्वय, भूसंपादन अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तसेच या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कडून कोणतेही पत्र प्राप्त न झाल्याचे उपस्थित असलेले अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याचे सांगितल्यावरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज नामंजूर केला व तसे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी आयोगाच्या कार्यालयातून सुनावणीसाठी दि. ५.२.२००९ रोजी लेखी सूचनापत्र

(नोटीस) तसेच दि. ९.२.२००९ रोजी स.११.१५ वा. दूरध्वनीद्वारे त्यांच्या कार्यालयातील श्री.रणसुब्बे,पी.ए.यांच्यामार्फत निरोप देऊन देखील ते अथवा त्यांच्या कार्यालयातील त्यांचा प्रतिनिधी सुनावणीस उपस्थित नाहीत. त्यांच्या अशाप्रकारच्या विनापरवानगी गैरहजेरीबाबत आयोगातर्फे तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ९.४.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, त्यांच्याकडे झालेल्या सुनावणीसाठी अपिलार्थी हे अनुपस्थित होते. या सुनावणीच्या वेळी उपविभागीय अधिकारी, भूम यांनी समन्वय भूसंपादन अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस त्यांच्या दि. २८.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविण्यात आल्याचे सांगितल्याने अपिलार्थीस माहिती उपलब्ध झाली आहे, असा निष्कर्ष काढून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज नामंजूर केला. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती दिल्या संदर्भातील कागदपत्रे तपासली किंवा कसे याचा कोणताही उल्लेख या निर्णयामध्ये नाही. अपिलार्थी यांना भूसंपादन अधिकाऱ्यांची कथित दि. २८.२.२००८ रोजीच्या पत्राची प्रत मिळाल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये अपिलार्थीच्या दि. ३.२.२००७ रोजीच्या अर्जावर झालेली कार्यवाही स्पष्ट केलेली आहे. फक्त जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २८.२.२००८ रोजी त्यांच्या कथित पत्राची प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, एवढाच मुद्दा या ठिकाणी शिल्लक राहत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील इतर मुद्यांबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, हे पाहता, आता अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी  यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील, "अपिलार्थीच्या दि. ३.२.२००७ रोजी दिलेल्या अर्जावर त्यांनी केलेली कार्यवाही" या मुद्यासंदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश धर्मराज गुळवे,मु.पो. नान्नज, ता.जामखेड, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा समन्वय भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३२
निर्णय दिनांक १६-०२-२००९

१. श्री. तुकाराम विश्वनाथ किलबीले, : अपिलार्थी
रा.कोरडगाव ता.पाथर्डी, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पाथर्डी, जि. अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, पाथर्डी, जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २७.५.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०५.२००८ रोजी नोंदविलेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने आज सुनावणीच्या सुरुवातीसच त्यांचे दि. १३.२.२००९ रोजीचे शपथपत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज सादर केल्यानंतर, मिळाली असल्याने आयोगाकडील विचाराधीन अपील क्र. ३२/२००८ हे चालविण्याची त्यांना आता आवश्यकता राहिली नाही. त्यामुळे त्यांचे सदरचे अपील काढून घेण्यात यावे.

खुद्द अपिलार्थीस विचाराधीन अपील चालविण्यामध्ये कोणतेही स्वारस्य राहिले नसल्याने व त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी कबूल केले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील क्र.३२/२००८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ३२/२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तुकाराम विश्वनाथ किलबीले, द्वारा. नागनाथ बाबूराव किलबीले,मु.पो.कोरडगाव ता.पाथर्डी जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पाथर्डी, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पाथर्डी, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३
निर्णय दिनांक १६-०२-२००९

१. श्री. नागनाथ बाबुराव किलबिले, : अपिलार्थी
रा.कोरडगाव ता.पाथर्डी,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,नगर भाग,
जि. अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, नगर भाग,
जि. अहमदनगर

त्रयस्थ पक्षः श्री. अण्णासाहेब रतन खंडागळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २३.५.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांच्या सहीचे दि. १३.२.२००९ रोजीचे शपथपत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने आयोगाकडील अपील क्र. ३३/२००८ चालविण्याची त्यांना कोणतीही आवश्यकता राहिलेली नसल्याने सदर अपील काढून टाकण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच, त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने अपील मागे घेण्याची विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील क्र.३३/२००८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ३३/२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नागनाथ बाबूराव किलबिले, रा. कोरडगाव ता.पाथर्डी जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय,नगर भाग, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,नगर भाग जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३४
निर्णय दिनांक १६-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सुभाष साहेबराव गर्जे<br>रा. मोहोज देवढे, ता. पाथर्डी, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग पाथर्डी,<br>जि. अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>रो. ह.यो. (कार्य) विभाग<br>अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १४.५.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.१.२००८ रोजी अर्ज करुनही अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नाही. दि. ११.३.२००८ रोजी कार्यकारी अभियंता रोहयो (कार्य) यांच्याकडे दि. ८.४.२००८ रोजी सुनावणी होऊन त्यांनी

आदेशित करुनही अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्या दि. १७.१.२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोहोज देवढे ता. पाथर्डी ते बहिरवाडी या रस्त्याच्या कामासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **कामाचे अंदाजपत्रक, काम कोणत्या योजनेतून घेण्यात आले, काम पूर्ण झाले आहे काय, नसल्यास काय व का अपूर्ण आहे, रोहयोतून झाले असल्यास मजूरांचे हजेरीपत्रक** - या मुद्यांचा समावेश होता. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ८.४.२००८ रोजी सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व सुनावणीमध्ये ठरल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. १७.४.२००८ पर्यंत माहिती देण्याचे आदेशित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांना आजच्या सुनावणीची लेखी कल्पना आयोगाच्या कार्यालयातून दि. ५.२.२००९ च्या पत्राद्वारे तसेच दूरध्वनीद्वारे दि. ९.२.२००९ रोजी श्री. गोरे या कर्मचाऱ्यामार्फत देऊनही आज सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी हजर नाही. आजच्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही कोणतीही माहिती उपलब्ध झाली नसल्याचे आयोगास सांगितले.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचा कोणताही प्राधिकृत कर्मचारी आयोगासमोर उपस्थित नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली गेली नसल्याचा आयोग निष्कर्ष काढत आहे.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीच्या दि. १७.१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ नुसार ही माहिती मागण्याचा अपिलार्थीस हक्क आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ नुसार बंधनकारक आहे. तथापि असे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हेतर, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या दि. २१.४.२००८ रोजीच्या निर्णयानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजतागायत माहिती पुरविली नाही. अपिलार्थीस माहिती न पुरविण्यासाठीचे कोणतेही समर्थनीय कारण आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अपिलार्थीस माहिती दिल्याने अधिनियमातील कलम ८ अथवा ९ च्या तरतुदींचा भंग होतो अशातील कोणतीही बाब येथे, या प्रकरणी संभवत नाही, असे असताना देखील अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या मनातील ईच्छाशक्तीचा अभाव हेच कारण असू शकते, मात्र हे कारण अपिलार्थीस माहिती न देण्याचे कोणत्याही प्रकारे समर्थन करु शकत नाही. कारण जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ नुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पूर्णपणे बांधील आहेत. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी हेच या प्रकरणी नि:संशयपणे जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न देऊन स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीमध्ये

स्पष्ट केलेल्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय आजपावेतो न दिल्याने त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ सादर करावा, या कालावधीमध्ये त्यांचा कोणताही खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी, तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व पोस्टाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/-इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : १६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष साहेबराव गर्जे, मोहोज देवढे ता.पाथर्डी, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता रो.ह.यो.(कार्य) विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५
निर्णय दिनांक १६-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख अल्ताफ रहीम,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकुन नं.३,<br>तहसील कार्यालय, खटाव (वडूज)<br>जि.सातारा. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>खटाव (वडूज) जि. सातारा | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३१.०३.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयाकडे दि.४.४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही त्यांना आवश्यक असलेली माहिती दिली गेली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे -

**"मौजे ललगुण ता.खटाव जि.सातारा येथील शेतजमीन जुने सर्व्हे नं. १९२/१, २१७/१, २१७/३, २१८/१ व २९१ चे नवीन गट नं. ९११, १०२२,१०२३, १०२४, १११ चे चालू वर्षाचे ७/१२ च्या उताऱ्याच्या प्रती."** ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.२.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी हजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी हे, आयोगातर्फे त्यांना आजच्या सुनावणीची लेखी कल्पना दि. ५.२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे तसेच दूरध्वनीद्वारे दि. ९.२.२००९ रोजी दुपारी १२.२५ वाजता श्री.गणकपूर,तहसीलदार यांना देऊनही आज सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी हजर नाही. आजच्या सुनावणीसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे त्यांना दि. ९.२.२००९ रोजी फॅक्सद्वारे देखील पाठविली आहेत.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २७.१२.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. तसेच त्यांनी दि. ११.२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यांना ज्या जमिनीचे ७/१२ चे उतारे हवे आहेत, ते त्यांच्या

वडिलोपार्जित मिळकतीचे आहेत. या प्रकरणी त्यांना माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक टाळले गेले व त्यातून त्यांना मानसिक ताण जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे दिला गेला. त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी जाणीवपूर्वक अडवणूक केली व अशाच प्रकारे सर्व जनसामान्यावर या विभागातील कर्मचारी कायम अन्याय करीत असतात, ही बाब अत्यंत निंदनीय आहे. त्यामुळे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अत्यंत कडक व कायदेशीर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये केली.

त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे त्यांनी दि. २९.९.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळा अर्ज केल्यानंतर दि. १६.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटीचे शुल्क भरण्यास सूचित केले व त्यांनी मनीऑर्डरने आवश्यक ते पैसे पाठविल्यानंतर अंदाजे १०-१२ दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली. त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांची त्यांना आजही निकड आहे व ही कागदपत्रे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. २७.१२.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात विनामूल्य प्राप्त व्हावीत, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आधी नमूद केल्याप्रमाणे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी कोणीही आयोगासमोर आयोगाने दूरध्वनीद्वारे सूचित करुनही उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२.२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास असे कळविले आहे की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. २९.९.२००८ रोजी अर्ज केला असता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दि. १.१२.२००८ रोजी दिली आहे व या प्रकरणी अपिलार्थीची काहीही तक्रार नसल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि.

१२.२.२००९ रोजीच्या पत्रामध्ये दि. २७.१२.२००७ रोजीच्या अपिलार्थीच्या अर्जाचा कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या संदर्भ दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधित दि. २७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे येथे नि:संशयपणे सिध्द होत आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या, "अपिलार्थीची कोणतीही तक्रार नाही" या विधानावर आक्षेप घेतला असून त्यांची या प्रकरणी तक्रार असल्याचे व जन माहिती अधिकारी यांना दंडीत करण्याचे आयोगापुढे आग्रही प्रतिपादन केले आहे. आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे विनापरवानगी गैरहजर आहेत. अपिलार्थीच्या युक्तिवादातील विधानाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर हजर नाहीत तसेच आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या दि. २७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अक्षम्य उपेक्षा केल्याचे आयोगास प्रतीत होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाद्वारे जन माहिती अधिकारी यांनी, स्वत:ला अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीमध्ये स्पष्ट केलेल्या कारवाईस नि:संशयपणे पात्र ठरविले आहे. तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ११.२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेऊन अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीचा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई पुरपूर स्पष्ट केली असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे.

या घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देणे, ही बाब जन माहिती अधिकारी यांना अशक्यप्राय होती, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या मनातील ईच्छाशक्तीचा व क्रयशक्तीचा अभाव हेच अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्याचे कारण असल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस ही माहिती मागण्याचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ च्या तरतुदीप्रमाणे हक्क आहे व अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती

देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार बांधील आहेत, हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी निःसंशयपणे अधिनियमातील कलम ७ चा भंग केल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यासाठी पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी, आयोगासमोर त्यांची बाजू मांडण्यासाठी उपस्थित नसल्याने, यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस मूळ अर्जान्वये मागणी केलेली आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याने त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ सादर करावा, या कालावधीमध्ये त्यांचा कोणताही खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांचे या प्रकरणातील वर्तन देखील आक्षेपार्ह असून जिल्हाधिकारी, सातारा यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, खटाव (वडूज) जि.सातारा यांच्या या प्रकरणातील बेजबाबदार व बेपर्वा कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी लागणार आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व पोस्टाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : १६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अल्ताफ रहिम, हाजी इब्राहिम इस्टेट, स्टेशनरोड, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन नं.३, तहसील कार्यालय, खटाव (वडूज), जि.सातारा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, खटाव (वडूज) जि.सातारा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, सातारा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६
निर्णय दिनांक १६-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. संदिपान शकर गीते,<br>रा.दिघोळ, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी (ग्रामसेवक)<br>ग्रामपंचायत, दिघोळ, ता.जामखेड,<br>जि. अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,<br>जामखेड, जि.अहमदनगर | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.५.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०५.२००८ रोजी नोंदविलेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. १०.२.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पूर्ण माहिती दाखविली असून

ही माहिती पाहिल्याने त्यांचे समाधान झाले आहे, तसेच आयोगाकडे त्यांनी कोणतेही अपील केले नव्हते. त्यांच्या सारखीच सही करुन दुसऱ्याच कोणा अज्ञात व्यक्तीने आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी या पत्रावर त्यांचे अभिप्राय नोंदवून अपिलार्थी यांनी त्यांना त्यांच्या कार्यालयात दि. १०.२.२००९ रोजी दिघोळ येथे सदर पत्र दिल्याचे नमूद केले आहे.

सदर घटनाक्रमाचे खंडन करण्यासाठी अथवा युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर सुनावणीस उपस्थित नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या त्यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणीस देखील ते उपस्थित नसल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आयोगामार्फत प्राप्त करुन घेण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील क्र.३६/२००८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. ३६/२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संदिपान शंकर गीते, मु. पो. दिघोळ ता. जामखेड जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत दिघोळ, ता.जामखेड, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जामखेड जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७
निर्णय दिनांक १६-०२-२००९

१. श्री. स्वप्नील रामचंद्र बोपर्डीकर, अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक विभाग,नाशिक. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक विभाग,नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: १) कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमि अभिलेख नाशिक प्रदेश नाशिक यांचे कार्यालय,नाशिक
२) वरिष्ठ लिपीक, अधीक्षक भूमि अभिलेख अहमदनगर यांचे कार्यालय,अहमदनगर

त्रयस्थ पक्षः श्री. रामदास आगवणे, श्री. बाफना,श्री.व सौ.धोडपकर, श्री. जोशी, श्री. जहागीरदार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०५.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे एकाच कार्यालयात असूनही त्यांनी ९० दिवसांत कोणतीही माहिती दिली नाही, त्यांचे अखत्यारितील माहिती असताना त्यांनी अपिलार्थीस कनिष्ठ कार्यालयास माहिती देण्याचे सांगून वेळ दवडला, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले असून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना शासकीय खर्चाने मिळावी व या प्रकरणात सविस्तर चौकशी होऊन, जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडनीय कार्यवाही व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील कामकाजाशी संबंधित १ जुलै, २००४ ते जून २००७ या कालावधीमधील एकूण २४ मुद्यांवरील माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती. या माहितीपैकी काही माहिती त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज उपसंचालक भूमी अभिलेख, नाशिक विभाग यांना उद्देशून केला होता. सदर अर्ज उपसंचालक यांच्या कार्यालयात दि. २०.२.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. २२.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस या अर्जासंदर्भात प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधीक्षक,भूमी अभिलेख अहमदनगर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून घेण्याचे सूचित केले व अपिलार्थीचा मूळ अर्ज अधीक्षक भूमी अभिलेख अहमदनगर यांच्याकडून पाठवून दिला. तदनंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी दि. २१.४.२००८,१२.५.२००८ व ९.६.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता अपिलार्थी हे गैरहजर राहिले, त्यामुळे अंतिमतः अपिलार्थीच्या गैरहजेरीत दि.१६.७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांची बाजू श्री. सु.बं.धोडपकर यांना मांडण्याची अनुमती द्यावी. अपिलार्थीची ही विनंती आयोगाने मान्य केली. श्री. सु. बं.धोडपकर यांनी, अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे व भूमी अभिलेख कार्यालयाकडून माहिती अधिकार अधिनियमाची कोणतीही तमा बाळगली जात नसल्याचे व या कार्यालयाकडून कोणतीही माहिती प्राप्त होत नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक,भूमि अभिलेख,नाशिक प्रदेश नाशिक यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जास दि. २२.२.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अधीक्षक, भूमी अभिलेख, अहमदनगर यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले होते. तसेच त्यांच्या दि. २५.४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४०८/- इतके भरण्यासाठी सूचित केले.

त्रयस्थ पक्षाने त्यांच्या संबंधातील अपिलार्थीने विचारलेली माहिती अपिलार्थीस उघड करण्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा दि. १५.२.२००८ रोजीचा मूळ अर्ज उपसंचालक कार्यालयात प्रत्यक्षतः दि. २०.२.२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती भूमी अभिलेख, अहमदनगर यांच्या कार्यालयाशी संबंधित होती. त्यामुळे या प्रकरणी उपसंचालक कार्यालयाने त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती अपिलार्थीस त्यांनी स्वतः देण्यासंदर्भात कार्यवाही करणे व उर्वरित मुद्यांसंदर्भातील माहिती देण्यासाठी अहमदनगर कार्यालयास सूचना देऊन त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते, त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीचा दि. २०.२.२००८ रोजीचा अर्ज अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत दि. २२.२.२००८ रोजी अहमदनगर येथील कार्यालयास

पाठविला, त्या कार्यालयाने दि. १९.३.२००८ रोजी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु. १३८/- भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला नाही, तदनंतर उपसंचालक,भूमि अभिलेख नाशिक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४०८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या प्रकरणी असे दिसून येते की, अधीक्षक,भूमि अभिलेख, अहमदनगर या कार्यालयाने अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. मात्र उपसंचालक,भूमि अभिलेख,नाशिक कार्यालयाने अपिलार्थीस अधिनियमाद्वारे सशुल्क माहिती देण्यासाठी असलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे या प्रकरणी उपसंचालक कार्यालयाशी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय आहे. मात्र अधीक्षक भूमी अभिलेख, अहमदनगर यांच्याशी संबंधित माहिती अपिलार्थीस सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. अपिलार्थीच्या दि. १५.२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण २४ मुद्यांवरील माहिती पैकी अपिलार्थीस मुद्दा क्र. ३,१६,१७ अंशतः, १८ अंशतः, १९,२०,२२,२३ अंशतः व २४ या मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस देय नाही. कारण या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबत कारणे व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणत्याही अर्जदाराने अधिनियमातील तरतुदींच्या आधारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यानंतर प्रथमतः अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अर्जदारास माहिती देण्यासंदर्भात निर्णय घेणे व माहिती देण्याचा निर्णय झाल्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्जदारास माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रकिया यामध्ये अभिप्रेत असल्याचे दिसून येते. 'माहिती' या शब्दाच्या स्पष्ट केलेल्या व्याख्येमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या निर्णयाबद्दल अथवा कृतीबद्दल कोणतीही कारणे

व खुलासे अर्जदारास देणे देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्रयस्थ पक्षाचे गोपनीय अहवाल, त्यांनी प्रतिकूल शेरे कळविले असल्यास त्या पत्राच्या प्रती, अशास्वरुपातील त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागितली आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाशी संबंधित मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नसल्याची, मात्र अशी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीमध्ये आगंतुक हस्तक्षेप होणार असल्याची आयोगाची खात्री होत असल्याने, ही माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १७ मधील - "दि. ६.३.२००७ रोजी प्राप्त झालेल्या फॅक्स संदेशाद्वारे काय कार्यवाही केली", मुद्दा क्र. २३ मधील "तत्कालीन कार्यालय प्रमुखांवर ० ते ३ वर्षात केलेल्या शिस्तभंगांच्या कारवाईची माहिती." अपिलार्थीस देय ठरते. सबब वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीस देय असलेली, अहमदनगर येथील कार्यालयातील माहिती सशुल्क व उपसंचालक कार्यालयातील माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, ही माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने टाळल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांच्या कार्यालयातील संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी व उपसंचालक, भूमि अभिलेख, नाशिक कार्यालयातील संबंधित माहिती त्यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. स्वप्नील रामचंद्र बोपर्डीकर, श्री कॉलनी, कोर्ट कॉलनीजवळ, भूतकरवाडी, अहमदनगर, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमि अभिलेख नाशिक प्रदेश नाशिक यांचे कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, अधीक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर यांचे कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख,नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३८
निर्णय दिनांक १६-०२-२००९

१. श्री. बाळासाहेब भिवसेन काटे, : अपिलार्थी
रा.आखेगाव डोंगर, ता. शेवगाव,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पोलीस उपनिरीक्षक,पोलीस स्टेशन,शेवगाव,
जि.अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर

जन अपिलीय अधिकारीः अपर पोलीस अधीक्षक,अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०८.०५.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयाकडे दि.१३.५.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये - **जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ६.७.१९९५, ९.१.२००१ व ५.७.२००३ रोजी केलेल्या फिर्यादीत आरोपींवर का कार्यवाही करता येत नाही, याची सविस्तर माहिती व सदरच्या तीनही फिर्यादीची गुन्हा रजिस्टरला नोंद केली असल्यास रजिस्टरचा गुन्हा नंबर** - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, "अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या तक्रारीसंदर्भात गुन्हा रजिस्टरला कोणतीही नोंद घेतली नसल्याचे व त्याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन २००२ व २००३ या कालावधीमधील असल्याने व सदर अर्ज रजिस्टरची मुदत संपल्याने व सदरचे रेकॉर्ड उपलब्ध नसल्याने, अपिलार्थीस मिळू शकत नसल्याचे", अपिलार्थीस कळविले. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१.२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही स्पष्ट आदेश दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२७.११.२००७ रोजीचे पत्र दिल्याचे त्यांनी या निर्णयामध्ये नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित अभिलेखे जतन करण्याचा कालावधी संपुष्टात आल्याने त्यांच्या कार्यालयाकडून नष्ट केली गेली असण्याची शक्यता आयोगासमोर वर्तविली. तसेच त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या तक्रारी संबंधात त्यांच्या कार्यालयातील गुन्हा

रजिस्टरची तपासणी केली असता, अपिलार्थीच्या अर्जातील तक्रार अर्जासंदर्भात कोणत्याही गुन्हयाची नोंद झाली नाही, असे त्यांना आढळून आले आहे. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी माहिती नष्ट केल्याबाबतचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध असल्यास त्या पुराव्याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी, अशी आयोगास विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात अशाप्रकारच्या पुराव्याचा शोध घेऊन अपिलार्थीस सदर पुरावा तीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्याचे आयोगास आश्वासित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी अपेक्षिलेला, त्यांच्या कार्यालयातील अभिलेखे नष्ट केल्याचा योग्य तो पुरावा अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली, त्यांच्या कार्यालयातील संबंधित अभिलेखे नष्ट केल्यासंदर्भातील पुराव्याची प्रत, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर**
**दिनांक : १६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब भिवसेन काटे, मु.पो.आखेगाव डोंगर, ता. शेवगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) अहमदनगर यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९
निर्णय दिनांक १६-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. रामदास वसंतराव वैद्य,<br>रा.श्रीरामपूर,जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>उपविभाग,राहुरी,<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग राहुरी,<br>जि.अहमदनगर | | |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः कार्यकारी अभियंता,
रो.ह.यो.(कार्य) विभाग,
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १४.५.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सात्रळ,सोनगाव,धानोरे बाहयरस्ता ता. राहुरीच्या संदर्भात दि. ३१.३.२००६ ते ३१.३.२००८ या कालावधीशी संबंधित एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये, - **रस्त्याच्या कामाच्या अंदाजपत्रकांची साक्षांकित प्रत, मोजमाप पुस्तिकेची साक्षांकित प्रत, रस्त्यावर वापरलेले डांबर मेट्रीक टनामध्ये, भरलेल्या डांबर टँकरची वजन स्लीप व रिकाम्या डांबर टँकरची वजन स्लीप, प्रत्यक्ष प्राप्त झालेले डांबर व रस्त्यावर वापरलेल्या खडीचा प्रकार मि.मि.मध्ये** - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज उपविभागीय अभियंता, राहुरी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांच्याकडे केला होता. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.१.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदरचा अपील अर्जदेखील अपिलार्थीने उपविभागीय अभियंता, राहूरी सार्वजनिक बांधकाम यांना उद्देशून केला होता. तथापि संबंधित उपविभागीय अभियंता यांनी या प्रकरणी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज, ज्या प्राधिकरणाची प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे, ते प्राधिकरण - कार्यकारी अभियंता, रोहयो (कार्य) विभाग,अहमदनगर यांच्याकडे पाठविला नाही, परिणामी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही होऊ शकली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविल्याचे आयोगासमोर सांगितले.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत, त्यामुळे अपिलार्थीचे या प्रकरणी काय म्हणणे आहे, हे आयोगास नोंदवून घेता आले नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रोहयो यांच्यामार्फत सुनावणी होणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते, सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. २९.१.२००८ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. सदर सुनावणीसाठी अपिलार्थीस किमान एक आठवडा अगोदर लेखी पूर्वसूचना प्राप्त होईल अशी व्यवस्था जन अपिलीय अधिकारी यांनी करावी. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २९.१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले नि-र्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : १६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामदास वसंतराव वैद्य,द्वारा दर्पण ज्वेलरीज, श्री. हनुमान मंदिरासमोर, रेल्वेस्टेशनजवळ, श्रीरामपूर जि.अहमदनगर-४३१ ७०९.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,राहुरी,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,रो.ह.यो.(कार्य) विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०

निर्णय दिनांक १७-०२-२००९

१ श्रीमती बुचके आशा दत्तात्रय, : अपिलार्थी
व्दारा श्री. मुळे प्रमोद विष्णू,
चिकटे इलेक्ट्रिकल्सचे मागे, जुनी बैठी गिरमे चाळ,
कोपरगाव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल सुरेगाव,
तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सचिव, संजीवनी ग्रामिण शिक्षण संस्था,
कोपरगाव, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी ह्या हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणूनबुजून व हेतुपुरःस्सर माहिती देण्यास टाळाटाळ केली व अद्यापही त्यांना माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या सेवेसंदर्भात शैक्षणिक वर्ष १९९९-२००० ते २००६-२००७ या कालावधीशी संबंधीत एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही निर्णय दिला नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी ह्या हजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे आयोगाच्या कार्यालयातर्फे त्यांना दिनांक ०५-०२-२००९ अन्वये लेखी नोटीस पाठवून व आयोगाच्या कार्यालयाने दिनांक ०९-०२-२००९ रोजी दुपारी ३-०० वाजता दूरध्वनीव्दारे मुख्याध्यापक श्री. मंडलीक यांच्यामार्फत निरोप देऊनही गैरहजर आहेत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या वीना परवानगी गैरहजेरीबद्दल आयोग तीव्र नापसंती व्यक्त करत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी पूर्वी केलेल्या एका

वेगळ्या अर्जासंदर्भात त्यांना त्यांच्या सेवेविषयी काही माहिती प्राप्त झाली. त्यांनी या संस्थेमध्ये सात वर्षे काम करुनही त्यांना सेवेत कायम करण्यात आले नाही, त्यांना अनुभवाचा दाखला व नो ड्यूज सर्टिफिकेट संबंधीत संस्थेकडून अपेक्षित आहे. तथापि ते देखील संबंधीत संस्थेने त्यांना न देता यासंदर्भात त्यांना वारंवार अपमानित केले आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही लेखी युक्तिवाद आयोगास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जास व दिनांक २५-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती अधिकारी व संबंधीत संस्थेच्या सचिवांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. सदर शाळेला शासनाकडून नियमित अनुदान प्राप्त होत असल्याने या शाळेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो. अपिलार्थीच्या दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. आज रोजीच्या सुनावणीसाठी आयोगाच्या कार्यालयातून एक आठवडा आधी दूरध्वनीव्दारे स्वतः जन माहिती अधिकारी यांना निरोप देऊनही आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर ते अथवा त्यांचा प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांनी आपल्या या कृतीव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे असे आयोगाचे मत झाले आहे. सबब संबधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक न्यू इंग्लिश स्कूल, सुरेगाव यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत, सरळ आयोगास सादर करावा. विहित

मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड टपालाव्दारे पुरवावी. अपिलार्थीने त्यांना संबंधीत संस्थेकडून अनुभव प्रमाणपत्र व नो ड्यूज सर्टिफिकेट आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले आहे. यासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी स्वतः लक्ष घालून अपिलार्थीस आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत शिक्षण संस्थेकडून प्राप्त होण्याच्या दृष्टीने योग्य ती कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड टपालाव्दारे पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल सुरेगाव, तालुका कोपरगांव यांना उपरोक्त प्रकरणी प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

अहमदनगर
दिनांक १७-०२-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती बुचके आशा दत्तात्रय, व्दारा श्री. मुळे प्रमोद विष्णू, चिकटे इलेक्ट्रिकल्सचे मागे, जुनी बैठी गिरमे चाळ, कोपरगाव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल सुरेगाव, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संजीवनी ग्रामिण शिक्षण संस्था, कोपरगाव, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४१

निर्णय दिनांक १७-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सचिन शंकरराव राऊत,<br>सूर्य - १०४, शासकीय निवासस्थाने, गोविंदपुरा<br>नाक्याजवळ, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन विभाग),<br>महानगरपालिका, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | विवाह निबंधक, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०९-०४-२००८ रोजी चुकीची माहिती दिली त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या- कडे अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेताच अर्ज निकाली काढला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रारुप प्रभाग रचनेतील मतदार संख्येसंदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांच्या दिनांक २४ ऑक्टोबर २००५ रोजीच्या पत्रातील सूचनेच्या आधारे माहिती देण्याचे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०४-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येणार नाही, असे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारल्याचे कबूल केले आहे व त्यांनी ही माहिती, राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक २४ ऑक्टोबर २००५ रोजीच्या ज्या परिपत्रकातील सुचनेनुसार नाकारली त्या परिपत्रकाची प्रत त्यांनी आयोगास दाखविली. अपिलार्थीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मतदारसंघाच्या प्रारुप आराखड्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती. अपिलार्थीने माहिती मागतेवेळी सदर आराखडा

अंतीम झाला नव्हता, तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक २४ ऑक्टोबर २००५ च्या परिपत्रकामध्ये निवडणूक आयोगाने अशा प्रकारच्या प्रारुप आराखड्याची माहिती उघड न करण्याकरिता जी भूमिका घेतली आहे, ती आयोगास मान्य आहे. अपिलार्थीने माहिती मागतेवेळी सदर आराखडा अंतीम झाला नव्हता. या बाबी व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची कशी आहे त्याचे समर्थन करण्यासाठी आज रोजी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत, तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक २४ ऑक्टोबर २००५ रोजीच्या परिपत्रकातील या सूचनांची पार्श्वभूमी पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०२-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सचिन शंकरराव राऊत, सूर्य - १०४, शासकीय निवासस्थाने, गोविंदपुरा नाक्याजवळ, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा विवाह निबंधक, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४२

निर्णय दिनांक १७-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बबनराव मुक्ताजी काळे,<br>झुंज बंगला, सुर्यानगर, वॉर्ड नं. ७, श्रीरामपूर,<br>तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वैजापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ नुसार

मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०३-२००८ रोजी स्मरणपत्र दिले असता जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या या पत्रावर कोणतेही उत्तर न पाठविल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगकडे विचाराधीन व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे सन २००६-२००७ च्या गळीत हंगामातील शिल्लक ऊसाच्या संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे उपजिल्हाधिकारी, वैजापूर यांच्याकडे माहितीची मागणी केली होती. तथापि ही माहिती तहसीलदार, वैजापूर यांच्याकडे उपलब्ध असल्याने अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार उपजिल्हाधिकारी, वैजापूर यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज तहसीलदार, वैजापूर यांच्याकडे दिनांक ०५-११-२००७ रोजी पाठविला व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती पुरविण्याची सूचना केली आहे. तहसीलदार, वैजापूर यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०१-२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २१-०१-२००८ रोजी पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयावर १४-०१-२००८ असा निर्णय दिनांक दर्शविला आहे. तथापि आज सुनावणीच्या वेळी सदर दिनांक चुकीने टंकलिखित केला गेला असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी कबूल केले व योग्य दिनांक २१-०१-२००८ असल्याचे आयोगास अवगत केले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती पुरविल्याचा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित

होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती उपलब्ध नसल्याने ही माहिती अपूर्ण ठरत आहे. त्यांना ज्या प्रयोजनासाठी या माहितीची आवश्यकता आहे ते प्रयोजन त्यांना या माहितीअभावी आता साध्य करता येणार नाही. आपल्या युक्तिवादाच्या शेवटी त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहितीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी पूर्ण माहिती दिनांक ०९-०१-२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे, मात्र अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ४ व्दारे "मग पंचनाम्यामध्ये ऊस लागवडीचा महिना कोणत्या आधारे करण्यात आला" या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्याची माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे स्पष्टीकरण दिले की, त्यांनी सदर पंचनामे हे शेतक-याकडून घेतलेल्या तोंडी माहितीच्या आधारे केले आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील ऊस लागवडीचा महिना कोणत्या आधारे घेऊन पंचनामा करण्यात आला या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या

व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना प्राप्त झालेल्या काही पंचनाम्यामध्ये लागवड महिन्यामध्ये खाडाखोड दिसत असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या या अभिप्रायाचा देखील जन माहिती अधिकारी यांनी याच कालावधीमध्ये विचार करुन त्यावरील निर्णय अपिलार्थीस कळवावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना ताकीद देण्यात येत असून इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या अर्जांवर त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे सतर्कतेने कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना ताकीद देण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०२-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बबनराव मुक्ताजी काळे, झुंज बंगला, सुर्यानगर, वॉर्ड नं. ७, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३

निर्णय दिनांक १७-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुभाष सुर्यभान गोरे,<br>मु. पो. राहुरी खुर्द, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, श्रीरामपूर,<br>तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, श्रीरामपूर,<br>तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर | | |

त्रयस्थ पक्ष : १ श्री. सुधीर गोविंद जोशी

२ श्रीरामपूर गॅस कंपनी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध नसतांना अपिलार्थीकडून रुपये २९ इतक्या शुल्काचा भरणा त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी करुन घेतला व अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व माहिती उपलब्ध नसतांनाही पैसे भरण्याचे आदेश देऊन कायद्याचा अवमान केल्या प्रकरणी त्यांच्यावर योग्य ती शास्ती लादावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील श्री. सुधीर गोविंद जोशी (भारत गॅस वितरक) व श्रीरामपूर गॅस कंपनी (हिंदुस्थान पेट्रोलियम गॅस वितरक) यांच्याकडून पुरवठा केल्या जाणा-या गॅस सिलेंडरसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **ग्राहकाकडून प्रती सिलेंडर घरपोचचा दर, गॅस गोडाऊनमधून वितरीत करतांना आकारण्यात येणारा दर व दोन्ही वितरकांच्या जागेवरुन व घरपोच तेच सिलेंडर वितरित केलेल्या मे २००७ महिन्यातील ग्राहकांच्या बीलबुकाच्या नकला** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०२-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने मागणी केलेला अर्ज संबंधीत गॅस कंपनीने नियुक्त केलेले माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

मध्यंतरीच्या काळामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २९ इतके चलनाव्दारे भरण्यासाठी सूचित केले. अपिलार्थीस सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-१०-२००७ रोजी कळविले, परंतु अपिलार्थीस

सदर शुल्क शासकीय कोषागारात भरण्याकरिता आवश्यक ते चलन दिनांक ०३-११-२००७ रोजी उपलब्ध करुन दिले. यानंतर अपिलार्थीने दिनांक ०३-११-२००७ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केला. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क भरण्याचे पत्र दिनांक २२-१०-२००७ रोजी तयार असतांना आवश्यक ते चलन अपिलार्थीस तयार करुन देण्यासाठी संबंधीत लिपिकाने ११ दिवसांचा कालावधी घेतला. जे काम सर्वसाधारणपणे १५ ते २० मिनिटामध्ये झाले असते, त्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिकाने ११ दिवस एवढा कालावधी या प्रकरणी घेतल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदारास माहिती त्वरित कशी पुरविता येईल याकरिता जन माहिती अधिकारी यांच्यावर कालमर्यादेचे बंधन घालून दिले आहे, तथापि उपरोक्त प्रकरणी या कालमर्यादेचे बंधन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी किती गांभीर्याने पाळले याची प्रचीती तपासणी केलेल्या कागदपत्रांवरुन येते. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून, त्यामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तात्काळ देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे. तसेच त्यांचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यापासून ते माहिती देईपर्यंतच्या दिवसासाठी प्रत्येक दिवसास जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्यात यावी व मनमानी पध्दतीने वागणा-या गॅस वितरकांविरुध्द योग्य ती शास्ती लावण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हती. अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या प्रकारची मागणी केली आहे त्या प्रकारे त्यांच्याकडे

माहिती संकलीत केली जात नाही. अशा प्रकारच्या माहितीकरिता त्यांना संबंधीत त्रयस्थ पक्षास यासंदर्भात विचारणे भाग असते व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज संबंधीत यंत्रणांकडे पाठविला असता यंत्रणांनी अपिलार्थीस गॅस कंपनीच्या दोन वेगवेगळ्या जन माहिती अधिका-यांना त्यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यलयात संकलीत केली जात नाही किंवा इतर कोणत्याही प्रकारे ती माहिती त्यांच्या कार्यालयात सहजासहजी उपलब्ध असणे संभवत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासठी संबंधीत गॅस एजन्सीज्कडून मिळणा-या प्रतिसादावर अवलंबून राहावे लागत होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती संबंधीत एजन्सीज्कडून घेऊन ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे सहज शक्य होते, कारण तालुका पुरवठा अधिकारी यांचे जरी या एजन्सीज्वर प्रत्यक्ष नियंत्रण जरी नसले तरी जीवनावश्यक वस्तू कायद्यामध्ये गॅस ही बाब समाविष्ट असल्याने आपल्या नियंत्रणाचा वापर करुन त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता आली असती. तथापि त्यांनी अशा प्रकारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणतेही सकारात्मक प्रयत्न या टप्प्यावर केल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधीत त्रयस्थ पक्ष - गॅस पुरवठाधारक - यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ग्राहकाकडून प्रति सिलेंडर ३३८ रुपये इतकी आकारणी करत होते. सर्वसाधारण परिस्थितीत गॅस गोडाऊनमधून ते ग्राहकांना गॅस सिलेंडर पुरवठा करत नाहीत. तथापि एखाद्या अपवादात्मक प्रसंगी गोडाऊन मधून गॅस पुरवठा करावयाचा झाल्यास ते रुपये ८ इतकी रक्कमेची वरील दरापेक्षा कमी आकारणी ग्राहकाकडून करतात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात त्रयस्थ पक्षाने असा खुलासा केला की, त्यांच्या मे २००७ या महिन्यातील बीलबुकाच्या नकला ७ दिवसाच्या आत सुपुर्द करण्यासाठी ते तयार आहेत. तसेच सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती

अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती, तथापि ही माहिती स्वतः होऊन प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, उपस्थित राहिल्याबद्दलचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी हे चलन भरण्याकरिता त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत असे म्हटले आहे. आता त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती ही संबंधीत गॅस वितरकाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये २९ इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रदार नियमितपणे उपलब्ध होत नसल्याने व या माहितीसाठी त्यांना दुस-या खाजगी यंत्रणेवर अवलंबून राहावे लागत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती आयोग लावू इच्छित नाही. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रथम अर्जावर सतर्कतेने व अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत तरतुदीप्रमाणे कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये २९ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष सुर्यभान गोरे, मु. पो. राहुरी खुर्द, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४

निर्णय दिनांक १७-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिलीप राणू साळवे,<br>मु. सोनेवाडी, पो. आकोळनेर,<br>तालुका जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था,<br>अहमदनगर | | |

त्रयस्थ पक्ष : १ श्री. एस. सी. भाटे, सनदी लेखापाल

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व खोटी माहिती दिली असल्याने व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील सुनावणी न घेतल्याने आणि आर. टी. आय. च्या कामकाजाची बुज न राखल्याने त्यांनी आयोगाकडे सदर अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर जिल्हा कृषि खाते कर्मचारी पतसंस्था मर्यादित या संस्थेच्या सन २००५-२००६ या कालावधीमध्ये केलेल्या लेखा परिक्षण संदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने या प्रथम अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती देऊन, पूर्ण माहिती देण्यास नकार दिला असे मुद्दे मांडले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०४-२००८ रोजी सुनावणी घेऊन, यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १५-०४-२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती दिल्याच्या कारणावरुन फेटाळून लावले. या अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०३-२००८ रोजी त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती,

त्यांना विनामूल्य दिल्याचे आयोगाच्या समोर स्पष्ट केले. सकृतदर्शनी अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिल्याचे दिसून येते. मात्र अपिलार्थीस ही माहिती, अपूर्ण व खोटी आहे असे का वाटते, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर अशाच प्रकारचे आरोप जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये केलेले होते. परंतु प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे व आजही आयोगाकडील सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे असा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०२-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीप राणू साळवे, मु. सोनेवाडी, पो. आकोळनेर, तालुका जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५

निर्णय दिनांक १७-०२-२००९

१ श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर, : अपिलार्थी
भराड गल्ली, नेहरु मार्केटमागे,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा नगर भूमापन अधिकारी,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख,
अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. अशोक वसंत शेकटकर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना आदेश होऊनही जन माहिती अधिकारी यांनी योग्य माहिती दिली नाही व जी माहिती दिली ती साक्षांकीत करुन दिली नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी पुरविली असून या माहितीबाबत अपिलार्थीची कोणतीही तक्रार नाही असे अभिप्राय अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या पत्रावर दिले आहेत. हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी केलेले विनंती पत्र आहे. या पत्रावर माहिती अधिकारी यांनी सही केलेली आहे. या पत्रावर अपिलार्थीने "अपिलात आदेश दिल्याप्रमाणे नकला विनामूल्य मिळाल्या काही तक्रार राहिली नाही." असे जन माहिती अधिकारी यांना दिनांक १०-०३-२००८ रोजी लिहून दिले आहे. यावरुन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये ही माहिती साक्षांकीत नसल्याचे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जामध्ये साक्षांकीत स्वरुपात माहिती मागितल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून साक्षांकीत स्वरुपात माहिती देय होणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील संपूर्ण माहिती पुरविली असल्याने व अपिलार्थीस दिनांक १०-०३-२००८ रोजी अपेक्षित माहिती विनामूल्य प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन आढळून येत नाही. अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे असा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर, भराड गल्ली, नेहरु मार्केटमागे, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६

निर्णय दिनांक १७-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल दयाकिसन बजाज,<br>जंगमगल्ली, राहुरी, तालुका राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य लिपीक, नगरपरिषद, राहुरी, तालुका राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी थातूरमातूर माहिती दिली. विवरणपत्र मागितले असता चुकीची माहिती दिली. प्रमाणित प्रतीमध्ये

माहिती मागितली असता ती दिली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर अपिलीय अधिकारी यांनी दखल न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रशासकीय इमारत व इतर कागदपत्रांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक ०१-०१-२००७ ते १३-०३-२००८ असा होता व अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक ०१-०३-२००७ ते १३-०३-२००८ पर्यंत प्रशासकीय इमारत बांधकामाच्या व्यतिरिक्त इतर कोणती कामे प्रस्तावित केली असल्यास संबंधीत खात्याकडून घेतल्या गेलेल्या परवानगी पत्राच्या प्रमाणित नकला, मंजूर निधी, मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्या संयुक्त खात्यावर जमा झालेल्या तारखेची प्रमाणित प्रत, निधी जमा झालेल्या बँकेच्या खाते नंबरची प्रमाणित प्रत निधीचा विनियोग प्रमाणपत्र विहित नमुन्यात सादर केलेल्या पत्राची प्रमाणित प्रत व बहुउद्देशिय इमारतीचे ज्योत्यापर्यंतच्या कामाची स्थानिक प्राधिकरणाकडून घेतलेल्या दाखल्याची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सशुल्क पुरविली. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी ४२ रुपये इतके शुल्क आकारले. अपिलार्थीस एकूण १६ पृष्ठांची माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी ३२ रुपये इतके शुल्क व प्रोसेसिंग खर्च रुपये १० असे एकूण ४२ रुपये अपिलार्थीकडून माहितीपोटी जमा करुन घेतले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधीत माहिती अपेक्षेप्रमाणे प्राप्त झाली नाही. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात विनियोग प्रमाणपत्राच्या प्रती हव्या होत्या. तथापि जन माहिती अधिकारी यांनी विनियोग प्रमाणपत्र पाठविण्याबाबत केलेल्या कारवाईच्या अहवालाची प्रत दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या कार्यालयातर्फे शासनकडून एखाद्या कामासाठी अनुदान प्राप्त झाल्यानंतर सदरचे काम पूर्ण झाल्यानंतरच विनियोग प्रमाणपत्र दिले जाते. अपिलार्थीने ज्या इमारतीच्या बांधकामासंदर्भात विनियोग प्रमाणपत्राची मागणी त्यांच्याकडे केली आहे ते बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे. त्याचे विनियोग प्रमाणपत्र अद्याप त्यांनी शासनाकडे पाठविले नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ मध्ये निधीच्या विनियोगाचे प्रमाणपत्र विहित नमुन्यात नगरपरिषद संचालनालयास दिले असल्यास प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत मागितली आहे. तेव्हा यासंदर्भात त्यांनी नगरपरिषद संचालनालयास जो अहवाल सादर केला आहे, त्या अहवालाची प्रत साक्षांकीत करुन अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे ती ज्या स्वरुपात उपलब्ध होती त्या स्वरुपात पूर्णतः दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नसल्याचे म्हटले आहे, तथापि मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे योग्यरित्या दिल्याचे आयोगास आढळून येत

आहे. अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात अपेक्षित असलेली विनियोग प्रमाणपत्राची माहिती अपिलार्थीस सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरच नगरपरिषद प्रशासनाकडून प्राप्त होऊ शकेल अशी त्यांची प्रचलीत कार्यपध्दती पाहता, दिसून येत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात विनियोगाच्या प्रमाणपत्राबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रचलीत कार्यालयीन पध्दत लक्षात घेऊन यासंदर्भात माहिती पाठविल्यास अधिक उचित होईल. याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस या मुद्दयाशी संबधीत माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस १६ पृष्ठांची माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी प्रोसेसिंग खर्च रुपये १० इतका आकारला आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती देतांना प्रोसेसिंग खर्च आकारण्याची कृती सर्वथा गैर व बेकायदेशीर आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीकडून त्यांनी माहिती देण्यापोटी घेतलेले शुल्क रुपये १० हे त्यांना ३ दिवसाच्या आत परत करावे.

अपिलार्थी यांनी आायोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना थातूरमातूर माहिती दिली असे नमूद केले आहे, मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आलेली माहिती मात्र अशा प्रकारची दिली नसल्याचे दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित मुदतीमध्ये योग्य तो प्रतिसाद दिल्याचे आढळून येते. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर घेतलेला त्यांचा हा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस नगरपरिषदेच्या प्रशासनासंदर्भात काही तक्रारी असल्याचे आयोगास जाणवते. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीच्या आधारावर त्यांनी त्यांच्या मूळ गा-हाण्याचे निराकरण करण्यासाठी राज्याच्या नगरपरिषद प्रशासनाकडे वेगळ्याने तक्रार करावी व या तक्रारीचे स्वतंत्रपणे सक्षम प्राधिकरणाकडून निराकरण करुन घ्यावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले जादा शुल्क रुपये १० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत परत करावे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल दयाकिसन बजाज, जंगमगल्ली, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक, नगरपरिषद, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७

निर्णय दिनांक १७-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कुमार भाऊसाहेब पा. डावखर,<br>तहसील कचेरीसमोर, राहुरी, तालुका राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या माहितीवर वेगवेगळे आक्षेप नोंदविले असून जन माहिती अधिकारी यांना

दंडित करण्यात यावे अशी विनंती केली आहे व तसेच पुढे असेही म्हटले आहे की, जिल्हा पुरवठा अधिका-यांनी सुनावणी न घेताच निकाल देऊन टाकला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा पुरवठा कार्यालय, अहमदनगर यांच्या दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या निर्णयाविषयी एकूण दोन मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये **- सदर सुनावणीच्या रोजनाम्याची प्रत व गॅस कंट्रोल ऑर्डर - २००० ची सत्यप्रत** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये पूर्ण माहिती दिली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०४-२००८ रोजी सुनावणी घेऊन या अपिलासंदर्भात आपले आदेश पारित केले. या निर्णयाव्दारे, अपिलार्थीचे अपील जन अपिलीय अधिका-यास तथ्यहीन वाटल्याने, त्यांनी फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या सुनावणीच्या रोजनाम्यावर त्यांची सही नाही व सदर कथित सुनावणी त्यांच्या अनुपस्थितीत घेतली गेली आहे. त्यांच्या या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणाही अर्जदाराला, मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध

आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस देणे हे माहिती अधिकार अधिनियमात मूलतः अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या रोजनाम्याच्या प्रती ज्या स्थितीत उपलब्ध होत्या त्या स्थितीत अपिलार्थीस पुरविल्या आहेत. मूळात या मूळ रोजनाम्यावर अपिलार्थीची सही नसल्यामुळे अपिलार्थीस प्राप्त झालेल्या रोजनाम्याच्या झेरॉक्स प्रतीवर त्यांची सही असणार नाही हे उघड आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य व्यवस्थित पार पाडले असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीसंदर्भात, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या सुनावणीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, कोणत्याही अपील अर्जावर सुनावणी घेतांना दोन्ही पक्षांना बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन ते नोंदवून घेऊन त्यावर त्यांनी आपला निर्णय देणे हे अपील ठरविणे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. इतःपर अशा प्रकारच्या अपिलावर सुनावणी घेतांना दोनही पक्षांना बोलावून घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे अपील निर्णयामध्ये नोंदविले जाईल याची दक्षता घ्यावी. त्यामुळे अपिलार्थी यांना दिनांक २७-१२-२००७ रोजी झालेल्या कथित सुनावणीबद्दल जन अपिलीय अधिकारी यांच्याबद्दल काही आक्षेप असतील तर ते त्यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे स्वतंत्ररित्या नोंदवावेत असे त्यांना सूचित करण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०२-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कुमार भाऊसाहेब पा. डावखर, तहसील कचेरीसमोर, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४८/२००८ व ४९/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८ व ४९

निर्णय दिनांक १७-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय झुंबरलाल भैलुमे,<br>मु. पो. कर्जत, तालुका कर्जत,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक २००८/४८ व ४९<br>जन माहिती अधिकारी<br>तथा प्रशासन अधिकारी,<br>जिल्हा परिषद (आरोग्य विभाग), अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०५-२००८ व दिनांक १३-०५-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपिलार्थीची ही दोनही व्दितीय अपिले एकाच माहितीसंदर्भातील असून एक अपील अर्ज राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयास व एक अपील अर्ज औरंगाबाद येथील राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयास अपिलार्थीने सादर केलेला आहे. अपेक्षित असलेली माहिती एकच असल्याने त्यांची अहमदनगर येथे एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपिले केली असता त्यांच्याशी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही पत्रव्यवहार केला गेला नाही व प्रत्येक वेळेस माहिती देण्याचे टाळण्यात आले असल्या-कारणाने त्यांनी विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे " **सन २००७ साली झालेल्या आरोग्य सेवक (पुरुष) (हंगामी फवारणी कर्मचारी) या पदासाठी झालेल्या लेखी परिक्षेतून पास होऊन मुलाखतीस पात्र असणा-या सर्वच्या सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे लेखी परिक्षेचे गुण व त्याच उमेदवारांचे मुलाखतीचे गुणपत्रक** " ही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही, मात्र त्यांना दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे केंद्रीय माहिती आयोगाच्या दिनांक ०२-०५-२००६ रोजीच्या निर्णयाचा आधार घेऊन अपिलार्थीस फक्त मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असून, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये ज्या मुलांना मुलाखतीसाठी देखील बोलाविण्यात आले नाही अशा मुलांना देखील नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, केंद्रीय माहिती आयोगाच्या दिनांक ०२-०५-२००६ च्या अपील क्रमांक ११/५३/२००६ च्या निर्णयाच्या अनुषंगाने (श्री. नीरजकुमार सिंघल विरुध्द श्री. एस. बी. गांधी, उत्तर पश्चिम रेल्वे, मुख्यालय, जयपूर च्या प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने) त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचा वरील युक्तिवाद आयोगास मान्य नाही, कारण त्यांनी केंद्रीय माहिती आयोगाच्या ज्या निर्णयाचा आधार घेतला आहे, तो निर्णय परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिका संदर्भातील असून या संदर्भात परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती अर्जदारास पुरविता येणार नाहीत असा निर्णय आहे. प्रस्तृत प्रकरणामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत घेतल्या गेलेल्या उमेदवारांचे लेखी व तोंडी परीक्षेचे गुणपत्रक अशी माहिती मागितली आहे. केंद्रीय माहिती आयोगाने संदर्भीय निर्णय देतांना विचारात घेतलेली मूळ माहिती व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचाराधीन प्रकरणी मागणी केलेली मूळ माहिती हे दोनही संदर्भ व त्यातील माहिती पूर्णतः भिन्न असल्याने जन माहिती अधिकारी यांचा वरील युक्तिवाद आयोगास मान्य करता येणार नाही. अपिलार्थीने विचाराधीन प्रकरणी मूलतः मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना, ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः सुसंगत असल्याने, देय ठरत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्यासाठीचा कालावधी व्यपगत झाला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. अपिलार्थीच्या दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या

अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद न देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी त्यांच्याकडे केली त्यावेळी ही माहिती, निवड समितीचे अध्यक्ष या नात्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे होती त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी विलंब लागला. जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे आयोग पूर्णतः अमान्य करीत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीन्वये कोणाही अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नसेल तर त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्या-पासून ५ दिवसाच्या आत पाठविणे भाग होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती जन माहिती अधिकारी यांनी न करुन, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १४-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ४८/२००८ व ४९/२००८ मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली दोनही अर्जातील संपूर्ण माहिती, त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय झुंबरलाल भैलुमे, मु. पो. कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद (आरोग्य विभाग), अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७०

निर्णय दिनांक १७-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दादा गुलाब देशमुख (पत्रकार),<br>लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |
| २ | श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे (पत्रकार),<br>लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर | | |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ११-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली असून ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी विलंब लावल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शिस्तभंगविषयक व शास्ती लावण्याची कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००६ या कालावधीशी संबंधीत त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही माहिती एकूण अकरा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३० इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेतली. (रुपये ५० इतके टपाल शुल्क वजा जाता) तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-११-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २८-०२-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५, ६, ९, १० व ११ यांचे अवलोकन करता शासकीय माहिती अधिकारी यांनी या मुद्दयाबाबत घेतलेली भूमिका योग्य आहे असे आपले अभिप्राय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या मुद्दयाबाबत जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती भूमिका घेतली हे या मुद्दयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या अपील निर्णयाने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ११-०९-२००६ रोजी त्यांनी रुपये ३० इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यानंतर माहिती प्राप्त झाली, तथापि ही माहिती अपूर्ण असून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक ४, ५, ६ व ९, १०, ११ या मुद्दयासंदर्भातील माहिती प्राप्त झाली नाही. त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने सबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई व्हावी. आता त्यांना या उर्वरित माहितीची आवश्यकता नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४, ५, ६, ९, १० व ११ ही माहिती त्यांच्याकडे तयार असून आता ही माहिती अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याची त्यांनी आयोगापुढे तयारी दर्शविली आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी नेमकी कोणती भूमिका घेतली जी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांना मान्य झाली यासंदर्भात त्यांना कोणतीही माहिती नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १९-०७-२००६ रोजीच्या (जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०७-२००६ रोजी प्राप्त) मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५, ६, ९, १० व ११ व्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होती, तर मुद्दा क्रमांक ९, १० व ११ च्या संदर्भातील माहिती अधीक्षक अभियंता यांच्या कार्यक्षेत्रातील विभाग आणि उपविभागाकडे उपलब्ध होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीतील

काही भाग जर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) अन्वये अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्ज प्राप्तीनंतर पाच दिवसाच्या आत पाठवून त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर केली नाही. तसेच अपिलार्थीस जर त्यांना या मुद्दयांची माहिती पाठवावयाची नव्हती तर त्यांनी ती न द्यावयाची कारणे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या पत्रामध्ये नमूद करणे आवश्यक होते तथापि त्यांनी अशी कार्यवाही केली नाही. अशा प्रकारे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा व अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन कलम ७ (१) च्या तरतुदींचा भंग केल्याने ते अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहितीची आवश्यकता नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३० हे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस, प्रथमतः विहीत मुदतीत अपूर्ण माहिती दिल्यामुळे परत करावे लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीचे, त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३० त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दादा गुलाब देशमुख (पत्रकार), लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२ श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे (पत्रकार), लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

३ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७५
निर्णय दिनांक १८-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रऊफ एन. पटेल,<br>औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>पाणीपुरवठा विभाग,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती अधिकारात माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी त्यांच्याकडून मुदत वाढवून घेतली. तथापि या मुदतीत त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याने, जन माहिती अधिकारी यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करुन त्यांना

अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००१ ते २००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या सर्व मुद्यांवर, ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात प्रत्येक टप्प्यावरील सर्व माहिती मागविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती, ती अपिलार्थीस व्यक्तिशः दिली. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, ही माहिती त्यांना जन माहिती यांच्याकडून दि. १६.१०.२००७ रोजी प्राप्त झाली. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, या संदर्भात विभागीय स्तरावरील माहिती त्यांना प्राप्त झाली असून, या पत्रावर तारीख, दि. १६.१०.२००७ खोडून दि. १६.९.२००७ केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.९.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विभागीय स्तरावरील माहिती दि. २०.९.२००७ पूर्वी व उपविभागीय स्तरावरील दि. २४.९.२००७ पूर्वी देण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस कोणतीही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या दि. १६.७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी अंदाजे ९० टक्के इतकी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असतांनाही त्यांनी ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत दिली नाही. त्यांना आजपावेतो जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिली नसल्याने अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगविषयक कारवाई करावी व त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे, जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १६.९.२००७ रोजी त्यांच्या स्तरावरील माहिती दिली असून उर्वरित माहिती अपिलार्थीस टप्याटप्यामध्ये दि. ३१.१२.२००८, २०.१.२००९ व १७.२.२००९ रोजी दिलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध नसते. जागतिक बँक प्रकल्प योजनेअंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजना ही प्रत्यक्षतः ग्रामपातळीवर संबंधित ग्रामस्थांकडून पार पाडली जाते. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये त्यांची भूमिका एका निरीक्षकाची आहे. कारण ग्रामीण पाणीपुरवठा योजनेला प्रशासकीय मान्यता देण्याचे तांत्रिक सल्लागार नेमण्याचे अधिकार ग्रामसभेला आहेत. तांत्रिक मान्यता देण्यासंदर्भात कार्यकारी अभियंता यांना ७५ लाखापर्यंतच्या मर्यादेत व त्यावरील रकमेसाठी महाराष्ट्र जीवन विकास प्राधिकरण विभागास सक्षम प्राधिकरण म्हणून नेमले गेले आहे. त्यामुळे त्यांना फक्त तांत्रिक मान्यता देणे, शासनाकडून आलेला निधी वितरण करणे इतकेच त्यांचे कर्तव्य आहे. त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस आता फक्त १२ मोजमापपुस्तिकांची माहिती देणे बाकी आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मूळात त्यांच्या कार्यालयात सहज उपलब्ध नसल्याने व ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना संबंधित ग्रामीण पाणीपुरवठा योजना समितीवर अवलंबून राहावे लागले असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी त्यांना विलंब लागला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रत्यक्षतः या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा समितीकडे उपलब्ध होती. या समितीतील अध्यक्षांसह सर्व सदस्य हे खाजगी (लोकप्रतिनिधी) आहेत. त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून त्यांना संबोधता येणार नाही. या योजनेच्या अंमलबजावणीचे एकूण स्वरुप पाहता व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतूतः अथवा कोणत्याही असद्हेतूने टाळले नसले तरी या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यासाठी पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक अधिकारी/कर्मचारी ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी असे समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता उर्वरित माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचे खुलासे अपेक्षित करणारी अशी जी माहिती मागितली आहे, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, असे दिसून

येईल की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध असेल, त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदींप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया, 'अर्जदारास माहिती देणे', या मध्ये अभिप्रेत आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे फक्त जतन करुन ठेवून ती अर्जदारांना पुरविण्यास ते जबाबदार आहेत. या माहितीतील निर्णय, परिपत्रके यातील सदर निर्णय का घेतला, तो कायदेशीर आहे किंवा कसे व इतर प्रकारचे अभिप्राय अर्जदारांनी जन माहिती अधिकारी यांना विचारणे व अर्जदारास त्यांनी उत्तरे देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील, त्यांना देय असलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार

४. यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १८-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रऊफ एन.पटेल, पटेल प्रोव्हिजन्स प्रियदर्शनी, इंदिरानगर,गारखेडा परिसर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४०
निर्णय दिनांक १८-०२-२००९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपिलार्थी
रा. उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
तुळजापूर, जि.उस्मानाबाद

त्रयस्थ पक्षः श्री. यु.बी.बिराजदार, तालुका कृषि अधिकारी
तुळजापूर व इतर ३१ अधिकारी/कर्मचारी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.७.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०७.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे विनादिनांकाचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता पूर्णपणे माहिती दिल्याने, विचाराधीन

अपिलामध्ये त्यांचा कोणताही आक्षेप उरला नसल्याने त्यांचा अपील अर्ज ( अपील क्र.२४४०/२००७) निकाली काढण्यात यावा.

अपिलार्थीची सदर विनंती आयोगातर्फे मान्य करण्यात येऊन,अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील क्र. २४४०/२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२४४०/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर,जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४१
निर्णय दिनांक १८-०२-२००९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपिलार्थी
रा. उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.७.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०७.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे विनादिनांकाचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता पूर्णपणे माहिती दिल्याने, विचाराधीन

अपिलामध्ये त्यांचा कोणताही आक्षेप उरला नसल्याने त्यांचा अपील अर्ज ( अपील क्र.२४४१/२००७) निकाली काढण्यात यावा.

अपिलार्थीची सदर विनंती आयोगातर्फे मान्य करण्यात येऊन,अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील क्र. २४४१/२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२४४१/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर,जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४३
निर्णय दिनांक १८-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नागनाथ राचय्या स्वामी,<br>रा. निलंगा जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कनिष्ठ अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>निलंगा जि.लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>निलंगा जि.लातूर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १२.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीसाठी अपिलार्थीस न बोलावता, परस्पर अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. तसेच अपिलार्थीने अशीही शक्यता वर्तविली आहे की, माहिती व अपिलीय अधिकारी हे एकाच खात्याचे असल्याने अपिलार्थीस सुनावणीसाठी न बोलाविण्याचे

धारिष्टय झाले असावे. त्यांच्या अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - **मौ. दाबका येथे सरकारी रस्त्यालगत १३२ के.व्ही. ची लाईन नेण्याऐवजी त्यांच्या स.नं. ८४/क मधून नेण्याची कथित दंडेली केल्यासंदर्भात** - १९७६ ते दि. २८.७.२००७ या (३१) वर्षांच्या कालावधीशी संबंधित माहिती एकूण १० मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ५.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दि. २९.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुनश्च् पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीस कथित सुनावणीसाठी न बोलाविल्याने व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी पुरविलेली माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी असल्याचे अपिलार्थीस वाटल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, निलंगा, जि.लातूर यांनी त्यांच्या शेतातून ११ के.व्ही. ची लाईन नेण्याचे प्रस्तावित केले आहे.त्यांना सदर लाईन ही सरकारी रस्त्याच्या कडेने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने नेणे अपेक्षित आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या लाईनविषयी त्यांच्याकडे माहिती मागितली होती, ती लाईन अद्यापही अपिलार्थीच्या शेतातून नेलेली नाही.मात्र अपिलार्थीच्या या विनंतीचा मुद्दा सदर लाईन टाकताना ते तपासून पाहतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे १३२ के.व्ही. च्या प्रस्तावित लाईन व तिच्या आखणीविषयी एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागविली आहे. तथापि अपिलार्थीस मुद्दा क्र. १,३,४,५,६ व ९ अंशतः या मुद्यांसंदर्भात माहिती देय होत नाही, कारण अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षिले आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, असे दिसून येईल की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध असेल, त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदींप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया, 'अर्जदारास माहिती देणे', या मध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्यांद्वारे - सुपीक जमिनीतून लाईन नेण्यामागे आपले नेमके प्रयोजन काय, वीज पुरवठा खंडीत करणारे महाभाग आपल्या खात्यात आहेत किंवा नाहीत, काही दुर्घटना घडल्यास कर्तव्यातील अक्षम्य कुचराईस कोण जबाबदार राहील, सध्याच्या लाईन टाकण्याच्या कामी जशी आश्चर्यकारक तत्परता दाखविली जात आहे, तशीच सर्वसामान्य शेतकऱ्यांच्याबाबतीत दाखविण्यात येते काय, अशा अवाजवी व अमूर्त स्वरुपाची व जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे.

या मुद्यावर आयोगाचे असे अभिप्राय आहेत की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा सर्वसामान्यांनी वापर करताना सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागवितांना काही संकेत बाळगणे जरुरीचे आहे. या प्रकरणी अपिलार्थीने अशा संकेतांची मर्यादा ओलांडून वरील

परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशी अमूर्त स्वरुपाची माहिती मागितली आहे की, ती माहितीचा विषयच होऊ शकत नाही. मूळात अशी अमूर्त माहिती मागवून त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे अभिप्राय व्यक्त करण्याचे मूळात अपिलार्थीस कोणतेही अधिकार राहत नाहीत हे अपिलार्थीने येथे लक्षात घ्यावे व इतःपर सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागतांना ज्या प्राधिकरणाकडे जी माहिती उपलब्ध असल्याची शक्यता त्यांना वाटते, अशाच स्वरुपाची माहिती त्यांनी सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागवावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीने पूर्णपणे मोघम स्वरुपाची माहिती मागविली आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "त्यांची आई श्रीमती गंगाबाई राचय्या स्वामी यांच्या दाबका येथील जमिन सर्वे नं.८४/क मध्ये एक आंब्याचे झाड होते. त्याचा मावेजा नेण्यासाठी २०/२२ वर्षापूर्वी त्यांना कळविण्यात आले होते. त्यावेळी ती दुसऱ्या गावी राहात असल्याने आजपर्यंत ती रक्कम त्यांना मिळालेली नाही, तीच्या नावावर इतर कुणास ते वाटप झाले असल्यास त्याची तारीख, मावेजाची एकूण रक्कम व साक्षीदारांची नावे कळविण्यात यावीत", या माहितीसंदर्भात अपिलार्थीने कोणताही पुरावा अथवा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कोणत्याही पत्राचा क्रमांक निर्देशित केल्याचे अथवा ॲवार्डची नक्कल देखील या प्रकरणी दर्शविली नाही. मुद्दा क्र. ४ चे हे मोघम स्वरुप पाहता, ही माहिती देखील अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांसंदर्भातील माहिती त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.८.२००७ व २९.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिली आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ९ च्या संदर्भात अपिलार्थीस अंशतः माहिती देय होते. ती माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. मात्र ही माहिती देताना त्यांनी अपिलार्थीने वरील प्रकरणी त्यांच्या शेतात रोवलेले सिमेंटचे पोल श्री.अस्टुरे यांच्या शेतात लावण्यात आल्याची नोंद त्यांच्या कार्यालयात ज्या रजिस्टर (नोंदवही) मध्ये घेण्यात आली आहे, त्या रजिस्टरची सत्यझेरॉक्स प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविणे उचित झाले असते, तथापि त्यांनी

अपिलार्थीच्या प्रश्नास फक्त उत्तर दिले आहे. त्यांची अपिलार्थीस उत्तर देण्याची ही कृती योग्य नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ शी संबंधित ही माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली असल्यामुळे, सदर माहिती अपिलार्थीच्या कोणत्याही अधिकृत अथवा अनधिकृत प्रतिनिधीस देय असणार नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीवरील अभिप्राय पाहता, हे अभिप्राय देखील त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या संबंधातील पूर्वग्रहदुषित दृष्टीकोनातून दिल्याचे दिसून येत आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अंतिमतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांना थातुरमातूर उत्तरे दिल्याने त्यांना दंडीत करण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे. या प्रकरणी येथे असे स्पष्ट करण्यात येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती कोणताही संकेत व विवेक न बाळगता विचारलेली आहे, जी त्यांना देय होत नाही, एवढे असूनही जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला स्मरुन आवश्यक ती माहिती पूर्णतया दिली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे अथवा ही माहिती अपिलार्थीपासून कोणत्याही असद्हेतूने त्यांनी दडवून ठेवल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगातर्फे कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेताना, इत:पर त्यांनी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना एकत्रित बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून, नोंदवून घेऊन त्यावर आपले स्पष्ट निर्णय पारित करावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ मधील अंशतः देय असलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नागनाथ राचय्या स्वामी, २-६३, पार्वती मॅन्शन, कोळ्ळे गल्ली, निलंगा-४१३ ५२१.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,निलंगा जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,निलंगा जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४९१
निर्णय दिनांक १८-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अनिल प्रकाशराव पिरतवाड,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती<br>जात प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक (संशोधन),<br>अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांना आवश्यक असलेल्या

माहितीपासून ते निष्कारण वंचित राहिले आहेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत न दिल्याने, त्यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१०.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - **" 'मन्नेरवारलू' या जातीची प्रमाणपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या ३४८ लोकांना दिली आहेत, त्या प्रमाणपत्रासंदर्भात दक्षता पथक, विशेष दक्षता पथक यांच्या प्रमाणित अहवालाची प्रती व छाननी समितीने या संदर्भात दिलेल्या आदेशाच्या प्रती "** - यांची माहिती साक्षांकित स्वरुपात व व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ७.१२.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगासमोर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात युक्तिवाद केला व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत त्यांनी एकूण ३४८ व्यक्तिंची यादी जोडली होती व या व्यक्तिंना जात पडताळणी समितीने मुदतवाढ देऊन जातीचे प्रमाणपत्र देताना घेतलेल्या छाननी समितीचा अहवाल व समितीने दिलेला निर्णय याच्या पध्दतीची त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. तथापि ती त्यांना अद्यापही अप्राप्त असल्याने ही माहिती त्यांना जन माहिती

अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य प्राप्त व्हावी व संबंधित जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार शासीत करावे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या संदर्भित दि. ३१.१०.२००६ रोजीच्या मूळ अर्जास त्यांनी कोणतेही उत्तर दिले नसल्याचे आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीने याच विषयावर त्यांच्याकडे अशाप्रकारचा दुसरा अर्ज केला असल्याने व त्या संदर्भात अपिलार्थीस त्यांनी माहिती दिल्याने त्यांनी अपिलार्थीच्या विचाराधीन अर्जास प्रतिसाद दिला नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतया सुसंगत होती. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ नुसार अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागण्याचा अपिलार्थीस हक्क आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(१) मधील विहित तरतुदीनुसार उपलब्ध करुन देणे हे संबंधित जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य होते, तथापि त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांचा वरील युक्तिवाद, अपिलार्थीने दुसऱ्या एका अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली असल्याने अपिलार्थीचा विचाराधीन मूळ अर्ज त्यांनी विचारात घेतला नाही, आयोग पूर्णतः अमान्य करीत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब संचालक, आदिवासी

संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक यथायोग्य कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात, या प्रकरणात असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीची नोंद संचालक,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. संचालक,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित

सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिल प्रकाशराव पिरतवाड, एन-११, बी-१७/२, टि.व्ही. सेंटर, हडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य,२८,राणीचा बाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४१

निर्णय दिनांक २०-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अरुण रंगनाथराव धोकटे,<br>मु. बाबरगांव, पो. पेंडापूर व्हाया वाळूज,<br>तालुका गंगापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील अपिलावर निर्णय देतांना त्यांच्या सुनावणी कामामध्ये निष्काळजीपणा दाखविल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करुन त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे **विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदासाठी पदोन्नती देण्यासाठी पात्र असलेल्या शिक्षकांची जेष्ठतासूची मे २००७ पर्यंतची प्रत, व ही पदे पदोन्नतीने भरण्यासाठी शासनाचे निर्देश व निकष** ही माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३६ इतके शासकीय कोषागारात चलनाव्दारे जमा करुन चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले होते. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करुन अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २९-०८-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०८-२००७ पर्यंत माहिती देण्याचे व अपिलार्थीस ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्याबाबत सूचना देऊनही संबंधीत लिपिकाने अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने

पाठविल्याबद्दल त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी असे या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आपला युक्तिवाद आयोगास लेखी स्वरुपात पाठविला असून, त्यामध्ये असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ६१ दिवसानंतर माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती वेळेवर न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहिती मागत असतात, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविल्यानंतर सदर शुल्काचा भरणा न करता ते जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुन, त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य प्राप्त करुन घेण्यासाठी नेहमीच प्रयत्न करत असतात. सदर अपिलार्थी हे जिल्हा परिषदेकडील वैजापूर तालुक्यातील प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०९-२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये, जे पत्र त्यांनी प्रत्यक्षतः दिनांक ११-०७-२००७ रोजी पोस्टाने पाठविले आहे, त्याव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३६ इतके चलनाव्दारे शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास त्यांच्या अर्जासंदर्भातील पुढील कारवाईसाठी स्वतःला अवगत करुन घेण्यासाठीचे संपूर्ण उत्तरदायित्व अर्जदारावर असते. त्यामुळे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याशी अथवा त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून भरावयास हवे होते. तथापि या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने कोणत्याही टप्प्यावर त्यांना आवश्यक असणा-या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे भरण्यासाठी कोणत्याही प्रकारे तयारी दर्शविली नाही, ही बाब येथे प्रामुख्याने आढळून येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाव्दारे विनामूल्य माहिती मिळाली आहे हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. तसेच अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये म्हटल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती दिली नाही, माहिती देतांना त्यांची दिशाभूल केली हे त्यांचे विधान सिध्द करण्यासाठी अपिलार्थीने कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबाबत नोंदविलेले आक्षेप हे तथ्यहीन ठरत आहेत. अपिलार्थी यांच्या विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याच्या सवयीवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आपले अभिप्राय आयोगापुढे स्पष्ट केले आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादातील या आक्षेपांचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची तयारी अपिलार्थीने कोणत्याही टप्प्यावर दर्शविली नाही. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक ०६-०७-२००७ रोजीचे पत्र दिले गेले आहे. हे पत्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडून दिनांक १०-०७-२००७ रोजी पाठविले गेल्याचे नमूद केले आहे, मात्र आयोगाकडे सादर केलेल्या

पुराव्यामध्ये (जावक नोंदवहीची प्रत) हे पत्र दिनांक ११-०७-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून २०५४ या क्रमांकाने पाठविले गेल्याचे दिसून येत आहे. या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी वीस रुपये इतक्या किंमतीचे पोस्टाचे तिकिट लावल्याचेही जन माहिती अधिकारी यांच्याकडील जावक नोंदवहीवरील संबंधीत सत्यप्रतीवरुन दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमान्वये अपिलार्थीने दिलेला माहितीसाठीचा मूळ अर्ज पाहता व जावक विभागास रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविण्याची सूचना दिली असताना देखील संबंधितांनी हे पत्र अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले आहे. अशा प्रकारे पत्राच्या बटवड्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत विभागामध्ये हलगर्जीपणा झाला असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना जावक विभागातील संबंधीतावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधीतावर जबाबदारी निश्चित झाली किंवा कसे याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशावर कोणतीही कारवाई केली गेली नसल्याचे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांची अशा प्रकारची कार्यपध्दती ही निश्चितपणे कोणासही उद्विग्न करुन टाकणारी आहे, असे येथे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. जन माहिती अधिकारी यांना आता आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येते की, जावक विभागातील संबंधीतावर हे आदेश निर्गमित होताच प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करुन या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास कारवाईनंतर ७ दिवसाच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, मु. बाबरगांव, पो. पेंडापूर व्हाया वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४२

निर्णय दिनांक २०-०२-२००९

१ श्री. राजेंद्रकुमार शिवप्रसादजी मुंदडा, : अपिलार्थी

'त्रिमुर्ती' ब. नं. ३३, न्यू आदर्श कॉलनी, पूर्णा (जं),

तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी

तथा नायब तहसीलदार (महसूल),

तहसील कार्यालय, परभणी, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी

तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),

परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना अद्यापही त्यांच्या दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून

प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०७-२००७ रोजी निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २८-०३-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१ नोव्हेंबर २००३ रोजी परभणी शहरात झालेल्या बॉम्बस्फोटानंतर दंगलग्रस्तांना शासनाने दिलेल्या आर्थिक व इतर मदतीबाबत माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी २१-११-२००३ ते २६-०३-२००७ असा असून अपिलार्थीने ही माहिती २६ मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या दुतामार्फत व त्यांच्या पत्त्यावर मागितली होती. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी १९-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांचा हा कथित निर्णय अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००७ रोजी प्राप्त झाल्याचा अभिप्राय अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या पत्राच्या झेरॉक्स प्रतीवर दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ११-१०-२००७ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी परभणी शहरात दिनांक २१ नोव्हेंबर २००३ रोजी झालेल्या दंगलीसंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळ्या मुद्दयांव्दारे मागितली होती. या दंगलीमध्ये ते

स्वतः जखमी झाले होते. शासनाने जाहीर केलेली मदत त्यांना व त्यांच्यासारख्या इतर ३४ लोकांना अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. दंगलग्रस्तांना चेक वाटपाचे काम नायब तहसीलदार परभणी, मंडळ अधिकारी, परभणी व तलाठी सजा, परभणी यांच्याकडे दिले गेले होते. तथापि सदर चेकचे वाटप करतांना संबंधितांनी प्रत्येक आपद्ग्रस्तांकडून ५०० ते १००० रुपये इतक्या रकमेची मागणी केली व ज्यांनी ही रक्कम महसूल विभागास देण्याचे नाकारले त्यांना संबंधीतांनी मदतीचे चेक दिले नाहीत. राज्यशासनाने दंगलग्रस्तांना जाहीर केलेली मदत अद्यापपर्यंत दंगलग्रस्तांना वाटली गेली नाही व तसेच हा निधी राज्यशासनाकडे परत वर्ग करण्यासाठी शासकीय कोषागारात जमा देखील महसूल विभागाच्या कर्मचा-यांकडून केला गेला नाही, हे या प्रकरणाचे वैशिष्ट्य आहे. अकाउंट पेयी चेक असतांना संबंधितांनी बोगस नावाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेत त्यांचे खाते उघडले, चेक जमा केले व नंतर या खात्यातील पैसे परस्पर काढून घेतले. अशा प्रकारे गैरव्यवहार झाल्याचे त्यांना निश्चितपणे माहित आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. मधुकरराव चौधरी यांनी अपिलार्थीचा चेक क्रमांक व दिनांक देखील त्यांना सांगितला आहे. परंतु तो कथित चेक त्यांना अद्यापही प्राप्त झालेला नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व अद्यापपावेतो दंगलग्रस्तांना शासनाकडून मंजूर झालेले मदतीचे चेकचे जर संबंधितांना वाटप झाले नसले तर ही रक्कम किमान शासनाच्या तिजोरीमध्ये परत जावी एवढीच त्यांची अपेक्षा असल्याचे त्यांनी पुढे स्पष्ट केले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे (श्री. मुख्तार अहमद, अव्वल कारकून) असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी त्यांनी दिनांक १३-०४-२००७ रोजी पत्र पाठविले होते, तथापि ही माहिती घेऊन जाण्यासाठी अपिलार्थी त्यांच्याकडे कधीही हजर झाले नाहीत. सदर पत्र त्यांनी दिनांक १८-०४-२००७ रोजी अपिलार्थीच्या पत्त्यावर पोस्टाने पाठविले होते. यासंदर्भातील योग्य तो पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला

आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या सर्व मुद्दयांवरील माहिती आता त्यांच्याकडे लिखित स्वरुपात तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती दहा दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २८-०३-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला, तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील बहुतांश मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपाचे असून त्याचे स्वरुप व्यापक असल्याचे अभिप्राय दिले आहेत व अपिलार्थीस या पत्राव्दारे संबंधीत संचिकेचे अवलोकन करुन आवश्यक असलेली माहिती नियमानुसार फी भरुन हस्तगत करण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १९-०७-२००७ रोजीच्या निर्णयानंतर अपिलार्थीस दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या स्मरणपत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले होते. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, या प्रकरणी त्यांना दिनांक २४-०७-२००७ रोजीचे पत्र देखील प्राप्त झालेले नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दहा दिवसाच्या आत विनामूल्य देण्याची तयारी दर्शविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नांचे गांभीर्य पाहता या प्रकरणी महसूल आयुक्त,

औरंगाबाद विभाग यांच्या पातळीवर आपद्ग्रस्तांना शासनाने दिलेल्या मदतीच्या परभणी जिल्ह्यातील कथित वितरणासंदर्भात त्यांनी चौकशी करणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. या सुचनांची महसूल आयुक्तांनी गांभीर्यपूर्वक दखल घेऊन चौकशी करावी असेही त्यांना आयोगातर्फे अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) मधील तरतुदीनुसार सूचित करण्यात येत आहे. परभणी जिल्ह्यातील महसूल विभागाकडील टपाल वाटपाची पध्दत पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दुतामार्फत त्यांच्या मूळ अर्जात कळविलेल्या पत्त्यावर माहिती अपेक्षिली होती. तथापि असे असतांना प्रत्येक वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील माहितीचे अवलोकन करण्याची सूचना दिली. ही जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा गैर आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचे स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी म्हटल्याप्रमाणे अपिलार्थीने जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली असली तरी त्यांना ही माहिती व त्यांच्या प्रश्नांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या कागदपत्रांवर उपलब्ध आहेत, अशा कागदपत्राच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस देणे या प्रकरणी अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अशा फार मोठ्या प्रमाणात होती की जेणेकरुन जन माहिती अधिकारी यांना आपल्या कार्यालयातील साधनसामुग्री मोठ्या प्रमाणात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वळवावी लागणार होती, अशातली कोणतीही बाब येथे संभवत नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे निःसंशयपणे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीमध्ये नमूद केलेल्या कार्यवाहीसाठी निश्चितपणे पात्र ठरत आहेत.

सबब, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये अपेक्षिल्याप्रमाणे माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०२-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्रकुमार शिवप्रसादजी मुंदडा, 'त्रिमुर्ती' ब. नं. ३३, न्यू आदर्श कॉलनी, पूर्णा (जं), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४३

निर्णय दिनांक  २०-०२-२००९

१ श्री. प्रभाकर तुकारामपंत दिवाकर, : अपिलार्थी
"प्रभुकुंज", घ. नं. १/३१३, आदर्शनगर, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, तत्कालीन व सध्याचे जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपिलामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय देतांना माहिती अधिका-याने ५० दिवस विलंबाने माहिती दिली हे स्पष्ट होऊन देखील जन माहिती अधिकारी

यांच्यावर कायद्यातील तरतुदीनुसार दंडाची आकारणी केली नाही. सदर दंडाची आकारणी होणे या प्रकरणी आवश्यक होते. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी पाठीशी घातल्याची त्यांची भावना आहे. त्यांना अपेक्षित असलेले मूळ प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने पाठविल्याबद्दल व यासंदर्भात दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व वर्तणूक) नियम १९७९ अन्वये कारवाई व्हावी. तसेच दिनांक ०७-१२-२००७ रोजी मागणी केलेला त्यांना अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता त्यांना अद्याप देण्यात आलेला नाही. त्यांच्या इमारतीत असलेले कृषि विभागाचे कार्यालय दिनांक १५ ऑगस्ट २००० पासून सुरु होऊनही त्या कार्यालयाच्या प्रमाणपत्राच्या मागणीसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित कारवाई वेळेत पूर्ण केली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे परभणी जिल्ह्यात खाजगी इमारतीमध्ये स्थित असलेल्या विविध शासकीय कार्यालयासंदर्भात दिनांक ०१-०४-२००६ ते ३१-०३-२००७ या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-१२-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १९-१२-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ५० दिवसांचा विलंब लावल्याचा निष्कर्ष काढला आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे त्यांच्यावर दंडाची आकारणी केली नसल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती मिळाल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. तथापि सदर माहिती विलंबाने प्राप्त झाल्याबद्दल संबंधितावर शास्ती लावावी असा युक्तिवाद त्यांनी आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविली गेल्याचे मान्य केले व या प्रकरणी जबाबदार असणा-या सर्व कर्मचा-यांची विभागीय चौकशीची कारवाई केली जात असल्याचे व तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध नसल्याने त्यांना या प्रकरणी त्यांच्या नियंत्रणाखालील उपविभागाची मदत घेणे जरुरी होते असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक अ, ब, क व ग या मुद्दयावरील माहिती देय ठरते, उर्वरित मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अवगत करणारी माहिती विचारली असल्याने व ती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती अपिलार्थीस दिशाभूल करणारी का वाटते असे आयोगाने त्यांना विचारले असता अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये संबंधीत कार्यालयाने भाडे निश्चित करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविलेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक ही माहिती विचारली असता संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधीत कार्यकारी अभियंता यांना पाठविल्या गेलेल्या शेवटच्या स्मरणपत्राचा क्रमांक व दिनांक त्यामध्ये उध्दृत केला आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांचे म्हणणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना विनामूल्य पुरविली आहे. या घटनाक्रमामधील सर्व घडमोडींचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीस जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्वसामान्य परिस्थितीत दिनांक ०६-१०-२००७ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे मिळणे अभिप्रेत होते ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ५४ दिवस इतक्या विलंबाने पुरविली गेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता व जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना उपविभागाची मदत घ्यावी लागत होती, जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद जरी वादाच्या प्रयोजनार्थ ग्राह्य धरला तरी अंतीमतः प्रमाणपत्र हे विभागीय कार्यालयाकडून दिले जाते हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांच्या आवाक्याबाहेरचे काम होते, असे आयोगास वाटत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून संबंधीत माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक ज्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे, हे सर्वजण अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जबाबदार ठरत आहेत. सबब, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी माहिती अधिका-यावर दंडाची आकारणी न करुन त्याव्दारे त्यांना संरक्षण देऊन पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे असे त्यांचे अभिप्राय दिले आहेत, या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारे कारवाई करण्यासाठी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनसार जन

अपिलीय अधिकारी यांना अधिकार नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्यासंदर्भात दिलेले वरील अभिप्राय या प्रकरणी लागू होत नाहीत, असे येथे स्पष्ट करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले सर्व सहायक, या सर्वांवर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रभाकर तुकारामपंत दिवाकर, "प्रभुकुंज", घ. नं. १/३१३, आदर्शनगर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४४

निर्णय दिनांक २०-०२-२००९

१ श्री. सावते सखाराम किशनराव, : अपिलार्थी
मु. पो. आसेगाव, तालुका जिंतूर,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
सेलू, जिल्हा परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आसेगाव, वस्सा व आडगाव येथील केरोसीन वाटपाच्या त्यांनी अर्ज करण्यापूर्वीच्या, एक महिन्याच्या कालावधीतील प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हती. ही माहिती ग्रामपातळीवर संबंधीत रॉकेल दुकानदारांकडे उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधीत दुकानदार यांच्यावर अवलंबून राहावे लागत होते. अपिलार्थीचा दिनांक ११-०९-२००७ रोजीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संबंधीत दुकानदारांकडून ही माहिती गोळा करुन घेऊन अपिलार्थीस अंतीमतः दिनांक २८-१२-२००७ रोजी म्हणजेच, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर उपलब्ध करुन दिली.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली असून त्यांनी दिनांक २८-१२-२००७ रोजी तहसीलदार, जिंतूर यांना, अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचा दिनांक ११-०९-२००७ रोजीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज निकाली काढण्याची विनंती केली आहे हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः माहिती मिळाल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सावते सखाराम किशनराव, मु. पो. आसेगाव, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४५

निर्णय दिनांक २०-०२-२००९

१ श्री. सुधाकर उमाजी साळवे, : अपिलार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयाविरुध्द केल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत दिनांक ०१-०६-२००६ ते ३१-०६-२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयांतर्गत केल्या जाणा-या विकास कामासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी कळविले होते असे आयोगास सांगितले. मात्र ह्या संदर्भातील कोणताही पत्रव्यवहार आज सुनावणीच्या वेळी त्यांच्याकडे उपलब्ध नाही, मात्र यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीवरुन, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मनीऑर्डरने २७ रुपये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क पाठवित असल्याचे पत्र उपलब्ध आहे. सदर पत्र अपिलार्थीने दिनांक २२-०८-२००७ रोजी लिहिले असून अपिलार्थीने पाठविलेली मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांना खरोखरच प्राप्त झाली किंवा कसे याबाबत जन माहिती अधिकारी आज साशंक असल्याचे आयोगास दिसून येत आहे. याचबरोबर अपिलार्थीस, त्यांच्या माहितीसाठीच्या

मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी प्रथम दिलेला प्रतिसाद आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १२-०१-२००९ व २०-०१-२००९ रोजी विनामूल्य पुरविण्यात आलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी सुनावणीच्या वेळेस या प्रकरणाशी संबंधीत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे ते आयोगासमोर प्रतिपादन करीत आहेत, तथापि अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ - मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, सदर माहिती अधीक्षक अभियंता दक्षता पथक मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे चौकशी प्रकरणासाठी पाठवून दिली असल्याने ती, अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. थोडक्यात दिनांक २८-०६-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, आयेगाकडील सुनावणीच्या दिनांकापर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडे पूर्णतः तयार नसल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. ही माहिती अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदींशी सुसंगत असल्याने अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार ती अपिलार्थीस विहीत मुदतीत देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक ३ शी संबंधीत मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास दिलेल्या प्रतिसादाची माहिती स्वतःजवळ सुनावणीच्या दिवसापर्यंत उपलब्ध न ठेऊन व तसेच अपिलार्थीस विलंबाने देखील अपूर्ण माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतदीनुसार कारवाई करण्यासाठी पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (जलसंपदा) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी

यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर उमाजी साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४६

निर्णय दिनांक २०-०२-२००९

१ श्री. मो. हबीब फारुखी मो. मुजीब फारुखी, : अपिलार्थी
व्दारा - अब्दुल वहीद सिद्दिकी,
जवाहर कॉलनी, "आशीयाना" समोर, हडको जवळ,
परभणी - ४३१ ४०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती
क्रमांक १, पुणे विभाग, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अपर आयुक्त (महसूल),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २९-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दाखल केलेल्या प्रथम अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दखल न घेतल्यामुळे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. एम. ए. नवीद सिद्दिकी पिता एम. ए. मजीद सिद्दिकी यांनी जात पडताळणीसाठी दाखल केलेल्या मूळ संचिकेच्या साक्षांकीत केलेल्या प्रती मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या या प्रकरणी केलेल्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, त्यांना सदर निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मो. हबीब फारुखी मो. मुजीब फारुखी, व्दारा - अब्दुल वहीद सिद्दिकी, जवाहर कॉलनी, "आशीयाना" समोर, हडको जवळ, परभणी - ४३१ ४०१.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक १, पुणे विभाग, पी. एम. टी. बिल्डींग, स्वारगेट, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, कौन्सील हॉल, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत)

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४७

निर्णय दिनांक २०-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख शादुल्ला अब्दुल कादर,<br>रा. उस्माननगर, तालुका कंधार, जिल्हा नांदेड<br>सध्या - एस. के. टेलर,<br>भोई गल्ली नगरेश्वर रोड, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार,<br>जिल्हा नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०३-२००८ रोजी फेरसादर झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी अर्ज केला असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविली नाही त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना अपुरी माहिती पुरविली. याचबरोबर अपिलार्थीने संबंधीत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर योग्य ती कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती करुन आपल्या मूळ माहितीची मागणी याच अपील अर्जामध्ये कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. लतिफखान, अर्धघाऊक विक्रेते यांच्या जानेवारी २००४ ते डिसेंबर २००६ या कालावधीतील विक्री वाटप रजिस्टर व स्टॉक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती यासंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध असल्याने ती माहिती त्रयस्थ पक्षाकडून मागवून घेत असल्याचे अपिलार्थीस या पत्राव्दारे ज्ञात केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००७ ते १८-१०-२००७ या कालावधीमध्ये एकूण पाच सुनावण्या घेऊन अंतीमतः दिनांक २०-१०-२००७ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे आदेशित केले. तथापि या सुनावणीचा निर्णय प्राप्त होण्याआधीच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्टॉक रजिस्टरच्या प्रतीची माहिती दिनांक १०-०४-२००७

रोजी दिली. सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाच्या छायांकीत प्रतीवर दिनांक १०-०४-२००७ रोजी पोचसही दिली आहे. तदनंतर अपिलार्थीने मागणी केलेल्या विक्री रजिस्टरच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाकडे पाठपुरावा करुन आवश्यक ती माहिती स्वत:कडे जमा करुन ठेवली व अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे ही माहिती व्यक्तिश: घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि आजपावेतो अपिलार्थी ही माहिती घेऊन जाण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आज अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व या संपूर्ण घटनाक्रमावरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध असलेली माहिती व्यक्तिश: अपेक्षिली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध नसते. अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी त्यांना त्रयस्थ पक्षाच्या योग्य त्या प्रतिसादाची वाट पाहणे अनिवार्य होते. तथापि एवढे असूनही त्रयस्थ पक्षाशी वारंवार संपर्क साधून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एका मुद्दयावरील माहिती दिनांक १०-०४-२००७ रोजी दिली व दुस-या मुद्दयावरील माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्यासाठी दिनांक ०३-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना सूचित केले. कोणाही अर्जदाराने व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भातील घडामोडी ज्ञात होण्यासाठीचे संपूर्ण उत्तरदायित्व संबंधीत अर्जदार यांचे असते. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाच्या संदर्भात योग्य ती कागदपत्रे आयोगास दाखविली आहेत. यावरुन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. तसेच अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही त्यांच्या कार्यालयातून माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांच्याकडे कधीही उपस्थित राहिले नाहीत या जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या

युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर विनापरवानगी अनुपस्थित आहेत हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कोणतेही स्वारस्य राहिले नाही असे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वत:च जबाबदार असल्याचे अशा प्रकारे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख शादुल्ला अब्दुल कादर, व्दारा - एस. के. टेलर, भोई गल्ली नगरेश्वर रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७१

निर्णय दिनांक २०-०२-२००९

१ श्री. हरिभाऊ बापुराव सुरंगे, : अपिलार्थी
बु-हाणनगर, रामनगर,
नवीन जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले नाही व कायद्याच्या विपरीत व माहितीच्या विसंगत पत्र दिले. त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्याची व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, **"आपले कार्यालयातून दिनांक २१-१२-२००५ रोजी मौजे अंबड येथील सर्वे नंबर ३७ मधून १४५८८ चौरस मीटर जमिनीची अकृषिक सनद दिली होती. त्या माननीय अधिका-याचे पदनाम आणि त्या अधिकारी व्यक्तीचे पूर्ण नाव, पित्याचे नाव, आडनांव देऊन माहिती देणे"** अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधीत संचिका तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे या पत्राव्दारे आश्वासित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २०-०६-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याचे कळविले असल्याने त्यांचे प्रथम अपील निकाली काढले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधीत माहितीसाठीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने दिनांक १३-०४-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार वेगवेगळ्या विषयावर अनेक अर्ज केले होते. त्यामध्ये आयोगासमोर विचाराधीन असलेल्या माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेला माहितीसाठीचा विचाराधीन प्रथम अर्ज त्यांना आयोगाने व्दितीय अपील सुनावणीसंदर्भात पाठविलेल्या कागदपत्रासोबत प्राप्त झाला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या मूळ अर्जातील व अपील अर्जाच्या प्रतीवरुन अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे खरोखरच प्राप्त झाला किंवा कसे हे आयोगास कळण्यास काहीच मार्ग नाही. कारण यासंदर्भातील कोणताही पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे सादर केला नाही. मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज सादर केल्याबाबत संबधितांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिकची सही अथवा शिक्का देखील यावर दिसून येत नाही. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या प्रकारे अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जाबरोबर त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे मूळ अर्ज व अपील अर्ज दाखल केल्यासंदर्भात वरील प्रमाणे कोणताही पुरावा दाखल केला नसल्याने व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हरिभाऊ बापुराव सुरंगे, बु-हाणनगर, रामनगर, नवीन जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५४४

निर्णय दिनांक २०-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती सय्यद रुबीना काद्री,<br>व्दारा खिजर काद्री, प्लॉट नं. ७२, रशिदपुरा,<br>सिंगापूर बेकरी समोर, अक्सा एस. टी. डी. च्या<br>बाजुला हिनानगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक शिक्षण संचालक,<br>विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग,<br>औरंगाबाद | | |

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, औरंगाबाद उर्दू प्राथमिक शाळा, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, पहिल्या अपिलाचा निर्णय बेकायदेशीर असल्याने त्यांनी आयोगाकडे हे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०६-०६-२००६ रोजीच्या पत्रामध्ये आदेशित केल्याप्रमाणे प्राप्त झालेल्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. अपिलार्थीने त्यांच्या पगारासंदर्भात केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने त्यांच्या दिनांक ०६-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधीत शाळेची वेतनासंदर्भात चौकशी करण्यासाठी सूचित केले होते व चौकशीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर करण्याची सूचना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांना दिली होती. तथापि शिक्षणाधिका-याकडून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या सुचनांचे पालन न केल्या गेल्याने त्यांनी दिनांक १८-०८-२००७ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांना यासंदर्भात परत एक स्मरणपत्र दिले व स्मरणपत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली. सदर प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन एखाद्या बैठकीचे इतिवृत्त तयार करावे त्याप्रमाणे या सुनावणीचे अपिलार्थी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीचे इतिवृत्त तयार केले. सदर इतिवृत्ताची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नाही. सुनावणीसाठी अपिलार्थी या उपस्थित होत्या. या बैठकीमध्ये संबंधीत शिक्षण संस्थेची

मान्यता काढून घेण्यासंदर्भात कारवाई सुरु करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यास निर्देश दिल्याचे दिसून येते, मात्र या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी व सद्यःस्थिती विशद केली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी या औरंगाबाद उर्दू प्राथमिक शाळा, रशिदपुरा, औरंगाबाद या शाळेत सह शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. अपिलार्थी ज्यावेळी या शाळेमध्ये सह शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या, सदर शाळेतील ज्या तुकडीस त्या शिकवित होत्या, त्या तुकडीकरिता शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नव्हते. तदनंतर विद्यालयाच्या आवश्यक त्या संख्येअभावी ती तुकडी कमी झाली. अपिलार्थीस, त्यांनी संबंधीत संस्थेकडे विनाअनुदानित तुकडीवर सह शिक्षिका म्हणून केलेल्या कामाचे वेतन हवे आहे व यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला असता, त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडील दिनांक ०६-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे शिक्षणाधिका-यास या संस्थेची चौकशी करण्यास कळविले. शिक्षणाधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेला अहवाल जन माहिती अधिकारी यांना अद्यापपावेतो प्राप्त झाला नसल्याने त्यांना अपिलार्थीस या अहवालाची प्रत पाठविता आली नाही. यानंतर अपिलार्थीने मा. उच्च न्यायालयाकडे अपील केले असता या अपिलावर अपिलार्थीच्या बाजूने निर्णय लागला व मा. उच्च न्यायालयाने संबंधीत शिक्षण संस्थेला अपिलार्थीस त्यांना देय होणारे वेतन देण्याचे आदेशित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने ज्या माहितीकरिता त्यांच्याकडे अर्ज केला होता त्या माहितीच्या मूळ मुद्दयावर मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिला असल्याने अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जासंदर्भात माहिती देणे त्यावेळी तितकेसे आवश्यक राहिले नाही, असा युक्तिवाद केला आहे. आता अपिलार्थीने ज्या कारणाकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती माागितली आहे त्या त्यांच्या प्रश्नाची उकल मा. न्यायालयाकडून झाली असली तरी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे

जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने मागणी केलेला अहवाल त्यांच्याकडे शिक्षणाधिका-याकडून ज्यावेळी प्राप्त होईल त्यावेळी तो विनामूल्य अपिलार्थीस देणे आता भाग आहे. त्यामुळे या प्रकरणी शिक्षणाधिका-याकडून हा अहवाल आता प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी कशा प्रकारे घेऊ नये, हे सप्रमाण सिध्द केले आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांना असे सूचित करण्यात येते की, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अंतर्गत त्यांच्याकडे दाखल होणा-या प्रत्येक अपील अर्जावर सुनावणी घेतांना त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांना एकत्र बोलावून, दोघांचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून त्यावर आपला ठोस निर्णय पारित करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद

दिनांक २०-०२-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती सय्यद रुबीना काद्री, व्दारा खिजर काद्री, प्लॉट नं. ७२, रशिदपुरा, सिंगापूर बेकरी समोर, अक्सा एस. टी. डी. च्या बाजुला हिनानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यां-ना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२३
निर्णय दिनांक २०-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ विभोर दिलीप बारला,<br>रा. नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हा निवडणूक अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, नाशिक | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ५.६.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयामध्ये दि. ०७.०६.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून उपरोक्त प्रकरणाची सुनावणी दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली होती.

या संदर्भात सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक यांनी त्यांच्याकडील पत्र क्र. निवडणूक-२/कावि/१७४/२००९, दि. ६.२.२००९ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, राज्य मुख्य माहिती आयुक्त,मुंबई यांचेसमोर यापूर्वीच दि. ३०.७.२००८ रोजी सुनावणी झाली असून, या संदर्भात दि. २७.८.२००८ रोजी आदेश निर्गमित झालेले आहेत,

दोनही अपिलामधील मूळ माहितीसाठीच्या अर्जांची पडताळणी केली असता, दोन्ही मूळ अर्ज दि. १२.३.२००७ रोजीचे असून त्यातील मागणी केलेली माहिती समान असल्याचे आढळून

येत आहे. यावरुन अपिलार्थीने एकाच माहितीसाठीच्या अर्जावर दोन वेगवेगळी स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाकडे एकाच दिवशी दाखल केली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सदर दोन अपिलापैकी एका द्वितीय अपील अर्जावर (क्र.२००८/रा.मा.आ./सी.आर.९६) वरीलप्रमाणे दि. २७.८.२००८ रोजी निर्णय झाला असल्याने, आज विचाराधीन दुसरे अपील क्र. २४२३/२००७ खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र.२४२३/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. ॲड. विभोर दिलीप बारला, १५, मुक्ती, ९ समर्थनगर, नाशिक-४२२ ००५

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक-४२२ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २००६/०७, २००७/०७,२००८/०७,२००९/०७ व २०१६/७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२००६,२००७,२००८,२००९ व २०१६

निर्णय दिनांक २१-०२-२००९

१. श्री. एस.एन.विटेकर, औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद

विद्यमान जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

वरील पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २१.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणांत अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०६.२००७ रोजी प्रथमतः दाखल झालेली व तदनंतर आयोगाकडे (त्रूटींची पूर्तता करुन) दि. २१.५.२००८ रोजी फेरसादर केलेली पाच स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या प्रकरणात अपिलार्थीने एकाच प्रकारच्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.२.२००७ रोजी पाच वेगवेगळे अर्ज व अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.३.२००७ रोजी या पाच वेगवेगळ्या अर्जांसंदर्भात

एकच प्रथम अपील सादर केले असल्याने या सर्व संबंधित द्वितीय अपील अर्जांवरील सुनावणी आज रोजी आयोगातर्फे एकत्रितपणे घेण्यात येत आहे. या सर्व पाचही अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी ठेवलेल्या सुनावणीमध्ये निर्णय न दिल्याने विचाराधीन द्वितीय अपील करीत असल्याचे अपिलार्थीने म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.०२.२००७ रोजीच्या पाच स्वतंत्र मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. १.४.२००६ ते २०.२.२००७ या कालावधीमधील, - **"महाराष्ट्र ग्रामीण रो.ह.यो.संदर्भात त्यांच्या कार्यक्षेत्रातील पिंपळखुटा ग.क्र.४/९ मानाब, कांचनपूर ग.क्र.१/४ मानाब, ओव्हर ग.क्र. ३/१ शेततळे, मंगरुळ ग.क्र.१/४ मानाब, कांचनपूर ग.क्र.१/७ मानाब, आडगाव सरक ग.क्र. ४/४ ग्रुपचर, जोगवाडा ग.क्र.१/१७ मानाब, जटवाडा ग.क्र.१/१४ मानाब, मंगरुळ ग.क्र.१/२ मानाब, मंगरुळ ग.क्र,१/४ मानाब, नागोण्याची वाडी २/४ मानाब. औरंगपूर ग.क्र.१/८ मानाब, बेंदेवाडी ग.क्र.१/३ मानाब,कांचनपूर ग.क्र.१/१ मानाब, कांचनपूर ग.क्र.१/२ मानाब, गाडीवाट ग.क्र. १/१३ मानाब, जोगवाडा ग.क्र.१/१४ मानाब, जटवाडा ग.क्र. १/१५ मानाब, जटवाडा ग.क्र.२/१७मानाब, जटवाडा ग.क्र.२/१८ मानाब, नागोण्याची वाडी ग.क्र.२/२ मानाब, बेंदेवाडी ग.क्र.२/१० मानाब,बेंदेवाडी ग.क्र.१/८मानाब., औरंगपूर ग.क्र.१/६ मानाब, कांचनपूर ग.क्र.१/११ मानाब.,औरंगपूर ग.क्र.१/५ मानाब, औरंगपूर ग.क्र. ७/३ मानाब, कांचनपूर ग.क्र.१/८ मानाब, दरेगाव ग.क्र.२/५ मानाब, बेंदेवाडी ग.क्र. ७/७ मानाब,बेंदेवाडी ग.क्र.१/९ मानाब, लाडसांगवी ग.क्र. १/३० मानाब, लाडसांगवी ग.क्र. १/३१ मानाब, खोडेगाव ग.क्र. १/३ मानाब, गाडीवाट ग.क्र. १/४ मानाब, कचनेर ग.क्र. ४/११ मानाब, कचनेर ग.क्र. ३/१ मानाब, घारदोन ग.क्र. १/१४ मानाब, घारदोन ग.क्र. १/१३ मानाबं., चित्तेपिंपळगाव ग.क्र. १/१ मानाब, चित्तेपिंपळगाव ग.क्र. १/२ मानाब, घारदोन ग.क्र. १/१५ मानाब, चित्तेगाव ग.क्र. १/१० मानाब, चित्तेगाव ग.क्र. २/९ मानाब, या**

**गावामध्ये झालेल्या गटनिहाय कामावरील सर्व मजूरांची रोजगार पत्रिका फोटोसहित लॅमिनेटेड (जॉब कार्ड), ओळखपत्रांचा क्रमांक, पोस्ट खाते/बँक खाते क्रमांक तसेच राष्ट्रीयकृत बँकेचे नाव व ठिकाण, तसेच मजूरांची नावे लिहिलेली हजेरीपत्रके व मोजमापपुस्तिका यांच्या छायांकित प्रती "-** ही  माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.२.२००७ रोजी ४४२/०६ या क्रमांकाच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन त्यामध्ये अपिलार्थीच्या असे निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. १७.२.२००७ रोजी सादर केला परंतु माहिती मागताना दि. २०.२.२००७ रोजीपर्यंतची म्हणजे पुढील कालावधीची देखील माहिती मागितली आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मजूरांची नोंदणी, त्यांना ओळखपत्र देणे, राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडणे, जॉब कार्ड वाटप करणे ही कामे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसून संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थीने संबंधित ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा,त्याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) च्या तरतुदी अन्वये त्यांनी अपिलार्थीस ही माहिती एकाच वेळेस देणे शक्य नसल्याचे कळविले व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती तयार असून त्या माहितीची पहाणी करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व पहाणीच्या वेळी त्यांना जी कागदपत्रे आवश्यक वाटतील त्यांच्या छायाप्रती प्रतिपृष्ठ रु. २/- या प्रमाणे अपिलार्थीस देण्याचे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविले होते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हे रजिस्टर्ड पत्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर पाठविले होते, तथापि हे पत्र पोस्टखात्याकडून, "Not claimed Rtd. to Sender on 1/3/07"या पोचपत्रासह जन माहिती अधिकारी यांना परत प्राप्त झाले. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागवूनही या घटनेनंतर त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भातील पुढील घडामोडीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याशी

कोणत्याही प्रकारे संपर्क न साधता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या पाचही प्रकरणातील मूळ अर्जासंदर्भात दिनांक २०.३.२००७ रोजी एकच प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.५.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी घेतली. सुनावणीसाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर होते. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.५.२००७ रोजी सुनावणी घेतली तथापि यामध्ये अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर त्यांनी कोणत्याही प्रकारचा निश्चित स्वरुपात आदेश न देता, त्यांच्याकडे अपिलार्थीबरोबर झालेल्या चर्चेचा इतिवृत्तांत त्यांनी नोंदवून ठेवला. सदर इतिवृत्तांताची प्रत त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील ७३२ क्रमांकाच्या पत्रान्वये दि. १० मे २००७ रोजी पाठविल्याचे त्यांनी कार्यवृत्तांताच्या प्रतीवर नमूद केले आहे. तथापि ही प्रत अपिलार्थीस मिळाली नसल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये आयोगास सांगितले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी हे अपिलार्थीस या कार्यवृत्तांताची प्रत दिल्यापृष्ठयर्थ कोणताही ठोस पुरावा आयोगाकडे सादर करु शकले नाहीत. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्राची प्रत पाठविली किंवा नाही, म्हणजेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांचा कथित निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला किंवा नाही, याबाबत आयोग साशंक आहे.या सर्व प्रकारांमुळे व्यथित होऊन अपिलार्थीने सुरुवातीच्या परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी माहितीसाठीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जांमध्ये भविष्यातील तारखेचा चुकीने उल्लेख केला आहे. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, त्यांना आवश्यक असलेली माहिती घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात बऱ्याचवेळा व्यक्तिशः उपस्थित झाले. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना माहिती तपासणीसाठी सुध्दा उपलब्ध करुन दिली गेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या रजिस्टर्ड पत्राचा स्वीकार का केला नाही, असे विचारले असता, त्यावेळी ते

मुख्यालयाच्या बाहेर असण्याची शक्यता असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे कबूल केले आहे व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १७.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास त्यांच्याकडील दि. १७.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये तात्काळ प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मूळ अर्जातील उणिवा त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या, तसेच अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी देखील त्यामध्ये दर्शविली आहे.अपिलार्थी माहिती घेण्यासाठी त्यांच्याकडे व्यक्तिशः कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थी माहिती घेऊन जाण्यासाठी किती वेळा आले, याची त्यांच्या कार्यालयाकडे कोणत्याही प्रकारची नोंद नाही. अपिलार्थीस त्यांनी दि. १७.२.२००७ रोजी पाठविलेले पत्र रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले होते. सर्वसाधारणपणे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेले पत्र, पत्र ज्या व्यक्तिच्या नावावर आहे, ती व्यक्ति, दिलेल्या पत्त्यावर आढळून आली नाही, तर सर्वसाधारणपणे पोस्टमन ४ ते ५ वेळा संबंधितांकडे जातो व त्यानंतर, जर या पत्राची तामिली होऊ शकली नाही, तर हे पत्र ज्याने पाठविले, त्याच्याकडे विनातामिली पोस्टामार्फत परत केले जाते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रासंदर्भात असाच काहीसा प्रकार झाला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठया प्रमाणात आहे. अपिलार्थीस द्यावयाची माहिती अंदाजे ३२४८ इतक्या पृष्ठांची आहे. कार्यालयीन खर्चासाठी त्यांच्याकडे फक्त रु.१०१२/- इतकेच अनुदान शिल्लक आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ते आजही तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे दि. २०.३.२००७ रोजीचे प्रथम अपील त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर दि. ३०.३.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयाकडील पत्राने दि. १७.२.२००७ रोजीचे पत्र स्वीकारण्यासाठी व त्या पत्रात नमूद

केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले. या नंतर त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दि. १०.५.२००७ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीच्या वेळी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीने प्रतिपृष्ठ रु.२/- प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडून घेऊन जाण्याबाबत झालेल्या चर्चेची नोंद त्यांच्या दि. १०.५.२००७ रोजीच्या इतिवृत्तांमध्ये केलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १७.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.४.२००६ ते दि. २०.२.२००७ पर्यंतची म्हणजेच भविष्यकाळातील कालावधीमधील माहिती मागितली आहे. त्यामुळे अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्यासाठी केलेला प्रथम अर्ज मूळात अवैध व चुकीचा ठरत आहे. अपिलार्थीने ही चुक त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये मान्य केली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्याकडील दि. १७.२.२००७ रोजीच्या प्रतिसादाद्वारे अपिलार्थीच्या निदर्शनास ही चुक आणून दिलेली आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेले पत्र देखील विनातामिली जन माहिती अधिकारी यांना परत प्राप्त झाले आहे. यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर सादर केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पूर्णतः संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नव्हती, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील संबंधित कामाच्या फक्त मोजमापपुस्तिका व मस्टर्सची झेरॉक्स प्रत एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात होती. अपिलार्थीच्या अर्जातील हे मुद्दे वगळता उर्वरित संपूर्ण माहिती

संबंधित गावाच्या ग्रामपंचायतीकडे होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या प्रती संबंधित ग्रामपंचायतीकडे पाठवून या पत्राची एक प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे आवश्यक होते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित ग्रामपंचायतीकडे परस्पर अर्ज करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची अशाप्रकारची कृती चुकीची आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ती निश्‍चितपणे मोठया प्रमाणात आहे, याबद्दल कोणाचेही दुमत असणार नाही. मात्र याचबरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे दि. १७.२.२००७ रोजीचे पत्र स्वीकारले नाही किंवा व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची तयारी देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही टप्प्यावर दर्शविली नाही, हे देखील या ठिकाणी लक्षात घेण्यासारखे आहे. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे व ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. मात्र अपिलार्थीस त्या माहितीच्या झेरॉक्स प्रती देण्यासाठी त्यांच्याकडे कार्यालयीन खर्च या शीर्षाखाली आवश्यक ते अनुदान उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असल्याने व सदर पत्र अपिलार्थीने अथवा त्यांच्या कोणत्याही अधिकृत प्रतिनिधीने स्वीकारले नसल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय असणार नाही, त्यामुळे जर या माहितीची त्यांना, त्यांनी युक्तिवादामध्ये नमूद केल्याप्रमाणे खरोखरीच आवश्यकता असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या स्वखर्चाने झेरॉक्स प्रती काढून घ्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या पाचही प्रकरणातील संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही टप्प्यावर दुष्ट हेतूने नाकारले अथवा माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्‌हेतूने टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने, त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांची विचाराधीन पाचही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. २००६/०७ निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्र. २००७/०७ निकाली काढण्यात येत आहे.

३. अपील क्र. २००८/०७ निकाली काढण्यात येत आहे.

४. अपील क्र. २००९/०७ निकाली काढण्यात येत आहे.

५. अपील क्र. २०१६/०७ निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एस.एन.विटेकर,प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर,सिडको, वाळुज महानगर,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २४५७/०७,२४५८/०७ व २४५९/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५७,२४५८ व २४५९

निर्णय दिनांक २१-०२-२००९

१. श्री.कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, रा.मुदखेड,जि.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ **अपील क्र.२४५७/२००७**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बिलोली, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली जि.नांदेड : प्रतिवादी

२ **अपील क्र.२४५८/२००७**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकर जि.नांदेड

३ **अपील क्र.२४५९/२००७**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, देगलूर, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, देगलूर जि.नांदेड

अपील क्र.२४५७/२००७ त्रयस्थ पक्षः

१) श्री बसवंत महादप्पा बामने
२) श्री. गंगाधर नागनाथ महाजन
३) श्री. व्यंकटेश हनमलू कुंचनवार
४) श्री. अरुण बापूराव लोकमनवार
५) मे.व्यंकटेश ट्रेडींग कंपनी
६) चेअरमन,शंकरनगर सहकारी साखर कारखाना

अपील क्र.२४५८/२००७ त्रयस्थ पक्षः

१) श्री. तुळशीराम गंगाराम पोकलवार
२) श्री. लक्ष्मण देविदास उत्तरवार
३) श्री. विष्णू लक्ष्मण सोमेवाड
४) श्री. एकनाथ गुंडप्पा महाजन

अपील क्र.२४५९/२००७ त्रयस्थ पक्षः

१) श्री. बंडप्पा शंकरअप्पा गंदीगुडे
२) मे.बालाजी ट्रेडींग कंपनी
३) मे.व्यंकटेश ट्रेडींग कंपनी
४) श्री. विजय धोंडीबा दाशेटवार
५) मे. दमय्या गंगय्या चिद्रावार

# <u>निर्णय</u>

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २१.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व तीनही प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, अपील क्र.२४५८/०७ मधील जन अपिलीय अधिकारी, अपील क्र.२४५९/०७ मधील जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, अपील क्र. २४५७/०७ मधील सर्व त्रयस्थ पक्ष व अपील क्र. २४५९/०७ मधील त्रयस्थ पक्षांपैकी, त्रयस्थ पक्ष मे. व्यंकटेश ट्रेडिंग कंपनी उपस्थित आहेत, तर अपील क्र.२४५७/०७ शी संबंधित जन अपिलीय अधिकारी, अपील क्र. २४५८/०७ मधील सर्व त्रयस्थ पक्ष व अपील क्र. २४५९/०७ मधील पाच त्रयस्थ पक्षापैकी चार त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त तीन प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१०.२००७ रोजी दाखल केलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या तीनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने एकाच प्रकारची माहिती वेगवेगळया जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकाच दिवशी व त्यासंदर्भातील पहिले अपील एकाच दिवशी तीन वेगवेगळया जन अपिलीय अधिकाऱ्यांकडे केले असल्याने, व या अपिलांसंदर्भातील मूळ अर्जांद्वारे मागणी केलेली माहिती एकाच प्रकारची असल्याने या तीनही अपिलांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी तीनही प्रकरणात प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १४.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे तीनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित **काही अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांना केलेले रॉकेलचे नियतन व के.एल.प्रमाणे रॉकेलच्या वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती व त्यांना संलग्न असलेल्या किरकोळ रॉकेल परवानाधारकांच्या रॉकेलच्या वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती** इ. माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने अपील क्र. २४५७/०७ व २४५८/०७ मध्ये विचारलेल्या माहितीशी संबंधित कालावधी दि. १.४.९४ ते ३०.४.२००७ असा होता व अपील क्र.२४५९/०७ मध्ये विचारलेली माहिती दि. १.४.१९९५ ते ३०.४.२००७ या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास नायब तहसीलदार (पुरवठा) बिलोली यांनी दि. २४.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अर्धघाऊक विक्रेत्यांकडे उपलब्ध आहे, त्यांना ही माहिती दि. २८.५.२००७ पूर्वी त्यांच्याकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तसेच याच दिवशी अपिलार्थीस त्यांच्या स्वतंत्र पत्रान्वये संबंधित अर्धघाऊक विक्रेत्यांकडून माहिती प्राप्त होताच त्यांना कळविण्यात येईल, असे सूचित केले व अंतिमतः दि. ८.६.२००७ रोजी माहितीपोटीचे शुल्क रु.५१२०/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १४.७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा **नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील,बिलोली** यांचे दि. ८.६.२००७ रोजी शुल्क भरण्याचे पत्र प्राप्त झाले नसल्याचे आयोगास अवगत केले.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे प्रतिपादन केले. थोडक्यात या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १४.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो कोणताही निर्णय झाला नाही, असे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या **नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील, भोकर** यांच्याकडे केलेल्या दि. १४.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथमतः प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जमा करण्यात येत असल्याची अपिलार्थीस कल्पना दिली व दि. ३०.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित २९२० पृष्ठांसाठी प्रतिपृष्ठ रु.२/- व १३८० पृष्ठांसाठी प्रतिपृष्ठ रु.१०/- प्रमाणे एकूण रु.१९६४०/- इतके शुल्क नमूद लेखाशीर्षाखाली जमा करुन माहिती हस्तगत करावी, असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने

अपिलार्थीने कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,भोकर यांच्याकडे प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या **नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील, देगलूर** यांच्याकडे केलेल्या दि. १४.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथमतः प्रतिसाद देऊन संबंधितांकडून माहिती मागवित असल्याचे अपिलार्थीस कळविले व तदनंतर दि. ३१.७.२००७ रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४३४५०/- त्यांच्या कार्यालयात भरण्याबाबत त्यांना सूचित केले. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.१०.२००७ रोजी आपला निर्णय पारित केला. त्यामध्ये अपिलार्थी हे दि. १.१०.२००७ रोजी सुनावणीस गैरहजर राहिल्याच्या व जन माहिती अधिकारी यांच्या दि. ३१.७.२००७ रोजीच्या पत्रानुसार शुल्क भरले नसल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी संबंधित सर्व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणीसाठीचे पत्र त्यांना प्राप्त झाले नसल्याचे आयोगास अवगत केले.

उपस्थित त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम,संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या उपस्थितीत त्यांच्या प्रथम अपील अर्जांवर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब तहसीलदार, बिलोली, भोकर व देगलूर यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दि. १४.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अपिलार्थीच्या उपस्थितीत, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन त्यासंबंधी आपले निर्णय पारित करावेत. अपिलार्थीस सुनावणीचे पत्र किमान सुनावणीच्या दिवसाच्या

दहा दिवस पूर्वी प्राप्त होईल, असे त्यांनी पहावे. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्यास,ते सदर निर्णय प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची उपरोक्त तीनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. २४५७/०७,२४५८/०७ व २४५९/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार बिलोली,भोकर व देगलूर यांनी अपिलार्थीच्या उपस्थितीत अपिलार्थीच्या दि. १४.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच,झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, सरचिटणीस, लोकभारती (पार्टी), नवी आबादी, मुदखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय बिलोली, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय देगलूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४११

निर्णय दिनांक २४-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. हाजी इब्राहिमखा हाजी इस्माइलखा,<br>जामा मस्जिद ट्रस्ट, कसाली मोहल्ला, अमळनेर,<br>जिल्हा जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर,<br>जिल्हा जळगांव | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जळगांव | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस सहायक जन माहिती अधिकारी, अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ११-१०-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या अपील निर्णयाच्या विरुध्द केले असून विचाराधीन व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अमळनेर शहरातील सिटी सर्व्हे नं. ९५८ च्या मिळकतपत्रिकेच्या संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या अर्जापूर्वी मयत नियाजोद्दिन इमामोद्दीन यांचे नांव ९५८ वरुन या मिळकतीवरुन कमी करण्याबाबत कळविले होते किंवा कसे, अर्जाला उत्तर देताना संबंधित मागील अर्जाचा विचार करण्यात येतो अथवा कसे, नियाजोद्दिन इमामोद्दीन यांचे नांव, धर्मदाय आयुक्त यांचे मंजूरी आदेशानुसार सिटी सर्व्हे नं. ९५८ वर दाखल झाले असल्यास त्यासंबंधी माहिती व मयताचे नांव धर्मदाय आयुक्तांकडून कमी होत असल्यास त्याची माहिती** - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ०७-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०७-२००६ रोजी सुनावणी घेतली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या अभिप्रायात म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या आदेशान्वये फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. अपिलार्थीच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अमळनेर येथील सिटी सर्व्हे नं. ९५८ मधील मिळकतीवरील

मयत नियाजोद्दिन इमामोद्दीन यांचे नांव त्यांना कमी करुन हवे आहे. अपिलार्थीने त्यांचा कथित लेखी युक्तिवाद राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या प्रतिनिधीमार्फत पाठविला आहे तथापि या लेखी युक्तिवादावर अपिलार्थीची सही नाही.

सहायक जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०६-२००६ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांच्या अमळनेर येथील सिटी सर्व्हे नं. ९५८ च्या प्रापर्टीवरुन मयत नियाजोद्दिन इमामोद्दीन यांचे नाव कमी करुन हवे आहे. ट्रस्टच्या एखाद्या सदस्याचे नाव कमी करावयाचे झाल्यास धर्मादाय आयुक्तांकडे संस्थेने प्रस्तावित बदलासंदर्भात अर्ज करुन धर्मादाय आयुक्त यांच्याकडून अशा प्रकारच्या बदलाचे आदेश प्राप्त करुन घेणे कायद्यातील तरतुदीअन्वये त्यांना अनिवार्य आहे. धर्मादाय आयुक्तांकडे अपिलार्थीने मागणी केलेले बदल आदेशाव्दारे मान्य झाल्यास अपिलार्थीच्या या विनंती संदर्भातील मूळ अर्जातील तक्रारीचे निवारण होऊ शकते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे नोंदविलेल्या दिनांक ११-१०-२००६ रोजीच्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांच्या दिनांक ०९-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती पाहता असे दिसन येते की, त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी देखील नियाजोद्दिन इमामोद्दीन यांचे नाव कमी करण्याबाबतचा आग्रह धरला होता. आजच्या सुनावणीच्या वेळी देखील अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने राज्य माहिती आयोगाकडे हाच आग्रह धरला आहे. अपिलार्थीच्या अर्जावर कशा प्रकारे कारवाई करणे शक्य आहे, त्याचे आवश्यक ते मार्गदर्शन सहायक जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये केले आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास असेही अवगत केले आहे की, नियाजोद्दिन इमामोद्दीन यांचे नांव कमी करण्यासंदर्भात

कोणत्या पध्दतीचा अवलंब करावा हे त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी तोंडी समजावून सांगितले आहे. तथपि अपिलार्थी हे त्यांनी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जाच्या संदर्भानेच आपली विनंती पूर्ण करण्याबाबत आग्रही आहेत. येथे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस जर नियाजोद्दिन इमामोद्दीन यांचे नांव संबंधीत अभिलेखावरुन कमी करणे आवश्यक असेल तर त्यांना मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० मधील तरतुदींचा अवलंब करणे अनिवार्य आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत व उचित कारवाई केली असल्याने व अपिलार्थीची वैयक्तीक विनंती मान्य करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना अशा प्रकारे आदेशित करणे आयोगाच्या कक्षेबाहेरचे आहे, हे अपिलार्थीच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खलीलप्रमणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २४-०२-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हाजी इब्राहिमखा हाजी इस्माइलखा, जामा मस्जिद ट्रस्ट, कसाली मोहल्ला, अमळनेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४१२

निर्णय दिनांक २४-०२-२००९

१ श्री. नामदेव पांडुरंग पाटील, प्राचार्य, : अपिलार्थी
गोखले एज्युकेशन सोसायटी संचलीत,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर, तालुका संगमनेर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
श्री. शां. कृ. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय,
देवगड, तालुका देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग - ४१६ ६१३

२ जन अपिलीय अधिकारी,
श्री. शां. कृ. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय,
देवगड, तालुका देवगड,
जिल्हा सिंधुदूर्ग - ४१६ ६१३

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. आयोगास, अपिलार्थीने मूळ व्दितीय अपील दिनांक १३-

१२-२००६ रोजी केले होते. तथापि या अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडली नसल्याने ते परत करण्यात आले. तदनंतर अपिलार्थीने हे अपील (मूळ अपील दिनांक १३-१२-२००६) फेर सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मुंबई विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीच्या दिनांक ०३-०९-२००४ रोजीच्या निर्णयाचे अनुपालन करणे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक असतांनाही त्यांनी अद्यापपर्यंत मुंबई विद्यापीठाच्या निर्णयाचे अनुपालन न करण्याची कारणे, याबाबत कोणताही विलंब न लावता, हा निर्णय अंमलात आणणार आहेत किंवा कसे, अशी माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे हवी असल्याचे मूळ अर्जात म्हटले होते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अर्जास व अपील अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून त्यांना कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले आहे. एवढेच नव्हे तर त्यांचा दिनांक ०५-०७-२००६ रोजीचा मूळ अर्ज देखील संबंधीत संस्थेने स्वीकारला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. श्री. स. प. गर्जे हे त्यावेळी या पदावर कार्यरत होते. अद्यापही संस्थेने माहिती अधिकारी म्हणून त्यांची नेमणूक केलेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, केवळ आपले महाविद्यालय विनाअनुदानित आहे, या धारणेवर संबंधीत शिक्षण संस्थेने अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका देखील केलेल्या नाहीत. याबाबत शिक्षण क्षेत्रातील मंडळी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींकडे किती अनास्थेने पाहत आहेत याची पूर्णतः कल्पना या प्रकरणावरुन येते. संबंधीत संस्थेने अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका तर केलेल्याच नाहीत, परंतु अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज देखील त्यांनी स्वीकारण्याचे नाकारले आहे, त्यांची ही कृती निश्चितच गैर आहे. खाजगी विनाअनुदानित संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होत असल्याबाबतचे आदेश या खंडपीठाने वेळोवेळी दिलेले आहेत. संबंधीत शिक्षण संस्थेवर मुंबई विद्यापीठाचे नियंत्रण आहे. संस्थेचे विद्यार्थी मुंबई विद्यापीठातर्फे संचलीत केल्या जाणा-या बी. एड च्या परीक्षेस बसत असतात. या विद्यार्थ्यांच्या परीक्षा विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रकाकडून घेतल्या जातात. विद्यार्थ्यांकडून परीक्षेकरिता घेतलेली फी विद्यापीठात जमा केली जाते. एवढे नियंत्रण या संस्थांवर असतांना देखील, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांनी अद्यापपावेतो कारवाई न करण्याची कारणे केवळ त्यांची त्यांनाच ठाऊक असावीत. मात्र त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन अधिनियमातील अनुक्रमे कलम ७ (१) व १९ (६) चा भंग केला हे येथे निश्चित सिध्द होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावामुळे संस्थेने स्वतःला अधिनियमातील कलम १९ (८) (ग) च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे हे मात्र निश्चित आहे. सबब अध्यक्ष, शिक्षण विकास मंडळ, देवगड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जास प्रतिसाद न देऊन,

अपिलार्थीचा मूळ अर्ज न स्वीकारुन तसेच अपिलार्थीच्या दिनांक ०२-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्या संस्थेला एकूण रुपये २५,००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. त्यांचा खुलासा या मुदतीत प्राप्त न झाल्यास राज्य माहिती आयोगाने काढलेला निष्कर्ष त्यांना मान्य असल्याचे समजून सदर आदेश अंतीम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता प्रथमतः अपिलार्थीस ती माहिती देण्याबाबत निर्णय घेणे व तदनंतर अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, ती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये व अधिनियमातील विहित पध्दतीप्रमाणे उपलब्ध करुन देणे एवढीच प्रक्रिया यामध्ये समाविष्ट आहे. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय, निर्णयासंदर्भातील कारणे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास देय होत नाही, त्यामुळे या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली कोणतीही माहिती देय होत नाही व अपिलार्थीस अपेक्षित त्यांच्या अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे या प्रकरणी अभिप्रेत नाही. तथापि मूळात अपिलार्थीचा या प्रकरणी माहितीसाठीचा मूळ अर्ज न स्वीकारणे, केलेल्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देणे, या कृतीव्दारे संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे असा

निष्कर्ष घटनाक्रमाच्या प्रत्येक टप्प्यावर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या पूर्णतः नकारात्मक प्रतिसादावरुन काढण्यास कोणतीही हरकत नसावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अध्यक्ष, शिक्षण विकास मंडळ, देवगड यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती न दिल्याबद्दल प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झ ाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नामदेव पांडुरंग पाटील, प्राचार्य, गोखले एज्युकेशन सोसायटी संचलीत, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, श्री. शां. कृ. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय, देवगड, तालुका देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग - ४१६ ६१३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, श्री. शां. कृ. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय,

देवगड, तालुका देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग - ४१६ ६१३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, शिक्षण विकास मंडळ, देवगड, श्री. शां. कृ. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय, देवगड, तालुका देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग - ४१६ ६१३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४१३

निर्णय दिनांक २४-०२-२००९

१ श्री. बाबुलाल रामभाऊ अहिरे, : अपिलार्थी
"शांता निवास", एकतानगर, सटाणा नाका, मालेगाव,
तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा वरिष्ठ लिपीक, महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण
मंडळ, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २३-०२-२००७ रोजी प्रथमतः आपले व्दितीय अपील मुंबई येथील राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयास सादर केले होते. तथापि या अपील अर्जाबरोबर आवश्यक ती कागदपत्रे जोडली नसल्याने ते परत करण्यात आले.

तदनंतर अपिलार्थीकडून आक्षेपांची पुर्तता करुन सदर फेर अपील आयोगाकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी सादर करण्यात आले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९७९ ते २००६ या २७ वर्षाच्या कालावधीतील काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर निर्णय झाला नाही. यासंदर्भात आज रोजी सुनावणीमध्ये उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी ते या पदावर ऑगस्ट २००८ पासून रुजू झाले असल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर एक महिन्याच्या आत सुनावणी घेण्याचे मान्य केले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती, स्वरुप व कालावधी लक्षात घेता आयोगास अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे गरजचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत त्यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश त्यांना प्राप्त झ ााल्यानंतर ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबुलाल रामभाऊ अहिरे, "शांता निवास", एकतानगर, सटाणा नाका, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४१४

निर्णय दिनांक २४-०२-२००९

१ श्री. वासुदेव मार्तंड पाटील, : अपिलार्थी
व्दारा - श्रीमती सी. व्ही. पाटील,
शेवगांव न्यायालय, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक पोलिस निरीक्षक,
मोहाडी नगर, पोलिस स्टेशन, धुळे,
तालुका जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अपर पोलीस अधीक्षक, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २८-०३-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त झालेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, **त्यांच्या दिनांक ०८-०३-२००६ व २०-०५-२००६ रोजीच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चौकशीसंदर्भात कागदपत्रांच्या प्रती व मूळ तक्रार अर्जाच्या प्रती**, अशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. या अर्जासोबत अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६० इतक्या किंमतीचा डिमांड ड्राफ्ट जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. या पत्रासोबत २७ पृष्ठांची माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे या पत्रामध्ये नमूद केलेले आहे. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०८-११-२००६ रोजी प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीची पोचसही असलेले जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०३-११-२००६ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठवूनही अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात कोणतीच माहिती प्राप्त झाली नाही, असे नमूद करुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-११-२००६ रोजी माहिती पाठविल्याचे नमूद करुन, अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक -१२-२००६ या दिनांकाच्या पत्राने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जास प्रतिसाद दिला आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थी त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर राहात नसल्याने अपिलार्थीस त्यांनी देऊ केलेली माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला, मात्र अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर राहात नसल्यामुळे त्यांना प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला मूळ माहितीसाठीचा अर्ज शासनाच्या, सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्रमांक आर. टी आय. २००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११-१०-२००५ मधील नमुन्याप्रमाणे केलेला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली कथित माहिती प्राप्त होण्याच्यादृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे देऊ केलेली माहिती, त्यांनी अहमदनगर येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयास पाठवून, त्या कार्यालयातर्फे ही माहिती अपिलार्थीस प्राप्त होईल अशी व्यवस्था करावी. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीच्या दर्जाबाबत आयोगास कोणतेही भाष्य करता येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत अहमदनगर पोलिसांमार्फत उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वासुदेव मार्तंड पाटील, व्दारा - श्रीमती सी. व्ही. पाटील, शेवगांव न्यायालय, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलिस निरीक्षक, मोहाडी नगर, पोलिस स्टेशन, धुळे, तालुका जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५६

निर्णय दिनांक २४-०२-२००९

१ श्रीमती कमलबाई प्रभाकर वंजारी, : अपिलार्थी
मु. पो. वरणगांव (रामपेठ), तालुका भुसावळ,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा तलाठी, तलाठी कार्यालय, वरणगांव, तालुका
भुसावळ, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भुसावळ
विभाग, भुसावळ, जिल्हा जळगांव

त्रयस्थ पक्ष : श्री. चंद्रकांत हरी बढे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्या भटक्या समाजाची अशिक्षित स्त्री असल्यामुळे तलाठी वरणगांव हे त्यांचा गैरफायदा घेऊन त्यांना चुकीची माहिती देत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता आजपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना योग्य ती माहिती दिली नसल्यामुळे त्यांची चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, **वरणगांव येथील गट नंबर ६५४/०२ मधील प्लॉट क्रमांक ०३ ते १९ यातील कमलबाई प्रभाकर व इतर ७ यांच्या ई कराराची** माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तालुका अभिलेख कक्षात जमा केली असल्याने ही माहिती त्यांनी परस्पर तालुका अभिलेख कक्षातून स्वतंत्रपणे प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०९-२००७ रोजी अंतीम सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २६-०९-२००७ रोजी पारित केले. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मुलाकडे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची प्रत व्यक्तिशः हस्तांतरीत केली. सदर प्रत अपिलार्थीच्या मुलास मिळाल्यापृष्ट्यर्थ जन अपिलीय अधिकारी यांनी पोचसही घेतल्याचे आयोगास दाखविले, तथापि अपिलार्थीस ही माहिती मान्य नसल्याने व संबंधीत तलाठ्याच्या सही शिक्क्याने त्यांना माहिती अपेक्षित असल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज केला. या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती

अधिकारी (तलाठी) यांना सूचित केले. तथापि संबंधीत जन माहिती अधिकारी हे अशा प्रकारची माहिती अर्जदारास देण्यासाठी प्राधिकृत केले गेले नसल्याने, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस तहसीलदार, भुसावळ यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली. तदनंतर २ ते ३ दिवसाच्या आत तहसीलदार, भुसावळ यांनी अपिलार्थीस ही माहिती दिल्याचे तलाठी, भुसावळ यांना अनौपचारिकरित्या ज्ञात झाल्याचे त्यांनी आयोगास सुनावणीत अवगत केले, मात्र अपिलार्थीस हवी तशी तलाठी यांची सही शिक्क्याची नक्कल असलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचा कोणताही पुरावा संबंधीत तलाठी तथा जन माहिती अधिकारी आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

या संपूर्ण घटनाक्रमाचे अवलोकन करता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करतांना, त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना संबंधीत तलाठ्याची सही शिक्क्याची माहिती मिळावी असा कोठेही उल्लेख नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून तलाठ्याच्या सहीशिक्क्याची माहिती देय नाही. अपिलार्थीच्या मुलास प्रथम अपिलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती देऊ केली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या मुलास जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हजर राहण्यासाठीचे कोणतेही अधिकारपत्र अपिलार्थीमार्फत दिले गेले नव्हते व तशा प्रकारच्या अधिकारपत्राची मागणी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीकडे (मुलाकडे) केली नव्हती. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधीत तहसीलदार यांच्यामार्फत दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे देऊ केल्याचे आयोगास अवगत केले. मात्र त्यांच्याकडे अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचा कोणताही पुरावा आज रोजी उपलब्ध नाही. हे सर्व पाहता, तहसीलदार, भुसावळ यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे विनामूल्य व व्यक्तिशः हस्तांतरीत करण्यासाठी, त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस बोलावून घेऊन दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थित अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी हेतूपूर्वक टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. त्याचप्रमाणे अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये व्यक्तिशः कधीही उपस्थित झाल्या नाहीत अथवा यासंदर्भात कोणताही पुरावा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेला नाही. या सर्व बाबी पाहता, जन माहिती अधिकारी यांच्यावर अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये विनंती केल्याप्रमाणे कोणतीही कारवाई करणे आयोग उचित समजत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. तहसीलदार, भुसावळ यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-०२-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती कमलबाई प्रभाकर वंजारी, मु. पो. वरणगांव (रामपेठ), तालुका भुसावळ,

जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, वरणगांव, तालुका भुसावळ, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भुसावळ विभाग, भुसावळ, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ तहसीलदार, तहसील कार्यालय, भुसावळ, तालुका भुसावळ, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५७

निर्णय दिनांक २४-०२-२००९

१ श्री. अनिल बाजीराव बडगुजर, : अपिलार्थी
गांधीपुरा मेनरोड, एरंडोल,
तालुका जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा कनिष्ठ रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन
अधिकारी, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन
केंद्र, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार
मार्गदर्शन केंद्र, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २३-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, सेवायोजन अधिकारी यांनी जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडील लिपीक टंकलेखक पदासाठी दिनांक २६-०६-२००० रोजी त्यांचे यादीत

टाकलेले नाव खोडून परत Age Bar जनगणना कर्मचारी श्री. पांडुरंग पाटील यांच्या नावाची पाठवणी केली. त्यांच्या नोकरीची संधी सेवायोजन अधिकारी यांच्या चुकीमुळे गेलेली आहे याची शहानिशा व चौकशी करुन दोषी असणा-या अधिका-यांवर कडक कारवाई करावी व त्यांच्याकडून अपिलार्थीस नुकसानभरपाई मिळावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दयातील पाच मुद्दे हे जन माहिती अधिकारी यांनी अमूक एक प्रकारची कारवाई का केली नाही अशा पध्दतीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे खुलासे अपेक्षित करणारी अशी आहे तर एका मुद्दयाव्दारे अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०४-२००६ व २९-१२-२००६ च्या अर्जावर केलेल्या कारवाईबाबतची माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खुलासेवजा माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या या पत्रामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात "या कार्यालयाचे पत्र क्रमांक २६/जिरोस्वरेमाकेज/३३९/०७, दिनांक १७-०१-२००७ अन्वये आपल्या अर्जावर उत्तर पाठवून कार्यवाही करण्यात आलेली आहे," अशी माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ाालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय दिनांक ११-४-२००७ रोजी पारित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील लेखी म्हणण्याप्रमाणे तोंडी युक्तिवाद केला व सेवायोजन अधिकारी यांच्या चुकीमुळे त्यांना शासकीय नोकरीसाठी कायमचे मुकावे लागले असे आयोगास अवगत करुन दिले.

जन माहिती अधिकारी यांच्या वतीने जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अंशकालीन कर्मचा-याबाबत शासनाच्या एकूण ३ वेगवेगळया स्वतंत्र आदेशाव्दारे अंशकालीन कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी वेगवेगळे ३ स्वतंत्र आदेश पारित केले आहेत. या आदेशाव्दारे अंशकालीन कर्मचा-यांना ३ वर्षाची सवलत मिळते. जनगणना कर्मचा-यांच्या बाबत शासनाने आता २ वेगवेगळे आदेश निर्गमित केले असून, त्याव्दारे त्यांना ५ वर्षे इतकी शासकीय नोकरीमध्ये सामावून घेण्यासाठी सवलत दिली आहे. अपिलार्थी या दोनही प्रवर्गातील कर्मचारी असून या दोनही प्रवर्गातील कर्मचा-यांना दिलेल्या वेगवेगळया सवलती त्यांना एकत्रित करुन मिळाव्यात असे त्यांचे म्हणणे आहे. या संदर्भात त्यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शन घेतले असता, अशा सवलती एकत्रितपणे अपिलार्थीस देता येणार नाही, असा त्यांच्या वरिष्ठांनी निर्णय दिला आहे. तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी देखील अशाच प्रकारचा निर्णय या प्रकरणी दिला आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-याने पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०२-२००७ राजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सहा मुद्दयाव्दारे त्यांच्या स्वतःच्या नेमणुकीसंदर्भात माहिती विचारली होती. तथापि यापैकी पाच मुद्दे हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारे असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहे.

**कलम २ (च)**

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, उस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती, ती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात देणे अभिप्रेत आहे. "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कृतीबाबत अथवा एखाद्या निर्णयाबाबत कारणे देणे अथवा अपिलार्थीस खुलासा करणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. हे पाहता, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या एकूण सहा मुद्दयापैकी १ ते ५ या मुद्दयावरील माहिती त्यांना देय होत नाही, मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक सहाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देय ठरते. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कारवाईची माहिती मागितली आहे. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०२-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेले उत्तर हे वरील परिच्छेदात नमूद केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रश्नोत्तरांमधील उत्तराच्या स्वरुपात माहिती दिलेली आहे, जे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अभिप्रेत नाही. तेव्हा अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक सहाशी संबंधीत माहिती देण्याच्या दृष्टीने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०४-२००६ व २९-१२-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भातील पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती अपिलार्थीस देणे या ठिकाणी अभिप्रेत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थी यांनी संबंधीत सेवायोजन अधिकारी यांच्यावर, त्यांनी वेळेत अर्ज करुनही वयात सवलत न दिल्याने शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्दयावर असे नमूद करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (१) नुसार जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे अधिकार या प्रकरणी लागू होणार नाहीत, कारण अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरःस्सर टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. केवळ अपिलार्थीने अर्ज केला, अर्जातील अपिलार्थीची विनंती जन माहिती अधिकारी यांनी मान्य केली नाही, म्हणून अपिलार्थीस नोकरीस मुकावे लागले, या कारणाकरिता जन माहिती अधिकारी यांना आयोगास शास्ती लावता येणार नाही. कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात घेतलेला निर्णय हा पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचा असून, केवळ हा अपिलार्थीच्या बाजूने घेतला नाही, हे कारण अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्यासाठी पुरेसे होत नाही. किंबहुना या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्यासाठी कोणतीही अधिकारिता आयोगास अधिनियमातील तरतुदीमध्ये नसल्याने, आयोग अपिलार्थीचा हा मुद्दा फेटाळून लावत आहे. मात्र, आयुक्त, महाराष्ट्र राज्य, रोजगार व स्वंयरोजगार विभाग, नवी मुंबई यांना या विषयासंदर्भात असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणामध्ये त्यांनी गांभीर्यपूर्वक लक्ष घालून, अपिलार्थीच्या म्हणण्यात तथ्य आढळल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर या प्रकरणी आवश्यक ती कारवाई, त्यांच्या कारभारातील पारदर्शकता अधिक स्पष्ट होण्याकरिता करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	२४-०२-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. अनिल बाजीराव बडगुजर, गांधीपुरा मेनरोड, एरंडोल, तालुका जिल्हा जळगांव.

२	जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन अधिकारी, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र, जिल्हापेठ, डॉ. आंबेडकर मार्केट, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र, जिल्हापेठ, डॉ. आंबेडकर मार्केट, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	आयुक्त, महाराष्ट्र राज्य, रोजगार व स्वंयरोजगार विभाग, ३ रा माळा, कोकण भवन, नवी मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०१

निर्णय दिनांक २४-०२-२००९

१ श्री. रविंद्र पुरुषोत्तम वांगे, : अपिलार्थी
उतारगल्ली, कादाबाद,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, जालना,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना,
जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे, **सहायक एकत्रिकरण अधिकारी, जालना यांचे पत्र क्रमांक कॉन/ सामनगाव/८७, दिनांक १६-०३-१९८७ च्या सत्यप्रतीची** मागणी केलेली होती.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय विहित मुदतीत न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत, अथवा याबाबत त्यांनी त्यांचा कोणताही लेखी युक्तिवाद आयोगाकडे सादर केलेला नाही. आज रोजीच्या सुनावणीबाबत राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने संबंधितांना दिनांक १२-०२-२००९ रोजीच्या लेखी नोटिशीव्दारे व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना दिनांक १७-०२-२००९ रोजी दूरध्वनीव्दारे श्री. झोरे लिपीक यांच्यामार्फत सूचना देऊन देखील कोणीही उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास प्रतिसाद न देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न देऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांना फार जिकीरीचे काम होते असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत होती. अधिनियमातील कलम ३ प्रमाणे ही माहिती मिळणे

हा अपिलार्थीचा हक्क आहे. परंतु एवढे असूनही जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे मूळ अर्जाची व त्यावरील प्रथम अपील अर्जाची अक्षम्य उपेक्षा करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब संबंधीत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंब लावल्याने जन माहिती अधिकारी हे अधिनियातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी पात्र ठरत आहेत, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झ ाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच जिल्हाधिकारी, जालना यांना, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय न देऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे, याची त्यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद

दिनांक २४-०२-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र पुरुषोत्तम वांगे, उतारगल्ली, काद्राबाद, जालना.

२ जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०२

निर्णय दिनांक २४-०२-२००९

१ श्री. गंगाधर लक्ष्मण अंबेकर, : अपिलार्थी
मु. पो. पारध, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. रविंद्र भगवान लोखंडे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी माध्यमिक शिक्षणधिका-याऐवजी प्राथमिक शिक्षणाधिका-याकडे अपिलाची सुनावणी ठेवली, संबंधीत शिक्षणाधिका-यांनी माहिती दिली नाही, त्याबद्दल कारवाई होऊ नये म्हणून संबंधीत अधिका-यांने हस्तकामार्फत अपिलार्थीस धमकी दिली व तक्रार मागे घेण्यास लावली. संबंधीत अपिलीय अधिकारी संबंधीत अधिका-याची चौकशी अथवा दंड करु शकत नाहीत असे सांगण्यात आले. त्यांच्या प्रथम अपील सुनावणीसाठी हजर राहिल्यास हस्तकाकरवी मारहाण करणे, त्यामुळे अपील करणा-यास सुनावणीस हजर राहता आले नाही त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. रविंद्र भगवान लोखंडे (शिक्षक), जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पारध यांच्याविषयी एकूण सात मुद्दयांवर माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **श्री. रविंद्र भगवान लोखंडे यांना वृत्तपत्र विक्री आणि बातमीदारी करण्याची परवानगी दिली आहे काय ? कोणत्याही नोकराला थेट प्रेसकडे जाता येते काय ? व वृत्तपत्राकडे माहिती देता येते काय ? शिक्षणाधिका-यांना सुध्दा जिल्हा माहिती अधिका-यामार्फत माहिती प्रसारीत करावी लागते. नोकर शिस्त आणि अटी, सेवा शर्ती याबाबतीत शिस्तभंगाबद्दल आपण कोणती कारवाई करणार की नाही ? संबंधीत शिक्षकाने जून २००६ ते ३० एप्रिल २००७ पर्यंत किती सुट्ट्या उपभोगल्या याची तपशीलवार व तारीखवार आणि रजेच्या अर्जाच्या झेरॉक्स प्रती व नोकराला एखाद्या संस्थेत भरपूर पगार असतांना इतर संस्थेत नोकरी अथवा मानधन संबंधीत संस्थेच्या परवानगीशिवाय घेता येते काय ?** - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे आपला निर्णय पारित केला. अपिलार्थी सुनावणीसाठी उपस्थित राहिले नसल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील या निर्णयाव्दारे खारीज केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या संदर्भातील नस्ती त्यांच्या कार्यालयात सापडत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी हे त्यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००७ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ठेवलेल्या सुनावणीसाठी हजर न राहिल्याने अपिलार्थीचे अपील त्यांनी खारीज केले.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याविषयी वृत्तपत्र विक्री व बातमीदारी करण्यासंदर्भात घेतलेले आक्षेप निराधार असून ते वृत्तपत्र विक्री व बातमीदारी करीत नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केलेल्या लोकमत या दैनिकाची एजन्सी त्यांच्या पत्नीकडे असून त्यांची पत्नी "सज्ञान" असून पत्नीच्या व्यवसायाशी त्यांचा कोणताही संबंध नाही, व त्यांचा व त्यांच्या शाळेचा देखिल या व्यवसायाशी कोणताही संबंध नाही. अपिलार्थी हे प्रथमतः लोकमत या वृत्तपत्राचे बातमीदार होते, तदनंतर त्यांनी ही नोकरी सोडून दिली व दुस-या गावी नोकरी धरली व ती सोडल्यानंतर त्यांनी परत या वृत्तपत्र संस्थेकडे बातमीदार या पदावर त्यांना घेण्यासाठी वृत्तपत्राला विनंती केली असून, संबंधीत वृत्तपत्राने त्यांना बातमीदार या पदावर नेमणूक देण्याचे नाकारले, त्यामुळे अशा प्रकारची माहिती अपिलार्थी मागत असावेत. त्यांच्या रजेच्या अर्जाच्या प्रती अपिलार्थीस देण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे त्यांनी आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण सात मुद्दयापैकी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व ६ शी संबंधीत एवढीच माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीनुसार देय ठरते. उर्वरित ५ मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अत्यंत मोघम स्वरुपाची असून ती माहितीचा विषय होत नाही. अपिलार्थीचा हा मुद्दा म्हणजे त्यांचे अर्जामध्ये स्वतःचे नोंदविलेले अभिप्राय आहेत, त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. उर्वरित ४ मुद्दयाव्दारे (२, ३, ५ व ७) अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे मत, अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे जी, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दल कोणतीही कारणे अथवा खुलासे, स्पष्टीकरण देय असू शकत नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडे सर्वसाधारण परिस्थितीत असणे अभिप्रेत आहे. अपिलार्थी हे ज्या त्रयस्थ पक्षाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागत आहेत ते त्रयस्थ पक्ष जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील एका खाजगी शाळेत कामाला आहेत. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीने संबंधीत मुख्याध्यापकाकडे मागण्याऐवजी ती शिक्षणाधिका-याकडे मागितली आहे. अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस पाठविणे, हे या प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार गरजेचे होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आढळून येत नाही. त्यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस ही माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले आहे. तथापि संबंधीत मुख्याध्यापकाने अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील त्रयस्थ पक्षाच्या हजेरीपटाच्या प्रती पुरविल्या आहेत. त्रयस्थ पक्षाच्या रजेच्या अर्जाच्या झेरॉक्स प्रती मात्र अपिलार्थीस पुरविल्या नाहीत. तसेच अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या बाबत देखील संबंधीत मुख्याध्यापकाने अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा कोणताही पुरावा आयोगासमोर उपलब्ध

नाही. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती व ६ मधील त्रयस्थ पक्षाच्या रजेच्या अर्जाच्या प्रती देय ठरत असल्याने या दोन मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १४-०६-२००७ रोजीच्या माहितीसाठीची नस्ती गहाळ झ ााल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. यासंदर्भात त्यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या अर्जावरील माहितीची नस्ती त्यांच्याकडील ज्या कर्मचा-याने गहाळ केली आहे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत करुन, आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यासंदर्भात व्यक्त केलेल्या अभिप्रायाचे स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच यासंदर्भात त्यांनी कोणताही लेखी पुरावा आयोगाकडे सादर केलेले नाही हे पाहता, अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यासंदर्भात नोंदविलेले संबंधीत अभिप्राय आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ६ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गंगाधर लक्ष्मण अंबेकर, मु. पो. पारध, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २४१५/०७, २४१६/०७ व २४१७/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४१५,२४१६ व २४१७
निर्णय दिनांक २५-०२-२००९

१. श्री. गुलाम इद्रीस अब्दुल खालीक, : अपिलार्थी
रा.मालेगाव, जि. नाशिक

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गॅरेज मॅकेनिक, गॅरेज विभाग,
महानगरपालिका, मालेगाव,जि.नाशिक.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (कर),
महानगरपालिका, मालेगाव,
जि.नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रमुख स्वच्छता निरीक्षक,
महानगरपालिका, मालेगाव,जि.नाशिक

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेली दि. २४.२.२००९ रोजीची, प्रत्येक अपिलाकरिता एक अशी तीन स्वतंत्र पत्र सादर केली असून त्यामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाहिजे असलेली माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांना विचाराधीन द्वितीय अपील चालवावयाचे नाही व ही अपिले रद्द करण्यात यावीत, अशी आयोगास विनंती केली आहे, त्याचबरोबर अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले एक पत्र पोस्टाद्वारे दि. २४.२.२००९ रोजी आयोगाच्या कार्यालयात प्राप्त झाले असून

त्यामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी तथा गॅरेज मेकॅनिक यांनी त्यांना आतापर्यंत मागणी केलेली माहिती दिलेली नाही व तीनही मूळ अर्ज गायब केले आहेत. यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व नियमानुसार प्रतिदिनी रु.२५०/- इतका दंड आकारण्यात यावा व शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी. अपिलार्थीने लिहिलेल्या या दोन्ही परस्परविरोधी त्यांच्या पत्रांचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या या दोन पत्रामध्ये असलेल्या विसंगत भूमिकेमुळे अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या विचाराधीन अपिलांवर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब वरील तीनही अपिले खारीज करण्यात येत आहेत. तसेच यासंदर्भात आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणाची त्यांनी त्यांच्या स्तरावर चौकशी करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरीच त्यांच्या मूळ अर्जांद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली आहे किंवा कसे याची शहानिशा करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांची विचाराधीन तीनही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. २४१५/०७ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्र. २४१६/०७ खारीज करण्यात येत आहे.

३. अपील क्र. २४१७/०७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गुलाम इद्रीस अब्दुल खालीक, तकी हसन (सुंदर मालेगांवी) द्वारा सर्व्हे नं. १०७,

प्लाट नं. १६-१७ हुसैनाबाद कॉलनी, मोहल्ला गुलशने मालीक, मालेगाव जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख स्वच्छता निरीक्षक, महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (कर), महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४१८
निर्णय दिनांक २५-०२-२००९

१ श्री. नसीम अहेमद मोहम्मद याकूब, : अपिलार्थी
रा.मालेगाव जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
आयुक्त,
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव,जि.नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त,
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव,जि.नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगाव जि.नाशिक.

जन अपिलीय अधिकारी : प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका शिक्षण
मंडळ,मालेगाव,जि.नाशिक.

त्रयस्थ पक्षः श्री. शेख अब्दुल वदूद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहे.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०४.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव यांच्याकडून त्यांच्या दि. ३.१.२००७ व ५.१.२००७ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतची जी माहिती मागितली होती त्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ८.१.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे अर्ज केला असता, तेथून तो प्रशासनाधिकारी, शिक्षणमंडळ,मालेगाव महानगरपालिका यांच्याकडे प्रथमतः पाठविला गेला, तदनंतर उपआयुक्त (कर) यांच्याकडे पाठविला, परंतु त्यांना अद्यापपावेतो त्यांच्या अर्जाच्या संदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १७.२.२००७ रोजी उपआयुक्त (कर) महानगरपालिका,मालेगाव यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर सुनावणी घेण्यासाठी अपिलार्थी यांनी दि. २६.२.२००७ व १३.२.२००७ रोजी दोन स्मरणपत्रे पाठवून देखील त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यानंतर दि. ३०.३.२००७ रोजी ते उपआयुक्त (कर) श्री. टी.एस.शेजुळ यांना वैयक्तिक भेटले असता, त्यांनी देखील यासंदर्भात अपिलार्थीशी बोलणे टाळले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि. ३.१.२००७ व ५.१.२००७ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीबाबत व मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळाचे पत्र क्र. जा.क्र.शिक्षण चौकशी/२०९/०२/२००६-०७, दि. ३.१.२००७ वर केलेल्या कार्यवाहीबाबत** एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार त्यांनी दि. १७.२.२००७ रोजी

आयुक्त, महानगरपालिका,मालेगाव यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि आयुक्त,महानगरपालिका, मालेगाव यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. आज रोजी सुनावणीस शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी उपस्थित असून त्यांनी राज्य माहिती आयोगास या प्रकरणाशी त्यांचा कोणताही संबंध पोहचत नसल्याचे सांगितले.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील विषयाची व्याप्ती लक्षात घेता अपिलार्थीच्या दि. १७.२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून अथवा अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथमतः सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब, आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. १७.०२.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत स्वत: किंवा अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित नियुक्त केले गेलेले जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत सुनावणी घेऊन, याच कालावधीमध्ये या संदर्भातील आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव अथवा त्यांनी निर्देशित केलेल्या अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१७.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब

क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नसीम अहमद मोहम्मद याकूब, ४४०, सोमवार वॉर्ड, मालेगाव जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,महानगरपालिका शिक्षण मंडळ,मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव, जि.नाशिक. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४१९
निर्णय दिनांक २५-०२-२००९

१. श्री. ओमप्रकाश मुरलीधर शाह, : अपिलार्थी
रा. मालेगाव,जि.नाशिक

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
आयुक्त,
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जि.नाशिक.

२. जन अपिलीय अधिकारी
नगररचना विभाग,
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव,जि.नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: इमारत पर्यवेक्षक,
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जि. नाशिक.

जन अपिलीय अधिकारी: नगररचनाकार,
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव,जि.नाशिक

त्रयस्थ पक्ष: श्री. वाखारिया, श्री. पाटील व
श्री. महादू पगारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्षापैकी श्री. महादू पगारे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ७.६.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १८.०६.२००७ रोजी नोंदविलेले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती दिली नाही, त्यांच्या प्रथम अर्जास कोणतेही उत्तर दिले नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी अंतिमतः अशी विनंती केली आहे की, त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून माहिती देण्याचे टाळल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - **'सिटीएस.नं.२२० चा धोबीगल्लीतील श्री. पाटील व श्री. वाखारीया यांच्या मालकीच्या तीन मजली इमारीतीपैकी पडीत झालेला तिसरा मजला ऑगस्ट २००० मध्ये पाडला होता, त्या प्रसंगाची केलेली व्हिडीओ शुटींगची नक्कल, झालेल्या पंचनाम्याची प्रत व यासंदर्भात झालेल्या सर्व कागदपत्रांची नक्कल'** अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीचे अवलोकन करण्यासाठी त्यांच्या कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी

यांनी दि. ७.५.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असून ती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी. त्यांनी संदर्भिय अर्जामध्ये नमूद केलेली इमारत पाडण्याचे वेळी महानगरपालिकेमार्फत व्हिडीओ शुटींग करण्यात आले होते व या व्हिडीओ शुटींची कॅसेट महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे. सदर इमारत पाडण्याचे वेळी महानगरपालिकेतर्फे केला गेलेला पंचनामा व यासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतींची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये संदर्भित केलेले बांधकाम पाडण्याचे वेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. तथापि त्यांच्या कार्यालयीन अभिलेख्यावरुन महानगरपालिकेतर्फे अशाप्रकारचे व्हिडीओ शुटींग केली गेली असल्याचे त्यांना आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या व्हिडीओ शुटींगची कॅसेट त्यांच्याकडे उपलब्ध नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीनंतर त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या नस्तीमध्ये उपलब्ध आहे, ती नस्ती शोधण्याचा प्रयत्न केला, तथापि त्यांना त्यावेळी उपलब्ध झालेल्या नस्तीमध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली कागदपत्रे प्रत्यक्षात आढळून न आल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत, मात्र आता अपिलार्थीस हवी असलेल्या कागदपत्रांशी संबंधित अभिलेखे आढळले असून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या व्हिडीओ शुटींगच्या

कॅसेटची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली, ती व्हिडीओ कॅसेट जन माहिती अधिकारी यांच्याकडे आजरोजी उपलब्ध नाही, मूळात या प्रसंगाचे व्हिडीओ शुटींग करण्यात आले याबाबतचा पुरावा अपिलार्थीकडे मागितला असता, अपिलार्थीने प्रत्यक्ष साक्षीदार बोलाविण्यात आल्यास, ते त्याबाबत माहिती देतील, अशाप्रकारचे उत्तर आयोगास दिले. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेले हे उत्तर पुरावा म्हणून आयोग ग्राहय धरत नाही. मूळात व्हिडीओ शुटींग झाले किंवा नाही याबाबत जन माहिती अधिकारी हे संभ्रमात आहेत. आज रोजी त्यांच्याकडे अपिलार्थीने अपेक्षिलेल्या व्हिडीओ शुटींगची कॅसेट उपलब्ध नाही, मात्र ही इमारत पाडताना केलेल्या पंचनाम्याची प्रत व या विषयाशी संबंधित सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध आहेत व ही माहिती अपिलार्थीस देण्यास जन माहिती अधिकारी हे तयार आहेत. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झ ाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २७.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद संबंधित जन माहिती अधिकारी यांनी न दिल्याने, आपल्या या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत, सबब आयुक्त, महानगरपालिका, मालेगाव,जि. नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य हस्तांतरित करावी.

३. आयुक्त, महानगरपालिका मालेगाव,जि. नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ओमप्रकाश मुरलीधर शहा, रा. न्यु वॉर्ड, धोबीगल्ली, घर नं.२२०, मालेगाव जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगाव महानगरपालिका,मालेगाव,जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार,मालेगाव महानगरपालिका, मालेगाव,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका मालेगाव,जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२०
निर्णय दिनांक २५-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. बाळासाहेब पुंडलीक दौंडे,<br>रा.पिंपळगाव लेप, पो.जळगाव नेऊर,<br>ता.येवला,जि.नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती,येवला, जि.नाशिक | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नाशिक | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २७.६.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०६.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी केलेल्या दि. ३०.३.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णयानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे.सदर माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी २२ दिवसांचा विलंब लावल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड करण्याची जन अपिलीय अधिकारी यांनी शिफारस केली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यालयीन

शिस्तभंगविषयक कारवाई व्हावी तसेच अपिलार्थीच्या या प्रकरणी झालेल्या खर्चाबाबत रु.१०००/- नुकसानभरपाई त्यांना संबंधितांकडून देण्याचे आदेशित व्हावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, त्यांच्या अखत्यारित चालणाऱ्या तालुका मास्तर यांच्या कार्यालयासंबंधाने एकूण १० मुद्यांद्वारे काही माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी लागणार असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.३.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.५.२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश त्याचदिवशी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी २२ दिवसांचा विलंब झाल्याचे अनुमान काढून जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रु. २५०/- या प्रमाणे शास्ती लावण्याची शिफारस केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाच्या अनुषंगाने कारवाई होण्याबाबत अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण १० मुद्यांपैकी मुद्दा क्र. ६ ते १० या पाच मुद्यांवरील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसून ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी, त्यांना संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक,केंद्रप्रमुख यांच्याकडून प्रथमतः प्राप्त करुन घेणे भाग होते. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ ते ५ या मुद्यावरील त्यांच्या स्तरावरील माहिती त्यांच्याकडे तयार होती व तसेच अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे असल्याने, माहिती देण्यास उशीर लागणार, याची त्यांनी दि. १२.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे

कल्पना दिली होती. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन अपिलार्थी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः हजर झाले नाहीत. अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नव्हता.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. त्यापैकी पहिल्या पाच मुद्यांसंदर्भातील माहिती प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती, तर उर्वरित पाच मुद्यांसंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील कार्यरत असलेले हेडमास्तर, तालुका मास्तर यांच्याकडून त्यांना प्राप्त करुन घेणे क्रमप्राप्त होते. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. १.२.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. १२.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागणार असल्याची कल्पना दिली होती. वास्तविकतः या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र. ६ ते १० या मुद्यावरील माहिती उपलब्ध नव्हती त्यामुळे त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ ते १० शी संबंधित माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो पाच दिवसांच्या आत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) अनुसार पाठविणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशी कोणतीही कृती न करता, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती इतर प्राधिकरणाकडून स्वतः प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देण्याचा प्रयत्न केला असल्याचे व परिणामी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे अथवा अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही दुष्ट हेतूने नाकारल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही.त्याचबरोबर येथे असे नमूद करण्यात येते की, कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अर्जदाराच्या मूळ

अर्जावर प्रत्येक टप्प्यावर केली जाणारी कार्यवाही ज्ञात होण्याकरिता स्वतः अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून माहिती घेणे त्यांना अनिवार्य असते. मात्र या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते व्यक्तिशः किती वेळा उपस्थित राहिले, यासंदर्भात कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांचे, "अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत" या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना २२ दिवसांचा विलंब लागल्याचे अनुमान जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये काढले आहे. तथापि हा आदेश पारित करताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा उपस्थित राहिले, या मुद्यावर कोणताही विचार केल्याचे आयोगास त्यांच्या प्रथम अपील निर्णयाचे अवलोकन करता आढळूले नाही, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या कथित विलंबाबद्दल केवळ जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन चालणार नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २३.३.२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास कोणत्याही असद्‌हेतूने टाळल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब पुंडलीक दौंडे, मु.पिंपळगाव लेप,पो.जळगाव नेऊर ता.येवला, जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,येवला, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२१
निर्णय दिनांक २५-०२-२००९

१. श्री. गौतम संतोष पारेराव, : अपिलार्थी
रा.धुळे

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,धुळे

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: उपकार्यकारी अभियंता,
राज्य महामार्ग विभाग क्र.११, धुळे.
जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून दि. ३०.१.२००९ रोजी लिहिलेले पत्र जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत आयोगास सादर करण्यात आले असून, यामध्ये अपिलार्थीने, विचाराधीन अपिलाच्या संदर्भात असे म्हटले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांच्याकडील शिपायामार्फत घरपोच दि. ५.५.२००७ रोजी मिळाली होती. त्यांच्या घरच्या लोकांकडून अपिलार्थीस अनावधानाने उशिरा सांगितल्यामुळे त्यांचा गैरसमज झाला व त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले होते. प्रथम

अपिलावरील सुनावणीमध्ये त्यांना तोंडी माहिती मिळाली होती व त्यांना हवी असलेली माहिती मिळाल्याने त्यांची आता कोणतीही तक्रार नाही.

अपिलार्थीच्या दि. ३०.१.२००९ च्या पत्रामधील या मजकूरावरुन अपिलार्थीचे विचाराधीन अपील चालविण्याचे कोणतेही प्रयोजन आता आयोगास उरले नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्र. २४२१/२००७, दि. १९.६.२००७ (राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. २८.६.२००७ रोजी नोंदविलेले) खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. २४२१/०७ खारीज काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गौतम संतोष पारेराव, दै. युगपरिवर्तन एक्सप्रेस कार्यालय, भिमनगर, गुरुकूल हायस्कूलजवळ, साक्रीरोड, धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, राज्य महामार्ग विभाग क्र.११,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२२
निर्णय दिनांक २५-०२-२००९

१. श्री. निळकंठ दगडू पाटील, : अपिलार्थी
रा.बिलखेडे, ता.धरणगाव जि.जळगाव.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, धरणगाव
जि.जळगाव

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,जळगाव भाग,
जि.जळगाव

त्रयस्थ पक्षः श्रीमती पार्वतीबाई भ्र.हेमराज,श्री.काळू दगडू, श्री. भाऊराव दगडू

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३१.५.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १५.०६.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलावर कोणतेही आदेश त्यांना प्राप्त झाले नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या - "**दि. २५.१०.१९६४ रोजी दिलेल्या अर्जाची, सही शिक्क्याच्या**

**नकलेची"** - मागणी टपालाद्वारे अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या अर्जाबरोबरच रु.५०/- इतके माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविले होते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जाची नक्कल त्यांच्या दप्तरी आढळून येत नसल्याचे त्यांना कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.३.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन यासंदर्भात दि.०३.५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जाचा जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख कक्षात पुन्हा शोध घेण्याचे सूचित केले. तसेच अपिलार्थीचा मूळ अर्ज 'क' किंवा 'क-१' वर्गीय असल्यास, तो कधी नष्ट केला, याची माहिती घेऊन अर्जदारास समर्पक उत्तर देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात त्यांनी कसोशीने शोध घेऊनही त्यांना उपलब्ध होऊ शकली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही 'क' वर्गीय असून ती जतन करण्याचा कालावधी फक्त पाच वर्षांचा असल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या विभागाकडून नष्ट केली गेली असावी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस, श्रीमती पार्वतीबाई भ्र. हेमराज, श्री. काळू दगडू व भाऊराव दगडू यांच्या दि. २५.१०.१९६४ रोजी दिलेल्या अर्जाची साक्षांकित प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे. अपिलार्थीने ज्या जमिनीच्या संदर्भातील अर्जाची प्रत

मागितली आहे, त्या संदर्भित अर्जावर कार्यवाही होऊन जमिनीच्या मालकी हक्कामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जावरुन बदल करण्यात आला आहे व तशी नोंद जन माहिती अधिकारी यांच्याकडील फेरफार नोंदवहीवर घेतली गेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केल्याप्रमाणे जमिनीचा मालकी हक्क हस्तांतरित करीत असताना फेरफार नोंदवहीवर फक्त मालकी हक्कामध्ये झालेला बदल नोंदविण्यात येतो, मात्र हा बदल ज्या अर्जाच्या अथवा विनंतीच्या अनुषंगाने केला जातो, ती कागदपत्रे जतन करुन ठेवण्याचा कालावधी पाच वर्षे इतकाच असल्याने अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती उपलब्ध होऊ शकणार नाही, हे उघड आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ३.५.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जाच्या प्रतीचा कसोशीने शोध घेऊनही ती त्यांना उपलब्ध होऊ शकली नाही व तसे त्यांनी दि. २५.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरील कार्यवाही पूर्ण झाली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी यापूर्वीच संपुष्टात आला असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकणार नाही.

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केले असल्याचे अथवा कोणत्याही असद्हेतूने नाकारल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २५-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निळकंठ दगडू पाटील, रा. बिलखेडे पो.जांभोरे, ता.धरणगाव जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, धरणगाव जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जळगाव भाग, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५८
निर्णय दिनांक २५-०२-२००९

१. श्री. तुकाराम लक्ष्मण हांडोरे, : अपिलार्थी
रा.नाशिक.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपआयुक्त (अतिक्रमण विभाग),
महानगरपालिका, नाशिक.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त,
महानगरपालिका,नाशिक.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २२.८.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०८.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात कोणतेही उत्तर व साक्षांकित प्रती प्राप्त झाल्या नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडूनही त्यांना कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे शिवकिरण को.ऑप.हौसिंग सोसायटीमधील अनधिकृत बांधकाम काढण्याविषयी दि. २४.१.२००७ पासून दि. ३०.४.२००७ पर्यंतच्या कालावधीमध्ये केलेल्या कार्यवाहीसंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थी मागणी केलेल्या माहितीमध्ये - **जन माहिती अधिकारी यांनी अनधिकृत बांधकाम काढून टाकणेविषयी दि. २४.१.२००७ पासून दिलेल्या अभिप्रायाच्या व केलेल्या कार्यवाहीच्या साक्षांकित प्रती, नगररचना विभाग, श्री. चहांदे साहेब,जिल्हाधिकारी,आयुक्त यांनी दिलेले अभिप्राय आणि त्यावर संबंधितांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायाच्या साक्षांकित प्रती व जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर कार्यवाही का होत नाही, याची माहिती** - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने, कोणताही लेखी प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि.२८.०६.२००७ रोजी यासंदर्भात आपले आदेश पारित केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पंधरा दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपावेतो प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अधिनियमाद्वारे विहित मुदतीत तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी

कधीही उपस्थित झाले नाहीत. यावर अपिलार्थी यांनी, ही  माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी ते गेले असता, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून त्यांना अपमानास्पद वागणूक मिळाल्याचे नमूद केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी विहित मुदतीत तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतरही अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती घेण्यासाठी उपस्थित राहिले नाहीत, आयोग मान्य करीत नाही. कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन ठेवल्यानंतर या माहितीपोटीचे शुल्क व शुल्काचा तपशील त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे तीस दिवसांच्या आत कळविणे भाग होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कृती जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केलेली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्याला अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते. या टप्प्यावर देखील अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सकारात्मक कार्यवाही केल्याचा पुरावा आयोगासमोर आज रोजी उपलब्ध नाही. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने जे अतिक्रमण काढून टाकण्यासंदर्भात त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता, ते अतिक्रमण त्यांनी काढून टाकले असून, दि. १३.६.२००७ रोजी हे अतिक्रमण काढत असताना त्यांनी केलेल्या पंचनाम्यावर अपिलार्थीने, त्यांची आता कोणतीही तक्रार उरली नसल्याचे, लेखी दिल्याने, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात स्वतः होऊन कोणतीही कार्यवाही केली नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद देखील आयोग मान्य करीत नाही, कारण जरी अपिलार्थीने दि. १३.६.२००७ रोजी महानगरपालिकेने केलेल्या पंचनाम्यावर त्यांची कोणतीही तक्रार नाही, असे नमूद केले असले तरी अपिलार्थीची अतिक्रमण काढून टाकण्यासंदर्भात आता कोणतीही तक्रार राहिली नाही, एवढाच त्याचा अर्थ होता, याचा अर्थ अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमाद्वारे मागणी केलेली माहिती

अपिलार्थीस देणे गरजेचे नाही, असा होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, "आपल्या स्तरावरुन कार्यवाही का होत नाही ?" या मुद्याची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात अर्जदारास देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा त्यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबद्दल त्यांचा कोणताही खुलासा अथवा स्पष्टीकरण मागण्याची तरतुद, 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नाही.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली सर्व माहिती त्यांच्यासोबत आणली असून त्यांनी आयोगासमोर अपिलार्थीस ती व्यक्तिशः विनामूल्य हस्तांतरित केली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांच्या हातून या प्रकरणी घडलेल्या दोन्ही चुकांबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी महानगरपालिका अधिकाऱ्यांकडून त्यांना देण्यात येणाऱ्या वागणूकीबद्दल आयोगाकडे तक्रार केली आहे, यासंदर्भात आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांच्याकरिता जनतेशी व अभ्यागतांशी त्यांनी सौजन्याने वागण्यासंदर्भात सूचना जारी करणारे परिपत्रक त्यांच्या स्तरावर त्वरित पारीत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तुकाराम लक्ष्मण हांडोरे, ९,शिवकिरण को.ऑप.हौसिंग सोसायटी, हनुमानवाडी, मखमलाबाद रोड, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३.

२. जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५००
निर्णय दिनांक २५-०२-२००९

१. श्री. सुरेश साळवे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
चेअरमन, कल्पतरु गृहनिर्माण सहकारी संस्था,म.
औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था,
औरंगाबाद, जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे वकील व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीने दाखल केलेल्या प्रथम अपिलावर अद्यापपावेतो निर्णय दिलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे चेअरमन, कल्पतरु सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्याकडे, - **"संस्था नोंदणीच्या वेळेची सभासद यादी, संस्थेचा नकाशा,**

**लेखापरिक्षण अहवाल,सध्याची सभासद यादी, उपविधीच्या प्रमाणित प्रती, संस्था बदलास उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्या मान्यतेचे आदेश"** ही माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि.१०.८.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि हे आदेश अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे. कल्पतरु सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला नाही, असे नमूद केले आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी दि.३.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आदेश दि. १०.८.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय देखील अपिलार्थीस प्राप्त झाला नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. एकंदरीत या सर्व प्रकारावरुन व उपलब्ध कागदपत्रांची छाननी करता अपिलार्थीने गृहनिर्माण संस्थेकडे मागितलेल्या माहितीचा मूळ अर्ज चुकीच्या पत्त्यावर पाठविला असल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे पत्र अपिलार्थीस ते पोस्टामधून गहाळ झाले असल्याच्या शक्यतेमुळे, प्राप्त झाले नसावे, असे अनुमान काढण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस गृहनिर्माण संस्थेचा निश्चित पत्ता त्यांच्या वकिलामार्फत देण्यात आला व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयाची प्रत देखील अपिलार्थीस पुरविण्यात आली. अपिलार्थीस या टप्प्यावर असे सूचित करण्यात येते की, गृहनिर्माण संस्थेच्या वकीलांनी दिलेल्या संस्थेच्या पत्त्यावर त्यांनी प्रथमतः मूळ माहितीचा अर्ज करावा. गृहनिर्माण संस्थेचे उपस्थित वकील यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या अडचणीचे निराकरण झाल्याचे दिसून येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश साळवे, प्रगती कॉलनी, महानगरपालिका शाळेजवळ,मकई गेट रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन कल्पतरु सहकारी गृहनिर्माण संस्था,म.व्यंकटेशनगर, प्लॉट नं.८०, सेंट फ्रान्सीस हायस्कुलसमोर,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,औरंगाबाद, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०३
निर्णय दिनांक २५-०२-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल म.युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: तहसीलदार, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी: उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सहायक जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २२.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१०.२००७ रोजी दाखल होऊन दि. ६.११.२००८ रोजी फेरसादर झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून विलंब लावला व टाळाटाळ केल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.

१५.६.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या प्रकरणी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१.०५.२००७ रोजीच्या,जो जन माहिती अधिकारी यांना दि. १०.५.२००७ रोजी प्राप्त झाला, त्या मूळ अर्जान्वये त्यांच्याकडे दि. १.४.२००५ ते ३०.४.२००७ या कालावधीशी संबंधित - **औरंगाबाद तालुक्यातील एकूण गोडाऊनपाल यांच्याकडे शासनाकडून शहरी व ग्रामीण भागास स्वस्तधान्य दुकानांच्या वितरणासाठी गहू, तांदुळ यांचे वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच रोजगार हमी योजना, दारिद्रय रेषेखालील योजना व इतर योजनाअंतर्गत शासनाकडून आलेले गहु,तांदुळाच्या वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती -** इत्यादी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्या अधिपत्त्याखालील गोदामपाल यांनी त्यांच्याकडील दि. २३.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ९०,५८०/- इतके त्यांच्या कार्यालयात धनाकर्षाद्वारे भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी आकारलेले शुल्क अवाजवी वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.६.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.७.२००८ रोजी आपले आदेश जारी करुन अपिलार्थीचे अपील, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे शुल्क शासनाच्या दि. १०.८.२००1 रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेनुसार आकारले असल्याचे अनुमान काढून फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या या निर्णयाची प्रत पोस्टाद्वारे दि. १४.८.२००८ रोजी पाठविल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय दिला नाही, हे म्हणणे अग्राहय ठरते. आज रोजी सुनावणीच्या वेळी सहायक जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा खुलासा केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या रजिस्टरच्या झेरॉक्स प्रतींची मागणी केली आहे, त्या रजिस्टरचे आकारमान ४५ सें.मि.

X ६० सें.मि. असे आहे. या आकारमानामध्ये A/4 साईजची सहा पृष्ठे बसू शकतील. अपिलार्थीस ही माहिती पुरविण्यासाठी प्रतिपृष्ठ लावलेला दर शासनाच्या राजपत्रामध्ये अधिसूचित केला गेला आहे. अपिलार्थीस जरी प्रतिपृष्ठ रु.२/- या दराने विहित आकारमानाची माहिती द्यावयाची झाली तरी त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अंदाजे रु.१२/- इतका प्रतिपृष्ठ खर्च येईल.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे विहित मुदतीत सूचित केले होते. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आकारलेले शुल्क योग्य असल्याचा निर्णय त्यांच्या दि. ३०.७.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे दिला आहे. एवढे असूनही अपिलार्थीने आज रोजी पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी आकारलेले शुल्क भरण्यासाठी कोणतीही सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अपिलार्थीस जर खरोखरीच या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक ते शुल्क भरण्याचे प्रथमत: कळविणे व त्यानंतर त्यांनी शुल्कासंदर्भातील आपले म्हणणे आयोगासमोर मांडणे, या प्रकरणी अधिक उचित ठरले असते, तथापि अशाप्रकारची कार्यवाही न करुन अपिलार्थीने त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्याच्या हेतूबद्दल आयोगाच्या मनात शंका निर्माण केल्याचे दिसून येते. अशाप्रकारे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी तेच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कळवूनही तसेच हे शुल्क वाजवी असल्याचा निर्वाळा, जन अपिलीय अधिकारी यांनी देऊनही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क न भरल्याने अपिलार्थीस आजतागायत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. सहायक जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता,जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवाद मान्य

करण्यात येऊन, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विलंबाने कार्यवाही करुन अधिनियमातील कलम १९(६) चा निःसंशयपणे भंग केल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना प्राप्त होणाऱ्या अपील अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीमधील विहित मुदतीत कार्यवाही करावी व आपल्या अशाप्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव टाळावा.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर,बसस्टॅण्डरोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६६

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. किरण माणिकराव यादव, अपिलार्थी
आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिकुंद्रा,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १२-०२-२००९ रोजीचे पत्र आयोगास प्राप्त झाले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांनी आयोगाकडे दिनांक २४-०९-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, ग्रामसेवक, चिकुंद्रा यांच्याकडील माहिती आता त्यांना पूर्णपणे प्राप्त झाली असून, प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे पूर्ण समाधान झाले आहे व माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,

चिकुंद्रा यांच्याबद्दल व त्यांच्या माहितीबद्दल कोणतीही तक्रार नाही. आयोगाकडे केलेले व्दितीय अपील त्यांनी नजरचुकीने केले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०९-२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या पत्रामध्ये दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या व्दितीय अपिलाचा उल्लेख केला आहे. सदरचे अपील ग्रामसेवक, चिकुंद्रा यांच्याविरुध्दचे आहे. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या दिनांक १२-०२-२००९ रोजीच्या अर्जामध्ये दिनांक २४-०९-२००८ हा दिनांक चुकीने पडला असावा, असे अनुमान काढण्यात येत आहे. तसेच आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक ६६/२००८ दिनांक २२-०९-२००८ फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ६६/२००८, दिनांक २२-०९-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिकुंद्रा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७

निर्णय दिनांक २६-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. किरण माणिकराव यादव,<br>आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धनेगाव,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, संबंधितांनी त्यांच्याशी चुकीचा पत्रव्यवहार केला, माहिती मोफत देऊन शासनाचा महसूल बुडविला, माहिती देण्यास जाणुनबुजून

टाळाटाळ केली, माहिती अपूर्ण दिली, माहिती दिशाभूल करणारी दिली, त्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायतमध्ये झालेल्या विकास कामासंबंधी एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातर्फे दिनांक २१-०२-२००९ रोजी दुपारी ०४-३० वाजता पंचायत समिती, तुळजापूर या कार्यालयातील श्री. देशपांडे, वरिष्ठ सहायक यांच्यामार्फत संदेश देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी

यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास, हे आदेश अपिलार्थीस प्राप्त झालेल्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत, ते अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद

दिनांक २६-०२-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धनेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. किरण माणिकराव यादव, अपिलार्थी
आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दिंडेगाव,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली, माहिती अर्जाची दखल घेतली नाही, माहिती जाणुनबुजून दिली नाही, त्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्रामपंचायतमध्ये झालेल्या विकास कामासंबंधी एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास, हे आदेश अपिलार्थीस प्राप्त झालेल्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत, ते अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दिंडेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६९

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. किरण माणिकराव यादव, अपिलार्थी
आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना,
ग्रामपंचायत, कसाई, तालुका तुळजापूर, जिल्हा
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद,
ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना माहिती देण्यासाठी जाणुन-बुजून टाळाटाळ करण्यात आली, माहिती चुकीची व अपूर्ण देण्यात आली असल्याने संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय, कसाई यांच्याकडे, भारत निर्माण योजतेअंतर्गत त्यांच्या कार्यालयातर्फे घेण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना संदर्भात एकूण दहा मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत, कसाई यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जासंदर्भात एक पत्र लिहिले व त्या पत्राबरोबर अंदाजपत्रकाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००८ रोजी आपला निर्णय दिला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असा निष्कर्ष काढला की, संबंधीत पाणीपुरवठा योजनेच्या सचिवांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी त्यांच्याकडे उपलब्ध होती ती त्यांनी दिनांक १०-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे व उर्वरित माहितीबाबत अपिलार्थीस माहिती देण्याची ग्वाही दिली आहे. तसेच अपिलार्थीच्या प्रश्नाची उत्तरे देण्याचे काम जन माहिती अधिकारी यांचे नसल्याने त्याचा विचार होणे योग्य वाटत नसल्याचाही निष्कर्ष त्यांनी या निर्णयामध्ये काढून, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निश्चित स्वरुपाचे कोणतेही आदेश त्यांनी पारित केलेले नाहीत. या सर्व प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातर्फे दिनांक २१-०२-२००९ रोजी दुपारी ०४-३० वाजता पंचायत समिती, तुळजापूर या कार्यालयातील श्री. देशपांडे, वरिष्ठ सहायक यांच्यामार्फत संदेश देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने ज्यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे, त्यांची अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेलेली नाही. अपिलार्थीने या योजनेविषयी अध्यक्ष / सचिव यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे. त्या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचा-याचा समावेश नाही. यासंदर्भात आयोगाने आपले अभिप्राय सचिव (ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग) मंत्रालय यांना दुस-या एका निर्णयामध्ये दिलेले आहेत. या अभिप्रायामध्ये शासनाने मोठ्या प्रमाणात जागतिक बँकेच्या सहकार्याने घेतलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी अधिक पारदर्शक होण्याच्या दृष्टीने या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांची नेमणूक करणे त्यांना कसे आवश्यक आहे याचे सविस्तर विवेचन केले आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ८ व ९ व्दारे विचारलेली माहिती ही संबंधितांकडून स्पष्टीकरण अपेक्षित करणारी अशी आहे. ती माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ शी संबधीत माहिती संबंधितांकडून देय होत नाही. मात्र उर्वरित ८ मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय ठरते. यापैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील अंशतः माहिती - इस्टीमेट च्या प्रती संबंधित सचिवाने विहित मुदतीत पुरविल्या आहेत. अपिलार्थीने संबधिताकडे माहितीची मागणी केली त्यावेळी आवश्यक ती कागदपत्रे जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडे सादर केली गेलेली

होती. त्यामुळे अपिलार्थीस नंतरही उर्वरित माहिती वेळेत प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीस ती माहिती संबंधित योजनेच्या सचिवांकडून पुरविण्यात आली नसल्याचे या प्रकरणी दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित ८ मुद्दयावरील माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस देय ठरते. सबब, उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, तुळजापूर यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ (अंशत:), ८ व ९ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील आक्षेपांचे समर्थन अथवा ते सिध्द करण्याकरिता अपिलार्थी आज रोजी उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जाणुनबुजून टाळाटाळ करणे, माहिती चुकीची देणे, अपूर्ण देणे हे अपिलार्थीचे मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. परंतु अधिनियमातील तरतुदीनुसार मूळात जन माहिती अधिकारी यांची नेमणूक झाली नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही, मात्र अपिलार्थीस या योजनेसंदर्भात आवश्यक ती माहिती उपलब्ध व्हावी या उद्देशाने उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांना आयोग वरीलप्रमाणे आदेश देत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, तुळजापूर यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ व्दारे मागणी केलेली व मुद्दा क्रमांक १

(अंशतः इस्टीमेट ) वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत, कसाई, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४०९

निर्णय दिनांक  २६-०२-२००९

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, अपिलार्थी

३४६३, खिस्तगल्ली,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,

जागतिक बँक प्रकल्प विभाग, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम

मंडळ, पुणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १६-०१-२००७ रोजी नोंदविलेले व दिनांक ०६-०६-२००८ रोजी त्रुटीची पूर्तता करुन फेरसादर झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास माहिती देणे आदेशित न करता अपिलार्थीस परत माहिती मागण्याचा अनाहूत सल्ला दिला असल्याने त्यांनी विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुणे-शिरुर महामार्गाच्या बांधकामासंदर्भातील सन २००५ ते २००६ या कालावधीशी संबंधीत माहिती एकूण वीस मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०९-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११,४३९ इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अभिप्रेत असलेला तपशील दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रानंतर अपिलार्थीने दिनांक २७-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची तपासणी करुन त्यांना तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस उर्वरित माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-११-२००६ रोजी आपले आदेश पारित केले. या अपील आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-याने त्यांच्याकडे उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिल्याचे अनुमान काढून, अपिलार्थीस अधिक तपशील आवश्यक असल्यास स्वतंत्र अर्जाव्दारे माहितीची मागणी करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आपला युक्तिवाद त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या पत्रान्वये फॅक्सव्दारे आयोगास पाठविला असून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या कामाबद्दल झालेला हलगर्जीपणा व भ्रष्टाचार लपविण्याकरिता उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आय. आर. सी. नियमावली उपलब्ध नाही, हे म्हणणे अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे. तसेच निविदाबाबतच्या टिपण्या, रस्त्यावर लावावयाच्या फलकाबाबतचा ठेकेदाराशी केलेला पत्रव्यवहार कधी केला, या सर्व बाबी आयोगाने विचारात घ्याव्या अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, माहिती अधिकार कायदा लागू असतांनाही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक त्या माहितीपासून वंचित ठेवले असल्याने, संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी या प्रकरणी केलेल्या टाळाटाळीबाबत शासनाकडे योग्य तो प्रस्ताव पाठवावा.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, याच कामासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस आतापर्यंत त्यांच्या एकूण ४१ अर्जासंदर्भात अंदाजे २२,००० पानांची माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार केल्यानंतर अंदाजे ७ ते ८ हजार पृष्ठांची माहिती अपिलार्थीने नाकारली आहे. अपिलार्थीने या कामाप्रीत्यर्थ मा. उच्च न्यायालयामध्ये केलेली जनहित याचिकाही प्रलंबीत आहे. यापुढेही अपिलार्थीस काही माहितीची आवश्यकता असेल तर ती अपिलार्थीस देण्यासाठी ते तयार आहेत. अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्याचा त्यांचा या प्रकरणी कधीही उद्देश नव्हता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेली माहिती पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती अंशत: दिली आहे. या मुद्दयामधील "संबंधीत अधिका-याने दिलेल्या शे-याची माहिती " ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो दिलेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक ७ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस देय आहे, तथापि ही माहिती देखील आजपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दुस-या अर्जासंदर्भात दिली असल्याने अपिलार्थीस ही माहिती त्यांनी पुरविली नाही, तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे, कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे ' टोल नाके निविदेतील तरतुदीनुसार बांधण्यात आले आहेत, ' एवढाच उल्लेख केला आहे. निविदेतील तरतुदीपेक्षा वेगळ्या ठिकाणी प्रत्यक्षात टोल नाके आणखी उभारले गेले असल्यास, यासंदर्भातील माहिती अपिलार्थीस देय होते. याचबरोबर अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ८ मध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने तक्रार कोणाकडे करावी, याची माहिती मागितली असता अपिलार्थीस दिलेली माहितीमध्ये दक्षता व गुणनियंत्रण मंडळाच्या कोणत्याही कार्यालयाचा उल्लेख त्यामध्ये केलेला नाही, त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस दिलेली माहिती अपूर्ण ठरत आहे. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक १० च्या संदर्भात पार्कींग लॉट्स बाबत नियमाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी या रस्त्यावर कोठेही पार्कींग लॉट बांधलेले नाहीत अशी माहिती दिली, तथापि या पार्कींग लॉटच्या नकाशा नुसार करावयाच्या बांधकामासंदर्भात नियमाच्या व विनिर्देशाच्या (स्पेसिफिकेशन) प्रती अपिलार्थीस पुरविल्या नसल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत नाही. तसेच या मुद्दयावर शासनाशी कोणताही पत्रव्यवहार केला नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविल्याचेही आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १३ व्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण ठरत आहे. अपिलार्थीस मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १५ च्या संदर्भात अपिलार्थीने या रस्त्यावर रस्त्याच्या बाजुंनी झालेल्या बांधकामामुळे किती ठिकाणी नियमांचे उल्लंघन झाले याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असता यासंदर्भात आय. आर. सी. चे नियम कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले. तथापि आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये ही

माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचे मान्य केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १८ च्यासंदर्भात पुणे - शिरुर रस्त्याचे चौपदरीकरण बीटीओ तत्वावर सुरु करत असतांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे निविदा स्तरावर उपलब्ध असलेल्या हे काम असतांना त्यांच्याकडे शक्याशक्यतेच्या अहवालाच्या अथवा अंदाजाच्या प्रती त्यांनी देणे या ठिकणी प्रस्तुत झाले असते. तथापि या ठिकाणीही जन माहिती अधिकारी यांनी टिपणी उपलब्ध नाही असे मोघम उत्तर अपिलार्थीस दिले आहे. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर ही माहिती अपिलार्थीस देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २० मधील माहिती जन माहिती अधिकारी यांनी वेगळया संदर्भाने दिली आहे, तथापि आता अपिलार्थीने नवीन संदर्भाव्दारे मागितली असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुनःश्च देय ठरते.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप लक्षात घेता या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही मुद्दयावर, वर विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, अद्यापही माहिती देणे बाकी असल्याचे दिसून येते. ही सर्व माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर झालेल्या सुनावणीमध्ये मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ अंशतः, मुद्दा क्रमांक ७, मुद्दा क्रमांक ८, मुद्दा क्रमांक १० अंशतः, मुद्दा क्रमांक १३ अंशतः, मुद्दा क्रमांक १५, मुद्दा क्रमांक १८ व मुद्दा क्रमांक २० शी संबंधीत माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी माहिती दिल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये सप्ष्ट केले आहे. त्यामुळे नेमकी याच अर्जासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून दडवून ठेवण्याचे कोणतेही प्रयोजन जन माहिती अधिकारी यांना असावे असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीपासून ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी असद्हेतुने दडवून ठेवल्याचे अथवा ही माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीने आयोगाकडे

केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादातील, जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याच्यासंदर्भात करण्यात आलेली विनंती, आयोग अमान्य करीत आहे.

प्रसंगावशात आयोगास असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना स्वत: सही न करता त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-याच्या सहीने अपिलार्थीच्या अपील अर्जावर आदेश पारित केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर असून त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना सदर निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या सहीने पारित होतील अशी इत:पर दक्षता घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती, वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, ३४६३, खिस्तगल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, पुणे, मध्यवर्ती इमारत आवार, पुणे - ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४१०

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, अपिलार्थी
३४६३, खिस्तगल्ली,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
मंडळ, पुणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १८-०८-२००६ रोजी नोंदविलेले व दिनांक ०५-०९-२००८ रोजी त्रुटींची पूर्तता करुन फेरसादर झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन त्यांना विनामूल्य माहिती दिली, तथापि त्यांच्या मूळ अर्जातील संबंधीत कामाची अधिका-यासह पाहणी करणे व झालेल्या कामाचे नमुने घेण्याबाबतची त्यांची मागणी जन अपिलीय अधिकारी यांनी फेटाळली आणि त्यांच्या अपील अर्जावर कोणतेही लेखी आदेश दिले नाहीत, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील एकूण चार मुद्यापैकी तीन मुद्दयांसदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०७-०८-२००६ रोजी विनामूल्य माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २००० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये अपिलार्थीस शुल्क कळविले गेले नसल्याने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०७-०८-२००६ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील एकूण तीन मुद्दयावरील माहिती विनामूल्य दिली. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०८-२००६ रोजी आपले आदेश पारित केले. या अपील आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कामाच्या तपासणी व नमुने घेण्यासंदर्भातील माहिती अनुत्तरीत राहिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आपला युक्तिवाद त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या पत्राने फॅक्सव्दारे आयोगास पाठविला असून या

युक्तिवादामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पूर्ण माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे. या पत्रातील उर्वरित बहुतांश युक्तिवाद हा त्यांच्या व्दितीय अपील क्रमांक २४०९/२००७ च्या संदर्भात केलेला दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कोणत्याही कलमामध्ये समाविष्ट नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात यावे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण चार मुद्यापैकी तीन मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ हा खालीलप्रमाणे आहे.

"वरील तपशीला नुसार पुणे - शिरुर या कामाच्या संदर्भात मा. कार्यकारी अभियंता किंवा त्यांचे वतीने हजर असणा-या अधिकारी समवेत पुणे - शिरुर या रस्त्याचे निविदा नुसार काम झ ाल्या बाबत पहाणी, तपासणी, कामाचे नमुने घेणे आहे. या बाबत आपल्या कडिल सोईची तारीख कळवावी. तसेच संबंधीत अधिका-याकडे सदर कामाच्या निविदा, ड्रॉईग आदि माहिती आद्यावत असावी."

या मुद्दयाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने पुणे - शिरुर रस्त्याच्या कामाबाबत पाहणी, तपासणी व कामाचे नमुने जन माहिती अधिकारी अथवा त्यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थित घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे सोईची तारीख मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (\ा) मध्ये "माहितीचा अधिकार" या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहे.

"माहितीचा अधिकार" याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये, --

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे ;

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे ;

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे ;

(चार) डिस्केट्, फ्लॉपी, टेप, व्हीडिओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिन्टआऊट) मार्फत माहिती मिळविणे ; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो ;

या व्याख्येचे अवलोकन करता अपिलार्थीस सामुग्रीचे प्रमाणित नमुने घेण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट होते. या मध्ये कामाची एकत्रित तपासणी, जी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे अभिप्रेत आहे तिचा समावेश यामध्ये नाही. त्यामुळे अपिलार्थीस या कामाची तपासणी स्वतः स्वतंत्रपणे कधीही करता येईल या पाहणीमध्ये त्यांना काही आक्षेपार्ह बाबी आढळल्यास या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना आपल्या आक्षेपांचे निराकरणही जन माहिती अधिकारी यांच्याकडून करुन घेता येईल. सामुग्रीच्या प्रमाणित नमुन्याच्या तपासणीसंदर्भात येथे असे नमूद करण्यात येत आहे की, या रस्त्याच्या बांधकामाकरिता अनेक प्रकारची सामुग्री उदा. खडी, मुरुम, डांबर, सिमेंट, स्टील, पथदर्शक चिन्हे, क्रॅश बॅरीअर इत्यादी अनेकविध प्रकारे या बांधकामामध्ये वापरली गेली आहे. अद्यापपावेतो वरील २ (\ा) (तीन) च्या संदर्भात सामुग्रीचे प्रमाणित नमुने घेण्यासाठी कोणतीही पध्दत आयोगाने निश्चित केली नाही हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की त्यांनी प्रथमतः या रस्त्याची पाहणी करुन रस्त्याच्या नेमक्या कोणत्या लांबीतील कोणत्या स्तरावरील व कोणत्या सामुग्रीची पाहणी करावयाची आहे हे त्यांच्या स्तरावर प्रथम निश्चित करुन त्याप्रमाणे सुसंगत माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून

स्वतंत्र अर्जाव्दारे मागवावी.  अपिलार्थीकडून असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तावाचे योग्य ते मूल्यमापन करुन अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे सकारात्मक प्रतिसाद द्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील त्यांच्या निर्णयाची प्रत अद्यापपर्यंत अपिलार्थीस मिळाली नाही, ती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २६-०२-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, ३४६३, खिस्तगल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, पुणे, मध्यवर्ती इमारत आवार, पुणे - ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२५

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. अजय एस. तायडे, अपिलार्थी

क्वॉर्टर नं. २२/१६५ टाईप-II, सुभाषनगर,

ऑर्डनन्स फॅक्टरी इस्टेट, भुसावळ,

जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद विभाग,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उपसंचालक (आरोग्य सेवा),

औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय उपसंचालक (आरोग्य सेवा), औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे दिनांक २४-०२-२००९ रोजीचे, विचाराधीन अपिलासंदर्भात, राज्य माहिती आयोगाला आज एक पत्र प्राप्त झाले असून, या पत्रामध्ये, अपिलार्थीने त्यांनी राज्य

माहिती आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील मागे घेण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती आयोग मान्य करीत असून अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २४२५/२००७, दिनांक १६-०७-२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २४२५/२००७, दिनांक १६-०७-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अजय एस. तायडे, क्वॉर्टर नं. २२/१६५ टाईप-II, सुभाषनगर, ऑर्डनन्स फॅक्टरी इस्टेट, भुसावळ, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय उपसंचालक (आरोग्य सेवा), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (आरोग्य सेवा), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२६

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर, अपिलार्थी
मु. पो. पिंपळनेर, तालुका साक्री,
जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय,
धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी
कार्यालय, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०९-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०५-०६-२००७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द केले आहे.

आयोगाकडील अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **मंडळ अधिकारी, पिंपळनेर यांच्याविरुध्द शिस्तभंग व प्रशासकीय कारवाई झाली असेल तर त्या कारवाईसंदर्भातील सर्व कागदपत्रांच्या नकला, उपविभागीय अधिकारी, धुळे यांच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या पत्रास अनुसरुन करण्यात आलेल्या कारवाईशी संबंधीत संपूर्ण कागदपत्रांच्या नकला व अपिलार्थीने उपविभागीय अधिकारी, धुळे यांच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या पत्राच्या संदर्भाने दिनांक १२-०२-२००७ व दिनांक २६-०२-२००७ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईच्या संचिकेतील सर्व कागदपत्रांच्या नकला** - ही माहिती अपेक्षिली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या कागदपत्रांच्या नकला अपिलार्थीस देता येत असतांना त्या न देऊन अपिलार्थीची दिशाभूल केली, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाने साक्षांकीत नकलासाठी एका प्रतीचे दहा रुपये फी ची मागणी केली. त्यामुळे त्यांना माहिती देण्यासाठी आदेशित करुन, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी केलेली टाळाटाळ, दिरंगाई व कुचराई विचारात घेता त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) नुसार कारवाई करण्याची अपिलार्थीने विचाराधीन अपिलामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०४-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात खुलासा केला. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या खुलासेवजा माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या आदेशाव्दारे निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन

अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक "ए" व "बी" शी संबंधीत माहिती त्यांना अनुक्रमे दिनांक १७-१२-२००७ रोजी समक्ष व दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे, विनामूल्य दिली असून त्यांनी दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या पत्रावर अपिलार्थीची पोचसही घेतली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक "सी" च्या संदर्भात अधीक्षक, भूमि अभिलेख, धुळे यांच्या कार्यालयातर्फे संबंधीत कर्मचा-यावर शिस्तभंगविषयक कारवाई प्रगतीत असून अपिलार्थीस त्याप्रमाणे अधीक्षक, भूमि अभिलेख, धुळे यांनी दिनांक २०-०६-२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या तसेच अपिलार्थीने माहितीसाठीचा ज्यावेळी अर्ज केला त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस अद्यापही त्यांच्या दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने व ती माहिती मागण्याचा अपिलार्थीस अधिनियमातील कलम ३ नुसार हक्क असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती कलम ७ च्या तरतुदीनुसार देय ठरत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "सी" च्या संदर्भातील माहिती न देण्यासाठी कोणतेही कारण समर्थनीय असावे, असे आयोगास या प्रकरणी वाटत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "सी" च्या संदर्भातील

अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये मुद्दा ३ मध्ये, माहितीच्या प्रतींची मागणी केली असता दहा रुपये प्रतिपृष्ठ अशा दराने शुल्क आकारण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, कोणत्याही अर्जदाराने माहिती मागितल्यास त्यांना शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११-१०-२००५ रोजीच्या अधिसूचना क्रमांक आर. टी आय. २००५/सी.आर.३१५/०५/५, मधील परिच्छेद ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना शुल्काची आकारणी करणे अनिवार्य आहे. कोणत्याही परिस्थितीत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी या अधिसूचनेतील तरतुदीव्यतिरिक्त दुस-या दराने अर्जदाराला जन माहिती अधिकारी यांनी आकारणे सर्वथा अवैध राहील.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जरी प्रतिसाद दिला असला तरी तो प्रतिसाद अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "सी" संदर्भात माहिती प्राप्त न झाल्याने अपूर्ण ठरतो. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "ए" व "बी" च्या संदर्भात दिनांक १७-१२-२००७ व ०३-०७-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी जरी विनामूल्य माहिती पुरविली असली तरी ही माहिती त्यांनी दिनांक ०८-०५-२००७ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस देणे भाग होते, ही बाब येथे दुर्लक्षित करुन चालणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याचे याव्दारे सिध्द होत आहे, त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत. सबब जिल्हाधिकारी, धुळे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक 'सी' शी संबंधित माहिती, निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, धुळे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर, मु. पो. पिंपळनेर, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, (महसूल शाखा), धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२७

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. गौतम संतोष पारेराव, अपिलार्थी
दै. युगपरिवर्तन एक्सप्रेस कार्यालय, भिमनगर,
गुरुकुल हायस्कूल जवळ, साक्री रोड, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नगर रचनाकार, महानगरपालिका, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक आयुक्त, महानगरपालिका, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०९-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०५-२००७ रोजी आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आदेशित केले.

तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे "**उषाबाई आनंदा मोरे या महिलेवर नगरपालिकेने गुन्हा दाखल केलेला आहे. त्या गुन्ह्याचा निकाल धुळे कोर्टात सुरु होता. आम्हाला असे माहित पडले की, त्या गुन्ह्याबाबत काय निर्णय झाला व कोर्टात आपले कर्मचारी का गैरहजर राहतात**" ही माहिती विचारली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधीत न्यायालयाकडून कोणताही निर्णय त्यांना प्राप्त न झाल्याने व कोर्टात आपले कर्मचारी का गैरहजर राहतात या मुद्दयावरील माहिती, अपिलार्थीस ती माहिती अधिकारात देय नसल्याने दिली नाही, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०६-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी असा निर्णय दिला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर दावा दाखल झाल्यापासून किती समन्स कोणत्या तारखांना दिले व त्यात कोण उपस्थित राहिले तसेच दाव्याची सद्यस्थिती याबाबतची माहिती १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस स्वतंत्र पत्राव्दारे देण्यात यावी. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्दयांवर कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पाटील यांचे दिनांक ०४-११-२००८ रोजी दु:खद निधन झाले असून ते दिनांक २८-११-२००८ पासून नगर रचनाकार या पदावर कार्यरत आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०३-२००७ रोजी विहित मुदतीत दिलेला प्रतिसाद योग्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे न्यायालयीन प्रकरणाची सद्यस्थिती कळविली असून अद्यापपावेतो या प्रकरणी अंतीम निर्णय लागला नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे. कोर्टामध्ये जन माहिती अधिकारी यांचे कर्मचारी का गैरहजर राहतात, या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय नाही, असे म्हटले आहे व ते बरोबर आहे. कारण माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येते की, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात अर्जदाराने मागितलेली माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणे एवढीच प्रक्रिया "माहिती" या शब्दाच्या व्याखेच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबद्दल अथवा कोठल्याही निर्णयाबद्दल कारणे मागणे, त्यांच्याकडून खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागणे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास अनुज्ञेय नाही. त्यामुळे मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर बरोबर आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील निर्णयामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात न विचारलेली व अतिरिक्त माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते, ही जन अपिलीय अधिकारी यांची कृती चुकीची आहे.

त्यामुळे ही अतिरिक्त माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई आदेशित करणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असणार नाही. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत, त्यांना देय असलेली माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गौतम संतोष पारेराव, दै. युगपरिवर्तन एक्सप्रेस कार्यालय, भिमनगर, गुरुकुल हायस्कूल जवळ, साक्री रोड, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, महानगरपालिका, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, महानगरपालिका, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२८

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. प्रविण शंकरराव थोरात, अपिलार्थी
मु. पो. पिंपळनेर (रामनगर), तालुका साक्री,
जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग, नाशिक

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक महात्मा फुले विद्यालय व शिक्षण उपसंचालक नाशिक यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २८-०२-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या

पत्रामध्ये त्यांनी विचाराधीन अपील अर्जामधील संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ११-०२-२००९ रोजी प्राप्त झाली असल्याने, या प्रकरणी त्यांची तक्रार राहिली नसल्याने, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले, आज रोजी विचाराधीन असलेले त्यांचे व्दितीय अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थी आता त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन व्दितीय अपील मागे घेत असल्याने, अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील क्रमांक २४२८/२००७, दिनांक ०९-०७-२००७ खारीज करण्यात करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २४२८/२००७, दिनांक ०९-०७-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रविण शंकरराव थोरात, मु. पो. पिंपळनेर (रामनगर), तालुका साक्री, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२९

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. अब्दुल मजीद मुसा शहा, अपिलार्थी
घ. नं. १२२, किल्ला झोपडपट्टी,
रविवार वॉर्ड, गल्ली नं. ४, मालेगाव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, मालेगाव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, श. त. ग्रा. विभाग,
मालेगाव, जिल्हा नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहरी विभाग-३, मालेगाव, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष : १ श्री. यादव
२ श्रीमती सायरा बी. शाह
३ श्रीमती नौशाद बानो मजीद शाह

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत तर जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १८-०२-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असलेली माहिती मिळाली असल्याने, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील निकाली काढावे, अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले विचाराधीन व्दितीय अपील क्रमांक २४२९/२००७, दिनांक १६-०७-२००७ खारीज करण्यात करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक २४२९/२००७, दिनांक १६-०७-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल मजीद मुसा शहा, घ. नं. १२२, किल्ला झोपडपट्टी, रविवार वॉर्ड, गल्ली नं. ४, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहरी विभाग-३, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, श. त. ग्रा. विभाग, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३०

निर्णय दिनांक  २६-०२-२००९

१ श्री. सुनिल सखाराम मोरे, अपिलार्थी
औषध निर्माता, प्राथमिक आरोग्य केंद्र, शनीमांडळ,
तालुका नंदुरबार, जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २९-०६-२००७ रोजी दाखल केलेले व दिनांक ०९-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक १३-०४-२००७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकुवा यांच्याकडे माहिती मागण्यासाठी अर्ज सादर केला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून धमकी देऊन कार्यालयाबाहेर काढले गेले, त्यांनी दिनांक १९-०५-२००७ रोजी तक्रार अर्ज व जोडपत्र "ब" मुख्य कार्यकारी अधिकारी, नंदुरबार जिल्हा परिषद यांना दिले असता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकुवा यांनी दिनांक ०८-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या ताब्यात त्यांचे मूळ सेवा पुस्तकच दिले व अशा प्रकारे त्यांची छळवणूक केली व मानसिक त्रास संबंधितांनी दिला आहे. या सर्व प्रकारावरुन अपिलार्थीने असा निष्कर्ष काढला आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली व माहिती तपासणीसाठी नकार दिला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिलेल्या ३० पत्रांवर वर कारवाई का झाली नाही याबाबत माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या मागणी केलेल्या माहितीमध्ये - **वेतनश्रेणी निश्चिती, नादेय दाखला व इतर शासकीय माहिती मिळण्यासाठी विलंब का झाला, दिनांक २०-१२-२००५ ते ०७-०२-२००७ या तीन वर्षाच्या कालावधीत ३० पत्रावर कार्यवाही का झाली नाही व शासन निर्णयावर कार्यवाही का केली जात नाही** - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०८-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जातील माहितीसंदर्भात खुलासा केला. तथापि या खुलाशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीची सेवापुस्तिका नंदुरबार पंचायत समितीकडून त्यांना प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या वेतननिश्चितीची कारवाई त्यांनी अद्यापपावेतो केलेली नाही. मात्र आता नंदुरबार पंचायत समिती यांच्याकडून अपिलार्थीची सेवापुस्तिका प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण थकबाकी १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस देण्याचे त्यांनी आयोगासमक्ष कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना देय होत नाही. या अर्जाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दल खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशा प्रकारची माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तथापि अपिलार्थीच्या दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही हेही तितकेच खरे आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०८-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम खुलासा प्राप्त झाला. जन अपिलीय अधिकारी यांनी तर अपिलार्थीच्या दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार करण्याचे साधे सौजन्यही दाखविले नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची

नोंद विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस २७ दिवस इतक्या विलंबाने खुलासा पाठविला. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देता ती २७ दिवसाच्या विलंबाने दिल्याबद्दल कोणतेही समर्थन, या प्रकरणी असणे संभवत नसल्याने, संबंधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निश्चित पात्र ठरत आहेत, अशी आयोगाची खात्री झाली आहे. आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास विलंबाने प्रतिसाद देण्याची कोणतीही कारणे ते त्यांना पुरेशी संधी देऊनही आयोगासमोर स्पष्ट करु शकत नाहीत. सबब जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकुवा यांना उपरोक्त प्रकरणी, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती देण्यासाठी लावलेल्या २७ दिवसाच्या विलंबाबाबत त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये ६७५० (अक्षरी रुपये सहा हजार सातशे पन्नास ) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झ ाल्यापासून तीस दिवसाच्या आत आयोगाकडे सरळ सादर करावा असे आदेशित करण्यात येत आहे. विहित मुदतीत त्यांचा कोणताही खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी विलंबाने माहिती दिल्याचे मान्य असल्याचे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने, अपिलार्थीने ज्या कामाकरिता त्यांच्याकडे माहितीची मागणी केली होती ते अपिलार्थीस देय असलेल्या थकबाकीसंदर्भातील काम त्यांनी १५ दिवसाचे आत पूर्ण करण्याचे आयोगास आश्वासन दिले आहे. त्याचप्रमाणे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकुवा यांना अपिलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भाने असलेल्या मूळ गा-हाण्याचा निपटारा त्यांनी १५ दिवसाच्या आत करावा, असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकुवा यांना या प्रकरणी एकूण रुपये ६७५० (अक्षरी रुपये सहा हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याबद्दल का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल सखाराम मोरे, औषध निर्माता, प्राथमिक आरोग्य केंद्र, शनीमांडळ, तालुका नंदुरबार, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३१

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. गौतम संतोष पारेराव, अपिलार्थी
दै. युगपरिवर्तन एक्सप्रेस, कार्यालय, भिमनगर,
गुरुकुल हायस्कूल जवळ, साक्री रोड, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (सार्वजनिक बांधकाम) विभाग, धुळे

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (सार्वजनिक बांधकाम) विभाग, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०९-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये

अपिलार्थीस त्यांनी मूळ माहितीसाठीच्या केलेल्या अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना अपेक्षित असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, **धुळे जिल्ह्यात रोजगार हमी योजना सोडून त्यांच्या खात्यामार्फत कोठे कामे चालू आहेत, त्यांचे ठिकाण, काम निरीक्षण करणा-याचे नांव, योजनेचे नांव, दिलेल्या ठेकेदाराचे नांव व ठेकेदारी पध्दतीने किती कामे चालू आहेत, किती पूर्ण झाले व किती अपूर्ण आहे याची माहिती**, ही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने ही माहिती सन २००६ ते २००७ या कालावधीशी संबंधीत मागितली असून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती त्यांनी व्यक्तिशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीने माहितीसाठीचा सदर प्रथम अर्ज अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे यांना उद्देशून केला होता, तथापि, या प्रकरणी जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (सार्वजनिक बांधकाम) विभाग, धुळे हे असल्याने, अधीक्षक अभियंता यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीमध्ये विहित केल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (सार्वजनिक बांधकाम) विभाग, धुळे यांच्याकडे वर्ग केला. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला असल्याने, त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे अंदाजे शुल्क रुपये १९४४ इतके भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस कळविण्यात आलेले शुल्क अवाजवी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या प्रमाणेच माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क

रुपये १९४४ भरण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा युक्तिवाद आयोगास लेखी स्वरुपात सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामाची माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना १९४४ रुपये इतकी अवास्तव फी भरण्याचे आदेश दिले. त्यांनी मागणी केलेली माहिती किरकोळ स्वरुपाची व एक किंवा दोन पृष्ठांमध्ये सहज देण्यासारखी आहे. परंत अकारण वाढीव फीचे पत्र पाठवून आणि कालहरण करुन जन माहिती अधिकारी यांनी वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी मागणी केलेली माहिती सीडीमध्ये लोड करुन देण्याची मागणी केली. कार्यकारी अभियंता, रोजगार हमी योजना, धुळे यांनी दिनांक २६-०६-२००७ रोजी पत्र पाठवून अपिलार्थीस २१६ रुपये भरण्यासाठी आदेश दिले. म्हणजेच आवश्यक त्या शुल्कासंदर्भात शहानिशा न करता पत्रव्यवहार करुन माहिती दडपण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केला असल्याने त्यांच्यावर शास्ती व दंड आकरण्यात येऊन त्यांची खातेनिहाय चौकशी करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २१६ इतके त्यांच्या कार्यालयात न भरल्याने अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस प्रथमतः त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १९४४ इतके, उप कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (सार्वजनिक बांधकाम) विभाग, धुळे यांच्याकडील दिनांक १३-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे भरण्यासाठी कळवूनही अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा करण्यासंदर्भात तयारी दर्शविली नाही. मात्र ते कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (सार्वजनिक बांधकाम) विभाग, धुळे यांच्या कार्यालयात हजर राहिले असता त्यांना, त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली सर्व माहिती दाखविण्यात आली. यातील काही

कागदपत्रे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती म्हणून निवडली. या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीचे शुल्क रुपये २१६ इतके भरण्यासाठी त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०६-२००७ रोजी कळविले. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क इतके कमी झाल्यानंतरही अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयामध्ये न केल्याने अपिलार्थीस माहिती पुरविणे त्यांना शक्य झाले नाही. अपिलार्थी हे कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (सार्वजनिक बांधकाम) विभाग, धुळे यांच्या कार्यालयात दिनांक १९-०६-२००७ रोजी ज्यावेळी प्रथमतः हजर झाले त्यावेळी त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दाखविली होती. अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा त्यांचा कधीही उद्देश नव्हता. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यास ते अपिलार्थीस आजही माहिती देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती, मात्र अपिलार्थीने ज्या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली ही माहिती त्यांच्याकडे असलेल्या वेगवेगळ्या कागदपत्रावर उपलब्ध होती. त्यामुळे अपिलार्थी यांना त्यांनी विचारलेली माहिती जरी एक किंवा दोन पृष्ठांची आहे असे वाटले तरी ही माहिती प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी यांच्याकडे इतर असंख्य अशा अंदाजे ९५० पानावर उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः माहितीपोटी १९४४ रुपये भरण्याचे सूचित केले. माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी नव्याने तयार करुन ती अर्जदारास पुरविणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. मात्र अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या कागदपत्रांवर उपलब्ध आहे त्या कागदपत्रांच्या प्रती अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदारास देय ठरतात. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात रुपये १९४४ इतक्या शुल्काचा भरणा करण्यासाठी त्यांनी प्रथमतः सूचित केले. तथापि हे शुल्क अवाजवी वाटल्यावरुन अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात

उपस्थित झाले. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्यक्तिशः पाहणी केली व या माहितीतील १०८ पानांची निवड केली. या पानांच्या झेरॉक्स प्रती काढण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस २१६ रुपये इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे दिनांक २६-०७-२००७ रोजी सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अधिनियमातील कलम ७ (३) (क) चे अवलोकन करता त्यामध्ये असे स्पष्ट होते की, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहितीपोटीचे शुल्क कळवितांना या शुल्काचा संपूर्ण तपशील अर्जदारास कळविणे त्यांना अनिवार्य आहे. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लागणा-या माहितीचे अंदाजे शुल्क जरी विहित मुदतीमध्ये कळविले असले तरी या शुल्काचा संपूर्ण तपशील - एकूण पृष्ठांची संख्या, प्रती पृष्ठ दर हा तपशील अपिलार्थीस न देऊन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियातील कलम ७ (३) (क) चा भंग केला आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य देय ठरत आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूपुरःस्सर टाळल्याचे अथवा अपिलार्थीपासून कोणतीही माहिती असद्हेतूने दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झ ााल्याने अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची केलेली विनंती, आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गौतम संतोष पारेराव, दै. युगपरिवर्तन एक्सप्रेस कार्यालय, भिमनगर, गुरुकुल हायस्कूल जवळ, साक्री रोड, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (सार्वजनिक बांधकाम) विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (सार्वजनिक बांधकाम) विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०४

निर्णय दिनांक २६-०२-२००९

१ श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, अपिलार्थी
रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त
कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कर अधीक्षक, नगरपरिषद, उदगीर, जिल्हा लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने एकच व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात व औरंगाबाद येथील खंडपीठाच्या कार्यालयात सादर केले असून, अपिलार्थीच्या मुंबई येथे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आयोगाने दिनांक २४-०४-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश निर्गमित केले आहेत. अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर यापूर्वीच आयोगातर्फे सुनावणी होऊन निर्णय पारित केला गेला असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २५०४/२००७, दिनांक ३०-०३-२००७ खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २५०४/२००७, दिनांक ३०-०३-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०
निर्णय दिनांक २७-०२-२००९

१. श्री. रंजन रावसाहेब लोखंडे, : अपिलार्थी
रा.श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी,
कोपरगाव,जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक, वनविभाग,
संगमनेर, जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १७.३.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.०३.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून, त्यांनी मागितलेल्या माहितीपोटीचे अवास्तव शुल्क आकारली, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण असून ती विहित मुदतीत दिली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी हेतूपूर्वक माहिती अधिकारी यांना पाठीशी घालून प्रथम अपिलावर निर्णय दिला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.३.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लाकूड वाहतुकीच्या परवान्यासंदर्भात दि. ३१.३.१९९० ते ३१.३.२००७ या कालावधीशी संबंधित एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज वनपरिक्षेत्र अधिकारी, कोपरगाव यांच्याकडे केला होता. अपिलार्थीच्या या अर्जास वनपरिक्षेत्र अधिकारी, कोपरगाव यांनी दि. २०.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन ते या प्रकरणी जन माहिती अधिकारी नसल्याचे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीस या कामी नेमल्या गेलेल्या जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), अहमदनगर यांचेशी संपर्क साधण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दि. ९.५.२००७ रोजीच्या त्यांच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीसाठीचा प्रथम अर्ज दिला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २७/- इतके भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, या शुल्कामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती समाविष्ट आहे व मुद्दा क्र.३ व ४ शी संबंधित माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी, कोपरगाव यांच्याकडून प्राप्त होताच अपिलार्थीस अवगत करण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी

यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील माहिती, त्यांना अद्यापही आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले. त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने प्रतिसाद दिल्याने त्यांना माहितीपोटीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरलेले शुल्क रु. १२२७/- इतके त्यांना परत मिळावे, असा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने दि. ३१.३.१९९९ ते ३१.३.२००७ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरलेल्या चलनाच्या साक्षांकित प्रती मागितल्या आहेत. तथापि चलनाच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नसून त्या प्रती विभागीय कार्यालयातर्फे मूळ स्वरुपात महालेखापाल,नागपूर यांच्या कार्यालयात सादर केल्या गेल्या आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९.५.२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज केला असताना, त्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दि. १९.६.२००७ रोजी देऊन अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क रु. २७/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले असून त्यांनी अपिलार्थीस जी संपूर्ण माहिती देय होती, ती देखील पूर्ण स्वरुपात देऊ न करता, अपूर्ण स्वरुपाची देऊ केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील एकूण ४ मुद्यांपैकी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या पत्राद्वारे फक्त मुद्दा क्र. १ व २ ची माहिती देऊ केली व मुद्दा क्र. ३ व ४ च्या संदर्भात संबंधितांकडून माहिती प्राप्त होताच आपणास अवगत करण्यात येईल, असे आश्वासित केले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार असा प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी देणे अभिप्रेत नाही. अर्जदाराचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार तीस दिवसांच्या आत अर्जदारास त्यांनी मागणी

केलेल्या माहितीपोटीचे संपूर्ण शुल्क जन माहिती अधिकारी यांनी कळविणे भाग आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून प्रथमतः रु.२७/- आणि तदनंतर रु.१२००/- इतके शुल्क माहितीपोटी आकारल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जास मूळात जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिलेला प्रतिसादच वर नमूद केलेल्या कारणामुळे अवैध व चुकीचा ठरत असल्याने अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य देय ठरत आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणा झालेल्या १९९० ते २००७ या कालावधीतील चलनाच्या प्रती उपलब्ध असणार नाहीत. कारण प्रत्येक महिन्याच्या लेख्याबरोबर वन विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून चलनाच्या मूळ प्रती महालेखापाल,नागपूर यांना सादर केल्या जातात. मात्र या कालावधीतील कॅशबुकमध्ये अपिलार्थीने अपेक्षिलेल्या मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहितीचा उल्लेख आला असणार व ही कॅशबुके जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत. आज अपिलार्थीने मागणी केलेल्या चलनाचा भरणा केल्याची नोंद कॅशबुकमधील ज्या पृष्ठावर आहे, त्या पृष्ठाची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस देण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत वर स्पष्ट केल्याप्रमाणे, विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु. १२२७/- इतके, अपिलार्थीस परत करणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

कृ.मा.प.५...

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु. १२२७/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**अहमदनगर**
**दिनांक : २७-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रंजन रावसाहेब लोखंडे, द्वारा श्री.स्वामी समर्थ एन्टरप्राईजेस, एस.टी.स्टॅण्डजवळ रामचंद्र टॉवर्स, श्रीरामपूर जि.अहमदनगर-४१३ ७०९

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो),अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१
निर्णय दिनांक २७-०२-२००९

१. श्री. पठाण याकूबभाई रहीमभाई, : अपिलार्थी
रा.शेवगाव, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,शेवगाव,
जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
रो.ह.यो.(कार्य) विभाग, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १.४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.४.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दि. २.४.२००८ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९.१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाली असून याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने हे पत्र, राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी दि.१.४.२००८ रोजी द्वितीय अपील सादर केल्यानंतर दिले असल्याने,

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. २१/२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २७-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पठाण याकुबभाई रहीमभाई, मु.पो.इदगाह मैदान, शेवगाव, जि.अहमदनगर-४३४५०२

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग,शेवगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,रो.ह.यो.(कार्य) विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२
निर्णय दिनांक २७-०२-२००९

१. सौ. सुनिता बाळासाहेब सानप, : अपिलार्थी
रा.लोणी, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः अधीक्षक (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारीः उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २.४.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांच्या मूळ अर्जात त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, तसेच यासंदर्भात संबंधितांकडून कोणताही खुलासा आजतागायत करण्यात आला नाही, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९० ते २००७ या कालावधीशी संबंधित ग्रामपंचायत, हसनापूर ता. राहाता या कार्यालयाच्या चौकशी अहवालासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रजिस्टर्ड पोस्टाने दि. २८.१२.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज देखील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला व जन अपिलीय अधिकारी यांना तो दि. १८.२.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत दिलेल्या पोचपावतीच्या झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित मुदतीत कोणताही निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात कोणत्याही प्रकारे प्रतिसाद प्राप्त न झाल्याचे तसेच अपिलार्थी यांच्याशी कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार न केल्याचे आज आयोगास अवगत केले.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा दि. २७.१२.२००७ रोजीचा मूळ अर्ज व दि. १६.२.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली असून राज्य माहिती आयोगाकडे अपील करताना त्यांना एकूण ७ मुद्यांवर माहिती अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या व्याप्तीमध्ये अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना एका मुद्याची वाढ करुन माहिती मागितली आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आयोगाकडे अपिलावर सुनावणी घेताना, सदर सुनावणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीच्या व्याप्तीपुरतीच मर्यादित ठेवणे अभिप्रेत आहे, त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करताना ज्या जादा मुद्याची माहिती मागविली आहे, त्याकरिता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार स्वतंत्र अर्ज करावा लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्र. २ द्वारे -"ग्रामपंचायत, हसनापूर, ता.राहाता यांनी अनियमितता निर्माण केली आहे काय ?, व त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र.१ मध्ये संदर्भित केलेल्या पत्राबाबत, मुद्दा क्र.३ द्वारे अपेक्षिलेली, - "चौकशी अहवालाच्या विलंबाचे कारण" ही माहिती मागविली आहे. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या स्पष्टीकरणाची अपेक्षा केली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येनुसार व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील इतर तरतुदींनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्याकरिता माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे, एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दल कारणे अथवा खुलासे अपेक्षित करणारी माहिती देय असत नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या एकूण ६ मुद्यावरील

माहितीपैकी अपिलार्थीस वरील मुद्दा क्र. २ अंशतः व मुद्दा क्र. ३ ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ अंशतः व मुद्दा क्र. ३ वगळता अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ही माहिती मात्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे भाग आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज प्राप्त झाला नसल्याचा युक्तिवाद केला, तथापि अपिलार्थीने सदर अर्ज त्यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याबाबतचा योग्य तो पुरावा (रजिस्टर्ड पोस्टाची पावती) सादर केला असल्याने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा, अपिलार्थीकडून त्यांना मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज प्राप्त झाले नाहीत, हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती २० दिवसांच्या आत देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने अधिनियमातील कलम ७(६) नुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.सबब जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. २ अंशतः व ३ वगळता उर्वरित मुद्यांसंदर्भात संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे मूळ अर्ज व अपील अर्ज दाखल केल्याबाबतचा सादर केलेला योग्य तो पुरावा पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवले गेल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याबरोबर काम करणारे व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहाय्यक/कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी समजावे, अशी तरतुद आहे. ही तरतुद पाहता या विलंबास जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस

माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील त्यांचे संबंधित सहकारी/कर्मचारी जबाबदार सिध्द होत असल्यामुळे, हे सर्वजण अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. २ अंशतः व ३ वगळता उर्वरित मुद्यांसंदर्भात संपूर्ण माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे,त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी /कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २७-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुनिता बाळासाहेब सानप, साईसागर निवास, इंजिनिअरींग कॉलेज रोड, लोणी बु. ता.राहाता, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (ग्रा.पं.),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३
निर्णय दिनांक २७-०२-२००९

१. श्री. एम.आर.शेख, : अपिलार्थी
रा.राहुरी, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा विशेष लेखा परीक्षक,
सहकारी संस्था, वर्ग-१,
अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,
(लेखा परीक्षण),नाशिक विभाग,
नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: विशेष लेखा परीक्षक,
सहकारी संस्था, वर्ग-२,
अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ७.४.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०४.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी आयोगास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व खोटी माहिती पुरविल्याबद्दल दंडात्मक कारवाई करण्याचे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिला तो नैसर्गिक न्यायाने न देता माहिती अधिकारी यांनी केलेल्या चुकांवर पांघरुण घालण्याचा

प्रयत्न केल्याने त्यांच्यावर शासनपातळीवर कडक कारवाई करण्यासाठी व मागणी अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे योग्य व विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - **"जिल्हयातील सन २००६-२००७ या सहकारी वर्षातील लेखापरीक्षण न झालेल्या (सप्टेंबर २००७ अखेरपर्यंत) सेवा संस्था,नागरी पतसंस्था व सेवक संस्था यांची तालुकावार नावांसह सूची (यादी) "-** ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे रु.९३/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या शुल्काव्यतिरिक्त "खात्याच्या लेखा परीक्षण कार्यक्रमाला, मा. विभागीय सहनिबंधक अधिकारी (लेखा परीक्षण) नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडून मुदतवाढ मिळाल्याने सेवा संस्थेचे लेखापरीक्षण सद्यस्थितीत चालू आहे", अशी माहिती दिली

अपिलार्थीस शुल्काची रक्कम कळविताना जन माहिती अधिकारी यांनी "सन २००६-२००७ या सहकारी वर्षातील लेखा परीक्षण न झालेल्या सेवा संस्था, नागरी पतसंस्थांची यादी याबाबतची माहिती पुरविण्यासाठीचा खर्च रु. ९३/- इतक्या शुल्काचा भरणा करावा "असा उल्लेख केला आहे. तदनंतर अपिलार्थीने दि. ३१.१०.२००७ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्याने दि. ३.११.२००७ रोजी त्यांना माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.१.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, खोटी माहिती दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी आणि जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला न्याय हा नैसर्गिक तत्त्वाला अनुसरुन दिलेला नसून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या चुकांवर पांघरुण घातले आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये पुढे असेही प्रतिपादन केले की, ग्रेड ओ कास्टींग सेवकांची सह.पतसंस्था, बांबोरी व के.एस.बी.पंप्स सेवक सह.पतसंस्था,बांबोरी या दोन वेगवेगळया संस्था नसून ती एकच संस्था आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांच्या विभागाच्या कार्यपध्दतीची आयोगास कल्पना दिली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या विभागामध्ये प्रशासन विभाग व लेखा परीक्षण विभाग असे दोन स्वतंत्र विभाग असून अपिलार्थीने लेखा परीक्षण विभागाकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला होता. लेखा परीक्षण विभागाकडे प्रामुख्याने जिल्हयातील सहकारी संस्थांचे लेखा परीक्षणाचे काम नेमून दिलेले असते. दरवर्षी जिल्हयामध्ये नोंदणी झालेल्या संस्थांची यादी त्यांना प्रशासन विभागाकडून प्राप्त होत असते. या यादीनुसार संबंधित संस्थेच्या लेखापरीक्षणाचे काम, लेखा परीक्षण विभाग करीत असतो.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये लेखा परीक्षण न झ ालेल्या संस्थांची यादी मागितली होती. यातील प्रशासन विभागाकडून, ग्रेड ओ कास्टींग सेवकांची सह.पतसंस्था, बांबोरी, नोंदणी क्र. १४९१ व के.एस.बी.पंप्स सेवक सह.पतसंस्था,बांबोरी, नोंदणी क्र. ७०३ या दोन्ही संस्थांच्या नावाचा या यादीमध्ये समावेश असल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांना प्रशासन विभागाकडून प्राप्त झालेली यादी जशी होती तशीच दिली तथापि प्रत्यक्षात ग्रेड ओ कास्टींग सेवकांची सह.पतसंस्था, बांबोरी, व के.एस.बी.पंप्स सेवक सह.पतसंस्था,बांबोरी या दोन्ही पतसंस्था एकच नसून या दोन्ही संस्था वेगवेगळया आहेत. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केल्याप्रमाणे या दोन संस्था एकच असल्याची कोणतीही माहिती अधिकृतरित्या त्यांना प्राप्त झाली नाही, असेही जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर प्रतिपादन केले. अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी ग्रेड ओ कास्टींग या संस्थेचे लेखा परीक्षण झाले नव्हते. तथापि अपिलार्थीस या दोन्ही संस्था एकच असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी ग्रेड ओ कास्टींग सेवकांची सह.पतसंस्था, बांबोरी या संस्थेचे

लेखापरीक्षण झाले असल्याचे अनुमान काढले व जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिली, असा निष्कर्ष काढला.

अपिलार्थीस सुरुवातीस दि. २५.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला त्यावेळी सेवा संस्थेचे लेखा परीक्षण चालू होते. परंतु नजरचुकीने लेखापरीक्षण न झालेल्या सेवा संस्था असा त्यांच्याकडून अपिलार्थीस दि. २५.१०.२००७ रोजी दिलेल्या पत्रामध्ये उल्लेख झाला आहे. अपिलार्थीस खोटी माहिती देण्यासाठीचा त्यांचा कोणताही उद्देश नसून त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती, ती त्यांनी दिलेली आहे. अपिलार्थीस त्यांनी एकूण दोन टप्प्यामध्ये माहिती देण्याचे ठरविले होते. त्यापैकी दि. ३.११.२००७ रोजी अपिलार्थीस सेवक सहकारी व नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संदर्भात सशुल्क माहिती पुरविली व सेवा सहकारी संस्थांच्या संदर्भात त्यांच्याकडे माहिती उपलब्ध झ ााल्यावर त्यांनी या माहितीपोटीचे शुल्क रु. ५०/- इतके अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात भरण्याचे दि. २२.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीस ते ही माहिती सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ०१.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु. ९३/- इतके भरण्याचे सूचित केले. तथापि या माहितीमध्ये सेवा सहकारी संस्थासंदर्भातील माहितीचा कोणताही उल्लेख नव्हता. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २२.११.२००७ रोजी रु.५०/- इतके शुल्क आकारुन देऊ केली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद देण्यासाठी अधिनियमातील विहित मुदतीपेक्षा विलंब लावला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सेवा सहकारी संस्थेसंदर्भातील माहिती आता विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती दिल्याचा आयोगासमोर युक्तिवाद केला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली असून या प्रकरणी

अपिलार्थीस खोटी माहिती देण्याचा त्यांचा कोणताही असद्‌हेतू असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याचे,आयोगास आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार जर जन माहिती अधिकारी यांनी एखाद्या विशिष्ट हेतूने अथवा दुष्ट बुध्दीने माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्यास अथवा कोणत्याही असद्‌हेतूने माहिती दडविली असल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याची तरतुद आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून माहिती कोणत्याही असद्‌हेतूने दडवून ठेवल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळले नाही, तसेच अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध होती त्या स्वरुपात ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे, हे पाहता अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोगास मान्य करता येत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सेवा सहकारी संस्थांच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २७-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एम.आर. शेख, प्रमाणित लेखा परीक्षक,सहकारी संस्था, ता.राहुरी,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा विशेष लेखा परीक्षक,सहकारी संस्था, वर्ग-२,अहमदनगर. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,(लेखा परीक्षण),नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२४
निर्णय दिनांक २७-०२-२००९

१. श्री. रोहीदास राधुजी दातीर : अपिलार्थी
रा.राहुरी, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशाला,
राहुरी, जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १२.४.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०४.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अवास्तव फी आकारुन माहिती नाकारली आहे. आजतागायत त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.४.२००२ ते ३१.१.२००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या शाळेतील

मागासवर्गीय अनुसूचित जाती, जमाती,भटक्या विमुक्त जाती,आदिवासी विद्यार्थ्यांची यादी, शासनाकडून मिळालेले अनुदान, शिष्यवृत्ती, अनुदानाचे वाटप या संदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, - **"मागासवर्गीय अनुसूचित जाती जमाती भटक्या विमुक्त जाती आदिवासी विद्यार्थी,विद्यार्थीनींची यादी,अपंग विद्यार्थ्यांची यादी, अस्वच्छ कामे करणाऱ्या कामगारांची मुले मुलींची यादी, शासनाकडून मिळालेले अनुदान,शिष्यवृत्ती,मागासवर्गीय अपंग अस्वच्छ कामगारांची मुले,मुलींची यादी, विद्यार्थ्यांना केलेल्या शिष्यवृत्तीचे वाटप, विद्यार्थी कल्याणनिधीचा केलेला विनियोग, देवदेवतांचे फोटो लावणे बंधनकारक आहे का, शाळेचे व कार्यालयाचे वेळापत्रक"-** अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. ७.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे एकूण रु. २८,११५/- इतके शुल्क धनादेश अथवा चेकद्वारे त्यांच्या संस्थेकडे भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, या संदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १८.३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून नियमानुसार झेरॉक्स व पोस्टेज खर्चाची रक्कम भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अशाप्रकारे सूचित करुनही माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित होते, तथापि रोजनाम्यावर सही करण्यास त्यांनी नकार दिला व त्यांना अनुपस्थित समजावे, असे आयोगास सांगितले व तदनंतर ते आयोगासमोरुन निघून गेले. निघून जाण्यापूर्वी त्यांनी आयोगासमोर असा

आग्रही युक्तिवाद केला की, उपरोक्त प्रकरणी अवास्तव शुल्काची आकारणी करुन त्यांना माहिती नाकारली गेली असल्याने, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडाची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. १.६.२००८ पासून कार्यरत असून, अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता, ते जन माहिती अधिकारी आता नियतवयोमानानुसार दि. ३१.५.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या एकूण १६४ इतकी आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २९.१.२००८ रोजीच्या अर्जास जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद चुकीचा आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये माहितीसाठीच्या शुल्काचा जो तपशील दिला आहे, त्यामध्ये तीन लिपीक,एक शिक्षक यांचे १५ दिवसांचे वेतन रु. १८,५५५/- इतक्या रकमेचा समावेश आहे. तसेच प्रती वर्ष रु.११७०/- प्रमाणे ७ वर्षांकरिता रु. ९३६०/-व पोस्टेज खर्च रु.२००/- असा त्यांनी उल्लेख केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांना निश्चितपणे काय म्हणावयाचे, याचा बोध होत नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी जन माहिती अधिकारी यांनी कशा पध्दतीने शुल्क आकारावे, याचे सविस्तर विवेचन शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.आर.टीआय.२००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ मध्ये केलेले आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना त्यामध्ये संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन समाविष्ट करण्याची तरतुद यामध्ये नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या फक्त १६४ इतकी असताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ७.२.२००८ रोजीच्या पत्रामध्ये रु. ९३६०/- इतक्या रकमेची आकारणी कशी केली, हे कळण्यास मार्ग नाही. या सर्व बाबी

पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अवास्तव शुल्क आकारल्याचे दिसून येते. या सर्व कारणांमुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दि. ७.२.२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. त्याचप्रमाणे येथे असेही नमूद करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीस लिहिलेल्या त्यांच्या दि. १८.३.२००८ रोजीच्या कार्यालयीन पत्रामध्ये झेरॉक्स व पोस्टेज खर्च इतकी रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरण्याचे अपिलार्थीस सूचित केलेले होते. तथापि अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमात कोणतेही शुल्क भरण्याची तयारी या संपूर्ण घडामोडीमध्ये कोणत्याही टप्प्यावर दर्शविल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ७.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रथम प्रतिसाद वर नमूद केल्याप्रमाणे अवैध ठरत असल्याने अपिलार्थीस ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस अवास्तव शुल्क आकारुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी एकप्रकारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून चुकीच्या पध्दतीने प्रतिबंधित केल्याचे या प्रकरणी सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र ठरत आहेत. तथापि तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी आज नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे आता सक्षम प्राधिकरणास कारवाई करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २७-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रोहीदास राधुजी दातीर, पोस्ट बॉक्स नं.३१, राहुरी, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशाला,राहुरी, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५
निर्णय दिनांक २७-०२-२००९

१. श्री. दिलीप नायकु थोरात : अपिलार्थी
रा.कोळपेवाडी,ता.कोपरगाव, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: सहायक शिक्षण संचालक,
पुणे विभाग,पुणे

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी प्र. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.४.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणतेही आदेश दिले नाहीत व माहिती देण्यास नकार दिला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - **राधाबाई काळे कन्या विद्या मंदिराच्या नावात बदल करण्यासंदर्भात -** काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.३१.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. तसेच अपिलार्थीने ज्या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली आहे, तो विषय पूर्णतः संबंधित शिक्षण संस्थेच्या अखत्यारीतील असल्याने शाळेच्या मुख्याध्यापकाकडे अपिलार्थीचा अर्ज योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवून दिला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. ५.३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. मात्र त्यांनी आपला युक्तिवाद आयोगास लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर त्यांना, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना वेळेत माहिती न दिल्याने, त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करावे लागले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज दि. ३१.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती ज्या प्राधिकरणाच्या प्रत्यक्षात ताब्यात आहे, त्या प्राधिकरणाकडे पाठविला व तदनंतर संबंधित प्राधिकरणाने अपिलार्थीस मागणी केलेली माहिती दि. २५.४.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेण्याचे कारण विचारले असता,अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे पाठविला गेला असल्याने व या प्रकरणातील जन अपिलीय अधिकारी हे शिक्षणाधिकारी असल्याने त्यांनी या अपिलावर सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. १.२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जास्तीत जास्त ३५ दिवसांच्या आत (अपिलार्थीचा मूळ अर्ज शिक्षण उपसंचालक,पुणे यांचे कार्यालयात दि.१२.२.२००८ रोजी प्राप्त झ ाल्याने) म्हणजे दि. १७.३.२००८ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अधिनियमातील तरतुदीनुसार क्रमप्राप्त असताना अपिलार्थीस ही माहिती दि. २५.४.२००८ रोजी संस्थेमार्फत पुरविली गेली. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लागलेल्या विलंबाचे मुख्य कारण म्हणजे शिक्षण उपसंचालक,पुणे यांच्या कार्यालयाकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही न होणे, हेच असल्याचे दिसून येते. कोणाही अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर संबंधित प्राधिकरणाकडे उपलब्ध नसेल तर कशाप्रकारे कार्यवाही करावयाची याचे विवेचन अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीमध्ये केलेले आहे. यातील तरतुदी लक्षात घेता, अपिलार्थीचा दि. १.२.२००८ रोजीचा अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना दि. १२.२.२००८ रोजी प्राप्त झाला, त्यांनी तो संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे दि. १७.२.२००८ रोजी अगर तत्पूर्वी पाठविणे भाग होते. तथापि त्यांनी मूळात अपिलार्थीचा अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठविण्यासाठी या प्रथम टप्प्यावर १४ दिवसांचा विलंब लावला आहे. या विलंबाचे समर्थन उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगासमोर करु शकत नाहीत, हे पाहता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कोणतेही समर्थन असू शकत नाही असे अनुमान आयोग काढत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती देण्यासाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयातील संबंधितांकडून लावल्या गेलेल्या विलंबामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहिती विलंबाने प्राप्त झाली, त्यामुळे शिक्षण उपसंचालक कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी

(श्री. व्ही. बी.गायकवाड, सहा.शिक्षण संचालक) हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. या प्रकरणी त्यांनी आपल्या विलंबाने कार्यवाही करावयाच्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने शिक्षण संचालक, म.रा. पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती संबंधित शिक्षण संस्थेकडून प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २७-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप नायकु थोरात, मु.पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव,जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक पुणे विभाग,पुणे यांचे कार्यालय, १७,डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग, १७,डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, १७,डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र. २६/२००८, २७/२००८ व २८/२००८**

निर्णय दिनांक २७-०२-२००९

१. श्रीमती इंदूबाई मारुती माळी, : अपिलार्थी
रा. संगमनेर, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ **अपील क्र.२६/२००८**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत, सुकेवाडी, ता.संगमनेर<br>जि.अहमदनगर | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),<br>पंचायत समिती,संगमनेर,<br>जि.अहमदनगर | :प्रतिवादी |

२ **अपील क्र.२७/२००८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत, गुंजाळवाडी, ता. संगमनेर<br>जि.अहमदनगर | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),<br>पंचायत समिती,संगमनेर,<br>जि.अहमदनगर |

३ **अपील क्र.२८/२००८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत, हंगेवाडी, ता. संगमनेर<br>जि.अहमदनगर | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),<br>पंचायत समिती,संगमनेर,<br>जि.अहमदनगर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी या अनुपस्थित आहेत.

उपरोक्त तीन प्रकरणातील अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १.४.२००८ रोजीची, राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.४.२००८ रोजी दाखल केलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या सर्व अपील अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी दि. २६.११.२००७ रोजी दिलेल्या अर्जांची जन माहिती अधिकारी यांनी दखल घेतली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने उपरोक्त तीनही प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, सुकेवाडी, गुंजाळवाडी व हंगेवाडी यांच्याकडे दि. २६.११.२००७ रोजीच्या त्यांच्या अर्जाद्वारे एकाच प्रकारची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, - **"ग्राम पंचायत, सुकेवाडी, गुंजाळवाडी व हंगेवाडीमध्ये घरगुती गॅस वाटप, घरकुल वाटप, दारिद्रयरेषेखालील लोकांची यादी व २००३ ते २६.११.२००७ या कालावधीतील (संबंधित) ग्रामसभेच्या इतिवृत्तांताच्या प्रती"**- या मुद्यांचा समावेश होता. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने दि. २९.१२.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार उपरोक्त तीनही प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व अंतिमतः दि. २८.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तीन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी या आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, सुकेवाडी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नव्हता. ते दि. १७.१०.२००८ रोजी पंचायत समितीच्या कार्यालयामध्ये काही कामासाठी गेले असता, गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची विचारणा केली असता, त्यांना प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला असल्याचे ज्ञात झाले व त्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. १४.११.२००८ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली.

जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, गुंजाळवाडी व ग्रामसेवक हंगेवाडी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे कधीही प्राप्त झाला नव्हता. राज्य माहिती आयोगाची सुनावणीची नोटीस त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्याचे त्यांना प्रथमतः ज्ञात झाले. तदनंतर ग्रामविकास अधिकारी, गुंजाळवाडी यांनी दि. २१.२.२००९ रोजी व ग्रामसेवक, हंगेवाडी यांनी दि. २६.२.२००९ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),पंचायत समिती,संगमनेर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत त्यांना प्राप्त झालेली नाही, असे आयोगास स्पष्ट केले.

उपरोक्त तीनही प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या अर्जामध्ये त्यांनी आपला माहितीसाठीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिल्याबाबतचा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यामधील मूळ माहितीसाठीच्या अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या लिपीकाची सही अथवा कार्यालयाचा शिक्का देखील या प्रतीवर आढळून येत नाही. तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या, अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही, या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी या आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील तीनही प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या पुराव्याचे अवलोकन करता यामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीस ग्रामविकास अधिकारी, गुंजाळवाडी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर व्यक्तिशः माहिती प्राप्त झाली आहे. मात्र हंगेवाडी व सुकेवाडी संदर्भातील माहिती ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या वतीने दुसऱ्या व्यक्तीने स्वीकारल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागणाऱ्या अर्जदारासच माहिती पुरविण्याचे बंधन असल्याने ग्राम विकास

अधिकारी, हंगेवाडी व सुकेवाडी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी ही माहिती, हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष अपिलार्थीस प्राप्त होईल, अशी व्यवस्था करावी व अपिलार्थीची त्याप्रमाणे पोचसही घेऊन ती प्रत त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखावर ठेवावी.

या संदर्भात विस्तार अधिकारी , पंचायत समिती, संगमनेर यांनी असा खुलासा केला की, संगमनेर येथे 'अठरा पगड जातीजमाती संघटना' या संस्थेचे कार्यालय असून, या संघटनेचे अनेक प्रतिनिधी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा वापर करुन सार्वजनिक प्राधिकरणाकडे वेळोवेळी माहितीची मागणी करीत असतात. विचाराधीन प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी या संघटनेच्या एक कार्यकर्त्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन देताना संघटनेच्या कार्यालयामध्ये अपिलार्थी या उपस्थित नव्हत्या व त्यांच्या वतीने दुसऱ्या व्यक्तिने ही माहिती स्वीकारली आहे व माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ पोचसही दिली आहे. विस्तार अधिकारी यांचा हा युक्तिवाद उपलब्ध कागदपत्रांतील अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दिलेल्या पत्त्यावरुन जरी सकृतदर्शनी बरोबर वाटत असला तरी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर संबंधित अर्जदारासच माहिती देण्याचे त्यांना बंधनकारक असल्याने, या माहितीची एक जादा प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्याची व त्याची पोच घेण्याची कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी मूळात अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे त्यांच्या द्वितीय अपील अर्जाबरोबर सादर केला नसल्याने व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नसल्याने जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कोणतीही कारवाई करण्याचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन तीनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. २६/०८, २७/०८ व २८/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

२) जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, सुकेवाडी, व हंगेवाडी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील पूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २७-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती इंदुबाई मारुती माळी, स्वातंत्र्यचौक, अठरा पगड कार्यालय,संगमनेर ता. संगमनेर, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, सुकेवाडी, ता.संगमनेर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, गुंजाळवाडी, ता.संगमनेर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, हंगेवाडी, ता.संगमनेर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती, संगमनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९
निर्णय दिनांक २७-०२-२००९

१. श्री. देविदास महादू चौधरी, : अपिलार्थी
रा.नवीन नवलेवाडी, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य,
अगस्ति कला,वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान
महाविद्यालय, अकोले, जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
अगस्ति कला,वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान
महाविद्यालय, अकोले, जि.अहमदनगर

विद्यमान जन माहिती अधिकारी: व्याख्याता,
अगस्ति कला,वाणिज्य व दादासाहेब
रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले,
जि.अहमदनगर

त्रयस्थ पक्ष: श्री. बाळासाहेब पंढरीनाथ शेटे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०२.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वकील, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ४.३.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे दि. १०.३.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी केलेला माहितीसाठीचा अर्ज त्यांना जन माहिती अधिकारी यांनी परत पाठविला. विनिर्दिष्ट वेळेत त्यांनी माहिती दिली नाही. माहिती दडवून ठेवली, अपूर्ण माहिती दिली, महाविद्यालयाच्या प्रबंधकाच्या नावाने व सहीने पत्र दिले, स्वतःच्या केबिनमध्ये सुनावणी घेतली. माहिती मागणाऱ्या अर्जदारावर दबाव आणला, कायदेशीर कारवाईची धमकी दिली व जन माहिती अधिकारी यांनीच जन अपिलीय अधिकारी म्हणून काम केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांना **- "सन १९८८ ते २००७-०८ पर्यंतची शिक्षक मान्यता प्रती, कार्यभार वाटप तक्ते, २००७-०८ ला ४५ मिनिटांऐवजी ४० मिनिटे कार्यभार तयार केलेल्या पत्राची प्रत"-** इत्यादी माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शिक्षण संस्थेशी संबंधित एकूण ९ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विद्यान महाविद्यालय यांच्याकडे पाठविण्याचे सूचित केले. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज महाविद्यालयाच्या प्राचार्यांना उद्देशून केला होता. प्राचार्यांकडून मिळालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ७.१.२००८ रोजी प्राचार्यांकडेच प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ४.२.२००८ रोजी निर्णय दिला व अपिलार्थीचे अपील अमान्य केले आणि जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आजपावेतो न दिलेली माहिती सात दिवसांच्या आत देण्याचे सूचित केले. तथापि या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे श्री. भाऊसाहेब रामचंद्र नवले, ॲडव्होकेट यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना अद्यापपावेतो मुद्दा क्र. २,३,४ व ७ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दि. २७.१२.२००७ रोजी पुरविली आहे.अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांच्यावर केलेले आरोप त्यांना मान्य नाहीत. यासंदर्भात या आरोपाचे खंडन करणारे एक निवेदन त्यांनी आयोगास सादर केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये मागणी केलेली माहिती संस्थेच्या ताब्यात असल्याने ती अपिलार्थीने परस्पर संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना यामध्ये नमूद केले आहे.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्यासंदर्भातील मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज महाविद्यालयाच्या प्राचार्यांना उद्देशून केला होता. या प्रकरणी महाविद्यालयातील प्राचार्य हे जन माहिती अधिकारी नसून ते जन अपिलीय अधिकारी आहेत, त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झ ााल्यापासून जास्तीत जास्त पाच दिवसांच्या आत अधिनियमातील कलम ६(३) (एक) च्या तरतुदीनुसार त्यांनी तो त्यांच्या महाविद्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविणे त्यांना क्रमप्राप्त होते. तथापि, त्यांनी अशी कोणतीही कृती न करता अपिलार्थीस माहितीसाठीचा मूळ अर्ज परस्पर जन माहिती अधिकारी यांच्याकडे करण्याचे सूचित केले. प्राचार्यांची ही कृती चुकीची आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.१२.२००७ रोजी दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २,३,४ व ७ शी संबंधित माहितीचा समावेश नसल्याचे अपिलार्थी यांच्या वकिलांनी आयोगाचे निदर्शनास आणले. ही माहिती

संस्थेच्या ताब्यात असल्याने ती अपिलार्थीस पुरविली गेली नाही,असे महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आयोगास अवगत केले. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाने जन माहिती अधिकारी यांची माहिती देण्यासाठी नेमणूक केल्यानंतर याच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे अभिप्रेत आहे. प्राचार्य यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये संदर्भित केलेल्या शिक्षण संस्था व प्रत्यक्षात नेमले गेलेले जन माहिती अधिकारी - महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक हे एकाच प्राधिकरणाचे दोन भाग असल्याने अपिलार्थीस परस्पर संस्थेकडून माहिती घेण्याचे सूचित करण्याची प्राचार्य यांची कार्यवाही ही चुकीची ठरते. अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने, त्यांना सदर माहिती अपिलार्थीस आता विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस अद्यापपर्यंत द्यावयाची बाकी असलेली मुद्दा क्र. २,३,४ व ७ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस ही माहिती दि.७.१२.२००७ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे मिळणे अभिप्रेत असताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती रु.२२१/- इतके शुल्क आकारुन दि. २७.१२.२००७ रोजी म्हणजेच विलंबाने दिल्याचे सिध्द होत आहे. थोडक्यात या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २२१/- त्यांना परत करावे लागेल. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना अद्यापपर्यंत द्यावयाच्या चार मुद्यांवरील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने व सशुल्क माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी व्यपगत झ ाला असल्यामुळे, ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अतिरिक्त माहितीची मागणी करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढविली आहे. अपिलार्थीस वाढीव व्याप्तीची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत नव्याने अर्ज

करावा लागेल, असे येथे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने संस्थेवर, राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये वेगवेगळे व मोघम स्वरुपाचे आरोप केले आहेत. या आरोपासंदर्भात एकही पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला नाही. तसेच या आरोपासंदर्भात संस्थेकडून राज्य माहिती आयोगाकडे सादर केला गेलेला लेखी युक्तिवाद आयोग मान्य करीत असून अपिलार्थीचे संस्थेवर केलेले आरोप त्यांच्या मोघम स्वरुपामुळे व पुराव्याअभावी फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने प्रतिसाद दिल्याने त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३,४ व ७ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेल्या शुल्काची संपूर्ण रक्कम (पोस्टेज खर्चासह) याच कालावधीमध्ये अपिलार्थीस परत करावी.

४) जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे उपरोक्त प्रकरणातील त्यांच्या वर्तनाबद्दल सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २७-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देवीदास महादू चौधरी, रा. अमृतनगर, नवीन नवलेवाडी, मु.पो.ता.अकोले,जि.अहमदनगर-४२२ ६०१

२. जन माहिती अधिकारी तथा व्याख्याता, अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.